


सत्तेच्या जोरावर गरिबांची व
सार्वजनिक संस्थांची संपत्ती लुबाडणे
ही भाऊसाहेबांची करामत.
त्याला कायद्याची सध्याची चौकट
आणि सत्ताधाऱ्यांचा दृष्टिकोन यांची साथ.
या अन्यायांचा लोकशाही मार्गाने
मुकाबला करता येईल का ?
अनेक कार्यकर्त्यांच्या मनात आज घोटाळणारे
हे एक प्रश्नचिन्ह आहे.
हे भाऊसाहेब कोण ?
त्यांनी केलेले अन्याय कोणते ?

## हे भाऊसाहेब कोण ?

माणूस पुढील अंकात : एक विशेष पुरवणी
सादरकर्ते : पन्नालाल सुराणा–बार्शी


# माणूस

१५ जानेवारी १९७२
पन्नास पैसे

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | १५ जानेवारी १९७२ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | तेहतीस | पंचवीस रुपये | पासष्ट रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**सप्रेम नमस्कार...**

◻ तमाम अमेरिकेत भारताविरुद्ध वातावरण तयार करण्यात निक्सन राजवट गुंतली असताना काही अमेरिकन सीनेटर्स मात्र भारताची बाजू व त्यापरत्वे सत्य बाहेर आणण्यासाठी धडपडत आहेत. आयडाहोचे डेमोक्रॅट सीनेटर श्री. फ्रँक चर्च हे भारताची बाजू अमेरिकन जनतेपुढे आणणारे पहिले सीनेटर. दूरचित्रवाणीवरील मुलाखतीत त्यांनी भारताची बाजू समर्थपणे मांडली. त्यांच्या शब्दात सांगायचे म्हणजे, ' The admistration policy is just a nonsense. '

बांगला देशाची बाजू अमेरिकन जनतेपुढे मांडणारे दुसरे सीनेटर एडवर्ड केनेडी. भारत-पाक परिस्थिती चिघळेपर्यंत सोयिस्कररीत्या मौन धारण करण्याचा आरोप त्यांनी निक्सन राजवटीवर केला, एक कोटी लोकांना नऊ महिने पोसणारा भारत आक्रमक कसा ? वेळोवेळी जगापुढे तक्रार मांडूनही जगाने दखल न घेतल्यामुळे नाईलाजाने युद्धाचा मार्ग स्वीकारणारा भारत आक्रमक कसा ? सीनेटर केनेडींच्या वरील प्रश्नांनी अमेरिकन जनता निराळ्या दिशेने विचार करू लागली.

आपल्या रामशास्त्री बाण्याने भारताची न्याय्य बाजू अमेरिकन जनतेपुढे ठणकावून मांडणाऱ्या वरील सीनेटर्सचे आमच्या भारतीय देशबांधवांनी अभिनंदन केले पाहिजे, असे आम्हास प्रकर्षाने वाटते,

जगदीश, विजय, राजू बगाडिया
सतीश सामंत
अटलांटा, जॉर्जिया, यु. एस. ए.

८ जानेवारी, १९७२

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# अठरा लक्ष पावलं दूर गेलेली....

## उत्तरार्ध

श्री. ग. मा.

मागील अंकी दि. बा. मोकाशी यांनी आपल्या ' अठरा लक्ष पावलांत ' अन्न-स्वतंत्रता पदयात्रेमागील ' राष्ट्रीय ' उद्दिष्टांची गंभीर उपेक्षा केली हे सांगितले. या अंकी त्यांच्या लिखाणातील उथळपणाचा व खोडसाळपणाचा थोडा विचार करावयाचा आहे.

सुरुवातीलाच सोनखताचा विषय आलेला आहे. पृष्ठ २५–२६ वर मोकाशी लिहितात–

' पदयात्रेत मी त्रयस्थ. पण चुकून या वादात थोडा भाग घेतला. मला ही कल्पना बीभत्स वाटली. आपली विष्ठा आपणच गोळा करून, लिलावात विकून येणारे पैसे हॉलंडला धाडायचे यात माझ्या मतें हॉलंडच्या मुलांचा निष्कारण अवमान होता. अवमान मला तरी वाटला. कारण माजगावकरांच्या प्रायश्चित्त या शब्दात ते नीचकर्म आहे असे अभिप्रेत होते.

आमच्यात असलेले तीन सर्वोदयी गिरिजन कार्यकर्ते व भाऊ मुंदडा या कल्पनेवर खूष होते. त्यांचे मात्र मला कळत नव्हते. माझ्या कल्पनेप्रमाणे सर्वोदयाची सफाई ही प्रायश्चित्त किंवा नीचकर्म म्हणून नसते. सर्वोदयाप्रमाणे सफाई हे ' पुण्यकर्म 'च. सर्वांना समान पातळीवर आणणारा शुद्ध आनंद. सफाईला माजगावकरांनी दिलेली ' राष्ट्रवादी ' कलाटणी गिरिजन किंवा भाऊ मुंदडा यांच्या ध्यानात आली नसावी. '

यात न कळत भाऊ मुंदडा किंवा गिरिजन यांच्या बुद्धीचा मोकाशी अवमान करतात हे तूर्त सोडून देऊ. सोनखताची मूळ कल्पना काय होती ? ' आपली विष्ठा आपणच गोळा करून, लिलावात विकून '......ही सर्व अतिशयोक्ती आहे. यातही वाईट, बीभत्स व सर्वोदयात न बसणारे असे काही नाही. फक्त औरंगाबादच्या भाषणात मी ही कल्पना मांडली त्यात हे अभिप्रेत नव्हते. अभिप्रेत हे होते, की

पदयात्रिकांनी गावात जायचे, सोनखत गोळा करायचे, त्याचा लिलाव करून येणारे पैसे हॉलंडच्या मुलांना खाऊ म्हणून पाठवायचे. सभेनंतर कार्यकर्त्यांमध्ये जी चर्चा झाली त्यावेळीसुद्धा सोनखत गोळा करण्याचा हा विचार अधिक स्पष्ट झाला. या चर्चेत मोकाशी यांनीही भाग घेतलेला होता. असे असताना 'आपलीच विष्ठा आपण गोळा करण्याचा' श्लेष मोकाशींनी का काढावा? मूळ कल्पना अधिक किळसवाणी (बीभत्स) करून मांडण्यात निश्चितच थोडा खवचटपणाचा भाग आहे.

एखादा माणूस प्रायश्चित्त भोगायला तयार होतो, तेव्हा इतरांचा अवमान होतो ही तर भलतीच उफराटी समजूत आहे. प्रायश्चित्त म्हणजे कृतकर्माच्या आपल्याला वाटणाऱ्या पश्चात्तापातून उद्भवलेली कृती. यात इतरांच्या अवमानाचा प्रश्न येतोच कुठे? हॉलंडच्या मुलांनी आपल्याला मदत करण्यासाठी एक दिवस उपाशी राहणे हे मी आपल्यावरील ऋणच मानले होते. ही कृतज्ञतेची भावना भाषणात व नंतर माणूस अंकात व्यक्तही केली होती. माझा राग होता व अजूनही आहे तो अशा 'क्रूर' मार्गाने गोळा झालेली मदतही कोडगेपणाने, निर्लज्जपणाने ज्यांनी स्वीकारली त्यांच्यावर. म्हणजे पर्यायाने शेवटी आपला आपल्यावरच. म्हणून प्रायश्चित्ताची योजना. आपल्या हातून घडलेल्या, आपल्या सुसंस्कृतपणाला न शोभणाऱ्या एका लाजिरवाण्या कृतीचे हे परिमार्जन. हा त्या हॉलंडच्या निष्पाप बालकांचा अवमान कसा ठरतो हे अजूनही माझ्या ध्यानात येत नाही. आपण एखाद्या व्यसनातून मुक्त होण्याचे ठरविले, मोहाला बळी पडलो तर एखादी शिक्षा नक्की केली, तर त्यामुळे पूर्वी ज्यांच्या सहवासात व्यसनाचा आनंद लुटला त्यांच्या मैत्रीचा अवमान होतो, हे तर्कशास्त्र औरच म्हटले पाहिजे.

शिवाय मी स्वीकारलेल्या पर्यायातून दोन गोष्टी साध्य होण्यासारख्या होत्या, ते वेगळेच. अशी लाजिरवाणी मदत स्वीकारण्याचे 'पाप' आपल्या हातून पुन्हा घडू नये हा विचार लोकांसमोर ठेवला जात होता; तसेच ज्या परिस्थितीमुळे हे पाप आपल्या हातून घडले ती अन्नधान्य तुटवड्याची परिस्थिती सुधारण्याचा एक उपायही सहज सूचित होत होता. प्रायश्चित्तही घेतले जात होते. अन्नस्वावलंबनाचा सर्वांना सहज उपलब्ध असा एक पूरक व छोटासा कार्यक्रमही मांडला जात होता. अशा या 'योगकर्मा'ला मोकाशींनी 'नीचकर्म' ठरवावे याचे सखेद आश्चर्य वाटते.

हे योगकर्म सर्वोदयी मंडळींना आवडले हेही मोकाशी यांना खटकले. मोकाशी यांच्या मताप्रमाणे सर्वोदयात सफाई हे एक पुण्यकर्म. सर्वांना एका समान पातळीवर आणणारा शुद्ध आनंद. वास्तविक हीही मोकाशींनी सर्वोदयातील शुद्ध अध्यात्मिक सफाई कल्पनेला दिलेली 'सूक्ष्म 'समाजवादी' कलाटणीच आहे. अशी कलाटणी कोण देत नाही? कल्पनाशक्ती जिवंत असल्याची ही वास्तविक एक खूणच आहे. जुन्या चरख्याला गांधीजींनी 'राष्ट्रवादी' कलाटणी दिलीच की नाही? विनोबांचा काशीचा अनुभवही मोकाशींनी बारकाईने का तपासला नाही? विशिष्ट तऱ्हेचे

संडास शोधून काढलेल्या गृहस्थाच्या (नासिकचे नारवेकर, नाव बहुधा मोकाशी विसरलेले दिसतात) मुलाखतीद्वारा मोकाशींनी हा अनुभव सांगितलेला आहे. मोकाशी लिहितात, ' विनोबा काशीस गेले असता रस्त्यावरील हगलेले चुकवीत त्यांना गंगेकडे जावे लागले. क्षेत्रातल्या या घाणीचे त्यांना रडू आले... विनोबांनी गंगेवरचा तो अनुभव घेतल्यावर तेथेच प्रतिज्ञा केली, की येती तीस वर्षे आपण सफाईचे काम हाती घेणार ' (पृ. १४९) म्हणजे ' सर्वांना समान पातळीवर आण-णारा शुद्ध आनंद ' ही सफाईमागची मोकाशींना अभिप्रेत असलेली सर्वोदयाची भूमिका विनोबांचीही नाही. म्हटले तर विनोबांनीही सफाईला दिलेली ही एक धार्मिक व राष्ट्रीय कलाटणीच आहे. पुढे तर भूदान-पदयात्रा खंडित करून विनोबा दोन महिने काशीत सफाईसाठी ठाण मांडून बसलेले होते. सफाई हा एक केवळ शुद्ध आनंदाचा मामला असता तर काशीलाच ठाण मांडण्याचा विनोबांनी तरी हटवाद का धरावा ? त्यासाठी पदयात्रा खंडित का करावी ? कुठेही त्यांना सफाईचा हा निर्भेळ आनंद उपभोगता येऊ शकत होता. पण नाही. समाजमनाला त्यांना कुठेतरी डिवचायचे होते, एक जोरदार धक्का द्यायचा होता. तेव्हा असे म्हणणे भाग पडते, की मोकाशींनी सर्वोदयही नीट समजून घेतलेला नाही; राष्ट्रवाद या प्रेरणेविषयी तर त्यांचे अज्ञान व पूर्वग्रह गाढच आहे. मी इतकेच येथे सुचवू शकतो, की मोकाशींनी गांधी-विनोबांचे राष्ट्रवादासंबंधीचे लिखाण तरी एकदा वाचण्याची तसदी घ्यावी.

गांधी-विनोबांच्या राष्ट्रवादी प्रेरणांपासूनही जिथे मोकाशी इतके दूर आहेत, तिथे सावरकरांचे हाल तर काय सांगावेत ! तरी थोडा नमुना पाहायला हरकत नाही. पृष्ठ १३७ वर मोकाशी लिहितात–

' आमच्या आधीच्या व आमच्या पिढीवर सावरकरांचा प्रभाव पडावा हे ठीक होते. पण स्वातंत्र्यानंतरच्या पिढीवर (माजगावकरांवर) हा प्रभाव का पडावा हे मला कळेना. पण तो प्रभाव दिसत होता खरा.

आणि आता इथे विनोबांच्या पद्धतीने, लोकांतून हिंडत असतानाही, लोकांशी एकरूप झाल्याची भावना माजगावकरांनी मला कधी दिली नव्हती याचे कोडे सुटले. लोकांत न मिसळण्याचा सावरकरांचा दोषही त्यांनी उचलला होता.'

प्रथम सावरकरांच्या प्रभावाचा मुद्दा घेऊ. सावरकरांची दोन रूपे आहेत. एक क्रांतिकारक,स्वातंत्र्यवीर सावरकर.दुसरे हिंदुराष्ट्राचे पुरस्कर्ते सावरकर.मोकाशींच्या किंवा माझ्याच पिढीवर काय, पुढच्या अनेक पिढ्यांवर क्रांतिकारक व स्वातंत्र्य वीर सावरकरांचा प्रभाव राहणार आहे. कालपरवाच्या चौदा दिवसांच्या युद्धातही सावरकरद्वेष्टया शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या नभोवाणीवर सावरकरांच्या कविता आणि नाटके एकदम वाजू लागली होती हे मोकाशींना रेडिओशी त्यांचा

पृष्ठ ६० वर

मुल्क यशवंतरावका, अंमल इंदिराजीका

# पुणे....कऱ्हाड....कोल्हापूर खळबळजनक दौरा

**शरद कृष्णन्**

जनरल नियाझी यांनी शस्त्रे खाली ठेवली. डाक्का पडले. देशभर आनंदाची लाट उसळली आणि या लाटेवर स्वार झालेल्या महामंत्र्यांनी एकतर्फी युद्धबंदीची नाट्यपूर्ण घोषणा करून त्यांच्या नेहमीच्या 'धक्का' प्रयोगाचा आणखी एकदा अचूक वापर केला. युद्धआघाडी थंडावल्यावर बाईंचे लक्ष देशांतर्गत राजकारणावर, म्हणजेच स्वाभाविकपणे आगामी विधानसभा निवडणुकांवर केंद्रित झाले. मध्यावधी निवडणुकीतील नेत्रदीपक यशानंतर बाईंचे निर्विवाद नेतृत्व सिद्ध झालेच होते. पाकवरील विजयाने त्यांच्या नेतृत्वाला अशी काही झळाळी प्राप्त झाली, की इच्छुक मंडळींना आवाज करण्यास जागाच राहू नये. परंतु बाई एवढ्याने संतुष्ट नाहीत. विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने बाई महाराष्ट्रातील प्रस्थापित नेतृत्वाला जोरदार धक्का देणार याची जाणकारांना कल्पना होतीच. यशवंतराव दिल्लीत असले, आणि 'सध्या' त्यांनी 'नंबर दोन'ची जागा मान्य केली असली, तरी एखादी गोष्ट थंड करून खाणाऱ्या आपल्या या सहकाऱ्याला उसंत घेऊ देण्यास बाई मुळीच तयार नाहीत. साहेबांची दिल्लीतील ताकद, महाराष्ट्रातून त्यांना मिळणाऱ्या एकमुखी पाठिंब्यावर आहे हे बाई ओळखून आहेत. चव्हाणांना नको असलेली प्रत्येक गोष्ट कटाक्षाने करून त्यांचा पाणउतारा करण्याची एकही संधी बाईंनी सोडलेली नाही. अगदी मध्यावधी निवडणुकांनंतरही त्यांनी हे धोरण लक्षात यावे इतक्या ठळकपणे कायम ठेवले आहे. राज्यसभेच्या मोकळ्या जागेवर साहेबांना कुमारे हवे होते. बाईंनी अखेरच्या क्षणी हात घालून श्रीमती देसाईंची वर्णी लावली. तुळशीदास जाधव महाराष्ट्र प्रदेशला अत्यंत अप्रिय, तर ते बाईंच्या खास मर्जीतले. निवडणुकीत त्यांना तिकीट नाकारले गेले, तरी बाईंनी त्यांची

कमिशनवर वर्णी लावून भरपाई करून दिली. शिवाय 'ओरिजनल फोरम 'चा खुळखळा त्यांच्या हाती आहेच. रघुनाथराव खाडिलकर, आनंदराव चव्हाण, हरीभाऊ गोखले ही चव्हाणांना नको असलेली मंडळी मंत्रिमंडळामध्ये स्थिरावली. चव्हाण, विरोधी म्हणून त्यांचा ' आब ' व्यवस्थित राखला जात आहे.

वसंतराव नाईक, बाईंना कधीच प्रिय नव्हते. आणि जमीन धारणेबाबतचे त्यांचे विचार आणि समाजवादाच्या त्यांच्या कल्पना बाईंना कधीच रुचल्या नाहीत. त्यात वसंतराव कट्टर यशवंतनिष्ठ असल्याने ७२ नंतरचे त्यांचे भवितव्य ठरून गेल्यासारखे होते. घटना कशा घडतात याची उत्सुकता होती. निवडणुकीनंतरच्या महाराष्ट्रातील नेतृत्वाबाबत चव्हाणांनी महाराष्ट्रातच काहीतरी बोलावे, किंबहुना ते आपले विचार आहेत असे भासले तरी चालेल इतकी दक्षता घेऊन बाईंनी थोडीफार चर्चा केली असावी. त्या चर्चेच्या आधारे दुष्काळाच्या निमित्ताने आलेल्या यशवंतरावांनी वसंतरावांच्या नावाची द्वाही औरंगाबादेत फिरवली आणि अपेक्षेप्रमाणे वादळ उठले. दूर दिल्ली मुक्कामी असलेल्या बाई प्रत्येक घटिताची नोंद ठेवत होत्या. युद्धाच्या तोफा थंडावल्या-बरोबर बाईंचे लक्ष पुन्हा महाराष्ट्रावर केंद्रित झाले. त्यांच्या आशीर्वादाने पार्लमेन्टरी बोर्डावरील विनायकराव पाटील व आबासाहेब खेडकर यांच्या निधनाने रिकाम्या झालेल्या जागेचा वाद रंगू लागला होता. शंकरराव चव्हाणांची मोर्चेबंदी झाली होती. निवडणुकीनंतरच्या नेतृत्वाच्या दिशेने घटना घडत होत्या. आणि महा-मंत्र्याच्या महाराष्ट्राच्या एक दिवसाच्या दौऱ्याची घोषणा झाली.

जखमी जवानांना भेटण्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या दौऱ्याची उद्दिष्टे सरळ सरळ राजकीय होती. एक दिवसाच्या या दौऱ्यात बाई पुण्याखेरीज फक्त कऱ्हाड-कोल्हापूर करणार होत्या. दौऱ्याची ही ठिकाणेही बाईंच्या भेटीचा उद्देश स्पष्ट करणारी होती.

महामंत्र्यांचा हा दौरा केवळ एक दिवसाचा. पण त्याची आखणी, मोठ्या खुबीने करण्यात आली होती. बाईंच्या दौऱ्याचा उद्देश प्रदेश काँग्रेसला ज्ञात नव्हता असे म्हणणे वेडेपणाचे ठरेल. महामंत्र्याभोवतालची मंडळी पहा. प्रदेश काँग्रेस आणि यशवंतराव चव्हाण यांनी दुर्लक्षिलेले माजी खासदार कोल्हापूरचे शंकरराव माने, आणि ज्यांचे नुसते नाव काढले तरी प्रदेश काँग्रेसच्या तळपायाची आग मस्तकाला जाते ते तुळशीदास जाधव बाईंच्याबरोबर विमानात बसून आले. साहेबांच्या कऱ्हाडमध्ये बाईंचे स्वागत केले, आनंदराव चव्हाण आणि यशवंतराव मोहिते यांनी आणि साहेब-साहेब दिल्लीत बसून निरीक्षण करीत होते. कोल्हापूरला बाईंच्या भोवती मध्यावधी निवडणुकीमध्ये रत्नाप्पा कुंभार आणि त्यांचे सहकारी. शिवाय माने होतेच. विधानसभेसाठी कोल्हापूरचे उमेदवार ठरवले जात असताना-कुंभार गटाचे बी. एस्. पाटील, मातंग गुरुजी, आदी मंडळींची वर्णी लागल्यास आश्चर्य वाटू नये.

खडकी आणि वानवडी, येथील लष्करी रुग्णालयांना वृत्तपत्रांच्या छायाचित्र-कारांसह भेट, आणि कोल्हापूर व पुणे येथील जाहीर सभा हे दौऱ्याचे उपांग व्यवस्थित पार पडले. बाईंच्या विलक्षण लोकप्रियतेची चुणुक, प्रदेश काँग्रेसला निश्चितपणे जाणवली. अगदी जाता जाता बाईंनी पार्लमेंटरी बोर्डाचा मुख्य विषय काढला. आणि इथे निर्णय घेता येण्यासारखा नसल्याने दोन वसंत आणि बाळा-साहेब देसाई, यांच्यासह बाई दिल्लीस रवाना झाल्या. नांदेडला असलेल्या शंकर-राव चव्हाणांना दिल्लीत हजर होण्याचा हुकूम सुटलाच होता. बरोबर पार्लमेंटरी बोर्डाच्या जागेचे त्यांचे उमेदवार बाबूराव काळे यांनाही आणा असा आदेश होता. यशवंतराव चव्हाणांचे महाराष्ट्रातील नेतृत्व पद्धतशीरपणे उखडण्याच्या पहिल्या पर्वाला सुरुवात झाली होती. साहेबांचे निर्विवाद नेतृत्व प्रस्थापित झाल्यावर प्रदेश काँग्रेसचे प्रश्न दिल्लीत सोडवले जाण्याची ही पहिलीच वेळ होती. चर्चेमध्ये सह-भागी झालेल्या मंडळींना शंकरराव चव्हाणांवरील लोभ बाईंच्या वागणुकीत स्पष्ट दिसत होता. सरळ पंतप्रधानांशी संपर्क ठेवणारे नेतृत्व महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान करण्याच्या दृष्टीनेच या हालचाली होत्या. वसंतदादा, वसंतराव नाईक, शरद पवार, सर्व मंडळी आपण बाईंच्या शब्दाबाहेर नाही असे ठासून सांगत होती. आणि साहेबांच्या कानावर उमाशंकर दीक्षितांमार्फत निर्णय कळवण्याचे 'सौजन्य' दाखवून बाईंनी वादग्रस्त ठरलेल्या पार्लमेंटरी बोर्डाच्या दोन जागांसाठी बाबासाहेब सवनेकर व वर्धा येथील बापूराव देशमुख या शंकरराव चव्हाण यांच्या नावांना आपली संमती दर्शविली.

## अखेरची फेरी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे हे पार्लमेंटरी बोर्ड ११ जणांचे असते आणि निवड-णुकीच्या वेळी तिकिटाबाबत अंतिम शिफारस करण्याचे काम या बोर्डाकडे असते. आता या बोर्डावर नाईकांशी एकनिष्ठ (निदान अद्यापतरी) असलेले शेषराव वानखेडे, मधुकरराव चौधरी व नासिकराव तिरपुडे हे मंत्रिगण आहेत. स्वतः नाईक आणि यशवंतराव हे अर्थातच सभासद आहेत. वसंतदादा पाटील यांचा निश्चित भरवसा नाही. बाळासाहेब देसाई, बाईंकडे बघून निर्णय घेतील, शिवाय वैयक्तिक अपमानाची बोच अद्यापी तीव्र आहेच. स्वतः शंकररावांखेरीज पी. के. सावंत आणि आता बाबासाहेब सावनेकर व बापूराव देशमुख, ही मंडळी शंकर-रावांचा पाठपुरावा करतील. म्हणजे काँग्रेस संसदीय मंडळामध्ये दोन्ही बाजूंची ताकद जवळ जवळ तुल्यबळ आहे. शिवाय बाईंचा सक्रीय पाठिंबा शंकररावांना मिळणार हे स्पष्टच दिसते आहे. निवडणुकीनंतरचे विधानसभेतील चित्र चार-दोन 'सिटा' इकडे तिकडे होण्याखेरीज बदलणार नाही. हे विरोधी पक्षांसुद्धा सर्वजण ओळखून आहेत. स्वाभाविकपणे या काँग्रेसअंतर्गत साठमारीवर विरोधी पक्ष बारीक लक्ष ठेवून आहेत. आता तिकीट-वाटपाचे वेळी प्रत्येक टोपीची 'बाजू' काळजीपूर्वक

पाहिली जाईल. आणि मग तिकिटाचे शिक्कामोर्तब होईल. यशवंतरावांच्या नेतृत्वाची ताकद त्यांनी जोपासलेल्या महाराष्ट्रातील समर्थ वटवृक्षामध्ये सामावलेली आहे ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन बाई आता मुळावर घाव घालण्यास उभ्या आहेत. बाईंच्या आशीर्वादाने यशवंतरावांसमोर आवाज करण्याइतकी हिम्मत ज्यांच्यामध्ये निर्माण झाली आहे, अशा आणि मुख्यमंत्रीपदाची तीव्र महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या शंकरराव चव्हाणांना बाई टेकू देऊन उभे करीत आहेत. चव्हाणांविरुद्धच्या लढाईला अखेरचे तोंड लागले आहे. डायरेक्ट बाईंशी 'लॉयल' असलेला मुख्यमंत्री 'वर्षा' मध्ये आला, की बाईंच्या इच्छेने आणि त्यांची इच्छा असेपर्यंतच चव्हाणांचे दिल्लीतील स्थान टिकून राहणार आहे.

ब्रह्मानंद रेड्डी आणि मोहन सुखाडिया हे स्वयंप्रकाशी मुख्यमंत्री पंतप्रधानांनी पूर्वीच निष्प्रभ केले आहेत. दिल्लीत तर आपली सत्ता हवीच, पण प्रांताचा मुख्यमंत्री आणि प्रांतिक काँग्रेसचा अध्यक्ष हा आपलाच मनुष्य असला पाहिजे अशी बाईंची इच्छा आहे. अन्य प्रांतात या दिशेने बदल घडून आले आहेत. या सर्व प्रकरणामध्ये अखेरीस वसंतरावांची शोकांतिका होणार आहे. वैयक्तिक निष्ठा शेवटपर्यंत कायम ठेवणारे गुजराथचे हितेंद्र देसाई आणि म्हैसूरचे वीरेन्द्र पाटील यांच्या वाट्याला जो विजनवास आला, तोच वनवास वसंतरावांच्या वाट्याला येण्याची शक्यता वाटते.

महाराष्ट्रातील विधानसभेची आगामी निवडणूक सरळ सरळ काँग्रेसच्या खिशात जाणारी असली, तरी यशवंतरावांना नामशेष करण्याच्या दृष्टीने बाईंनी टाकलेले हे पाऊल मोठे अभ्यसनीय ठरणार आहे. काही प्रमुख वृत्तपत्रांनी या सर्व प्रकरणाचे स्वरूप कितीही सौम्य केले तरी बाईंच्या महाराष्ट्राच्या धावत्या दौऱ्यानंतर गतिमान झालेल्या या घटनांमध्ये सध्या तरी वसंतराव नाईकांना दूर करून यशवंतरावांच्या राजकीय कारकीर्दीला आव्हान देणारी बीजे निर्विवादपणे दिसत आहेत.

□ □ □

---

लेखक–कवींनी साहित्यासोबत नव्या दराप्रमाणे पुरेसे टपाल-हशील पाठवावे. अन्यथा पत्रव्यवहार करणे शक्य होणार नाही. –सं.

---

रवींद्र पिंगे



# घायाळतळ अश्विनी

मुंबई म्हणजे घाई, गर्दी, गोंधळ आणि गोंगाट. तिची घोंघावणारी दक्षिण हद्द कुलाब्याच्या आर. सी. चर्चपाशी संपते. तिथून पुढे विलक्षण शांत, त्रिनवर्दळीची प्रसन्न मुंबई सुरू होते. पाच पावलं अलीकडे येऊन म्यूझियमच्या चौकात उभं राहिलं तर पलीकडे दक्षिणेला निवांत, रम्य असा मुंबईचा काही मोकळा भाग असेल याची कल्पनाही येत नाही. पण आहे; आर. सी. चर्चच्या गेटापलीकडे, रानात तळं असावं तसा लष्करी वसाहतीने व्यापलेला अगदी नीरव निःशांत, मोकळा असा वाऱ्याचा टापू आहे. खूप मोठी मोकळी मैदानं आहेत. त्यांच्या कडेला प्रशस्त दगडी इमारती आहेत. त्यांचा तोंडवळा लष्करी परंपरेशी मिळताजुळता आहे. उंच वाढलेली वडाची झाडं आहेत. प्रशस्त सडका आहेत. वर निळं भोर आभाळ आहे. ऐन मुंबईत आभाळाकडे कुणाचंच लक्ष जात नाही. कुलाब्याच्या दांडीच्या या खडकाळ परिसरात प्रथम लक्ष जातं ते आभाळाच्या निळ्या विस्तीर्ण घुमटाकडे. आभाळाचा इतका मोठा तुकडा इतर कुठेच हाताला लागत नाही आपल्या. इथे त्याचं ते निळं सोंग आपल्या सोबतीलाच असतं.

ती सोबत घेऊन मी सडक तुडवीत एका लष्करी गेटापाशी येतो. गेटाला खेटूनच एक आंबा आरपार मोहरून आला आहे. माझं लक्ष त्या दाणेदार तांबूस मोहराने खेचून घेतलं आहे. गेटापलीकडे गर्द झाडीत झाकलेल्या दगडी इमारती आहेत. पांढऱ्या सफेत गणवेशातल्या नर्सेसची धावपळ इमारतीच्या कॉरीडॉर्समधून चाललेली आहे. ढकलगाड्या, ॲम्ब्युलन्स गाड्या, स्ट्रेचर्स सर्व काही दिसतंय. हे इस्पितळ आहे हे कुणी वेगळं सांगण्याची गरजच नाही. पण ती असो, अगर नसो. पाटी लावलेलीच आहे– I. N. H. S. ASVINI.

अश्विनी हे नौदलाचं इस्पितळ मुंबईतच कुठे तरी आहे, इतपत ओझरती माहिती होती. नावही वर्तमानपत्रात भेटायचं. अलीकडे तर वारंवारच. एकदा वाटलं ही नौदलाची तरंगती नौका बंदरातच कुठे तरी नांगरून ठेवलेली असेल आणि तिच्यावर नौदलाचं तरंगतं इस्पितळ असेल. ती कविकल्पनाच ठरली.

कुलाब्यातल्या जमिनीवरल्याच एका इस्पितळाचं ते नाव आहे. फक्त ते नौदलाच्या अखत्यारीत असल्यामुळे त्याला इंडियन नेव्हल हॉस्पिटल शीप अश्विनी असं नौका-सदृश्य नाव दिलेलं आहे. देहूरोड, खडकी वगैरे भागात जशा उग्र भासणाऱ्या लष्करी इमारती आहेत, तशाच ह्या प्रशस्त आणि गार इमारती आहेत. लांबून त्यांची भीती वाटते. पण तशा त्या घरेलू आहेत. कुणाही नागरिकाला गेटावर रीतसर परवाना काढून आतल्या रुग्णांना भेटता येतं; रुग्णांपाशी धीराचे चार शब्द बोलून त्यांना दिलासा देता येतो; नव्हे, आपल्यातला माणूस अजून शिल्लक आहे याचा दिलासा घेता येतो.

वाटाड्याने चुकून मला थेट अश्विनीच्या गच्चीत नेलं! त्याचे पुनःपुन्हा आभार. कारण त्यामुळेच सभोवारच्या निसर्गाचं विहंगमदर्शन अनायासे घडू शकलं, जे एरव्ही केवळ दुष्प्राप्यच आहे. एका बाजूला मावळतीच्या उन्हाचा तवंग अरबी सागराच्या गढूळ फाळावर पसरलेला आहे. इमारतीच्या पिछाडीला खडकाळ चौपाटी आहे. दुसऱ्या अंगाला गर्द झाडीत झाकलेली निर्मनुष्य मैदानं आणि बराकी आहेत. गच्चीच्या वर आजूबाजूच्या झाडांच्या गच्च फांद्या डोकावल्या आहेत. त्यांच्या हिरव्या जर्द पर्णराजीत पोपटांची वस्ती आहे.

मी जड मनाने खाली येतो. इस्पितळातले प्रशस्त गाळे कॉलेजच्या जुन्या दगडी इमारतीतल्या वर्गांच्या प्रशस्त खोल्यांसारखे ऐसपैस नि काळोखी वाटतात. एक गोष्ट मात्र जिवाला दिलासा देते. ती म्हणजे, नाताळच्या सणाची संधी साधून रुग्णांना भेटायला येणाऱ्या मंडळींनी सर्व गाळयांना रंगीबेरंगी तोरणं बांधली आहेत. कलाबूतीने मढवलेल्या हिरव्या रंगाच्या 'ख्रिसमस ट्री' कोपऱ्यात उभ्या केल्या आहेत. एरव्ही, इतरत्र इस्पितळात असतं तसंच मन नाऊमेद करणारं वातावरण आहे. घायाळ जवान अंगावर पांघरुणं ओढून घेऊन दुतर्फा खाटांवर पडले आहेत.

दुःख, विषाद, एकाच्याही चेहऱ्यावर नाही! पण मी पाहतो आहे, चौदा दिवसांच्या प्रतापी युद्धाचा जबर तडाखा प्रत्येकाला बसला आहे. बहुतेकांच्या पायांना इजा झाल्यामुळे गुडघ्याखालच्या नळकंड्यापासून पाय कापले आहेत.

'तुमचं नाव काय?'

'जाधव.'

'कुठले राहणारे?'

'कोल्हापूर.'

'पायाला काय झालं?'

'सुरुंग लागला. मी पायदळात जवान आहे.'

'सुरुंग कसा असतो?'

'हपीसर लोकांच्या टेबलावर टांचण्या टोचायचं पिन-कुशन असतं ना, तसा त्या प्रकाराचा लहानसा सुरुंग असतो.'

'तो जमिनीत पुरून ठेवतात?'

'नाही जमिनीवर नुसता टाकून ठेवतात. दगडधोंडे जमिनीवर जसे पसरलेले असतात, तसेच सुरुंगाचे गोळेही पसरून ठेवलेले असतात. त्यांना पाय लागला की स्फोट होतो आणि पाऊल घोटयापासून निखळून तरी पडतं, किंवा त्याच्या चिध्या तरी होतात. तत्काळ माणूस बेशुद्ध पडतो. खरं म्हणजे नेमकं काय झालंय ते कळतच नाही. सबंध अंग रक्ताने माखून निघतं.'

'तुम्ही नीट जपून पावलं का टाकली नाहीत? सुरुंग ओलांडून जायचं की. पाय वाचला असता तुमचा.'

'आगेकूच रात्रीची करताना पावलं सुरुंगावर पडतात. रात्री मिट्ट काळोखात पायाखालचं काय दिसणार?'

'आगेकूच करताना समोरून शत्रूचा गोळीबार होईल अशी धास्ती वाटत नाही?'

'छे! धास्तीचं काय काम? आम्हाला समोर शत्रूचा तळ दिसत असतो. संगिनी रोखून त्यांच्यावर चाल करीत रहायचं एवढंच आपलं काम.'

'तुम्हाला नेमक्या कुठल्या दिशेने आगेकूच करायची आहे हे कसं कळतं?'

'प्रत्येक तुकडीबरोबर वायरलेस सेट घेतलेले जवान असतात. ते अधिकाऱ्यांशी सतत दळणवळण ठेवत असतात. शत्रू नेहमी वायरलेस सेट निकामी करण्यासाठी गोळीबार करीत असतो. तो चुकवायचा.'

'नुसतं पायदळच आगेकूच करीत असतं?'

'तो एक व्यूह रचलेला असतो. पण बहुधा पायदळच मुलुख पादाक्रांत करीत पुढे पुढे जात असतं आणि त्यांच्यावर विमानं संरक्षणासाठी तरंगत असतात. समोर शत्रूचे रणगाडे असतात. विमानं त्या रणगाड्यांवर झेप घेऊन जोरदार बॉम्बफेक करतात.'

'पायदळांच्या डोक्यावर आपली विमानं किती उंचीवर असतात?'

'अगदी जवळ असतात. कधी कधी चाळीस-पन्नास फूटावरही घोंघावत असतात. प्रचंड आवाज होत असतो. आम्हाला त्यांच्या सावलीत पुढे पुढे जायचं असतं. आम्ही आमचा दारुगोळा घेऊन आगेकूच करीत असतो.'

'तुमच्या जेवणाखाणाची काय सोय असते?'

'प्रत्यक्ष लढाई चालू असताना जेवण-खाण कुणाला सुचणार? जे काही हाती लागेल ते आम्ही तोंडात कोंबतो. सुकं तर सुकं; ओलं तर ओलं.'

'तरीसुद्धा सैन्याची म्हणून काही व्यवस्था असेलच.'

'असतेच. जेव्हा आम्ही आगेकूच करतो, तेव्हा मागे स्वयंपाक रांधणारं पथक असतंच. ते भराभर खंदक खणतात आणि खंदकात चुली पेटवून रात्रीच्या वेळी पोळीभाजी तयार करतात.'

'रात्री का ?'

'कारण दिवसा उजेडी स्वयंपाक केला तर शत्रूला धूर दिसेल आणि तो गोळीबार करेल. रात्री खंदकात जेवण केल्यामुळे आगीच्या उजेडाचे किरण लांबून दिसत नाहीत. म्हणून आघाडीवरला स्वयंपाक रात्रीच्या काळोखातच तयार होतो.

'आघाडीवर प्रकाशबंदी सक्त असेल, नाही ?'

'साध्या सिगरेटचा झुरका रात्रीच्या काळोखात मारला तरी ठिणगीचा नेम टिपून शत्रू समोरून गोळी सोडतो ! मग प्रकाश दिसला तर काय होईल ?'

'पाय दुखतो आहे ?'

'थोडासा. पण चार-आठ दिवसात बरा होईल.'

'घरी मंडळींना कळवलंय ?'

'नाही. निष्कारण त्यांची धावपळ होईल.'

ही सारी उत्तरं एकाच जवान जाधवाची नाहीत. अनेकजण एकाच वेळी बोलत होते, त्याची ही गोळाबेरीज आहे. जायबंदी झालेले जवान अनेक आहेत. पण त्यांच्या धमण्यातल्या रक्ताची रग एकच आहे. डरपोक कुणीच नाही. बहुतेक पश्चिम आघाडीवर जखमी झाले आहेत. जखमी झाल्यावर मागच्यांनी त्यांना ट्रकमध्ये घातलं, सरहद्दीमागे प्रथमोपचार केले. आता अवघड शस्त्रक्रियांसाठी अश्विनीत आणलं आहे. सर्वांवर उत्तम औषधोपचार झालेले आहेत. होत आहेत.

प्रत्येक खाटेजवळ मी विचारपूस करीत हिंडतो आहे. बहुतेकजण पंजाबी आहेत. सर्वांच्या खाटेशेजारी बारकेसे कपाट आहे. कपाटावर जेवणाच्या चकचकीत थाळ्या आहेत. एखादं फळ आहे. शुभेच्छा कार्ड आहेत. मी ती कार्डं पाहातो. मुंबईतल्या शाळा-कॉलेजातल्या मुलामुलींनी अनामिक जवानांना ती अगत्याने पाठविली आहेत. अनेकांजवळ माश्यांना हकलून देण्याचे पंखे आहेत. पन्नास-साठ जवानांपैकी फक्त एकजण वाचनात गर्क आहे. त्यातल्या ओळींवरून ते बहुतकरून धार्मिक पुस्तक असावे. आणखी एकाच्या शेजारी गीता आहे. एकाच्या हातात हिंदी कादंबरी आहे. विव्हळणं वगैरे अजिबात नाही. मात्र एक जवान डोक्यावरून गरम पांघरूण ओढून घेऊन उपडा पडलेला आहे. आपल्या वेदना इतरांपासून लपवून ठेवण्याची त्याची ती धडपड पाहून मी सुन्न होतो.

'तुमचं नाव काय ?'

'भट्टाचार्य.'

'कुठे जखमा झाल्यात ?'

'दोन्ही दंडात मशीनगन्सच्या गोळ्या घुसल्याहेत.'

'दुखतंय ?'

'नाही.'

'भीती वाटते ?'

'भीती काय म्हणून वाटेल ? ही काय पहिली वेळ थोडीच आहे ? मी तीन युद्धं पाहिली आहेत. डरनेसे क्या होगा ?'

'बरं झाल्यावर पुन्हा पलटणीत जाणार ?'

'घेतलं तर जाणारच.'

'तुम्ही कुठे लढत होता ?'

'बांगला देशात.'

'काय अनुभव आला ?'

'पाकिस्तानी सैनिक फारच क्रूर आहेत. ते हालहाल करून मारतात. त्यांनी बायाबापड्यांना नागवं करून कोंडून ठेवलं. आमच्या तुकडीतल्या शीख जवानांनी त्यांना अब्रू राखण्यासाठी आपले फेटे दिले!'

'तुम्ही काय केलंत ?'

'पुरेपूर ठोक दिला एनेमीला.'

'आणि, तुम्ही कुठले ?'

'बेळगावचा.'

'तुम्हाला कुठे लागलंय ?'

'पोटात.'

'गोळी काढली ?'

'गोळी नव्हती. बॉम्बचा तुकडा पोटात घुसला.'

'दुखतंय ?'

'त्यावेळी जाम कोसळलो. आता बरं आहे.'

'बरं झाल्यावर पलटणीत जाणार ?'

'दोन वर्षांसाठी गेलंच पाहिजे.'

'म्हणजे ?'

'माझी तेरा वर्षांची सेनेतली नोकरी झालेली आहे. आणखी दोन वर्षं काम केलं की पंधरा वर्षं पुरी होतील. सेनेत पंधरा वर्षांच्या सर्व्हिसनंतर पेन्शन मिळू शकतं.'

'तुम्ही पेन्शनीत जाणार तर.'

'हो. आमची जमीन आहे. मुलंही हातातोंडाशी आली आहेत. तेव्हा आपण आपले घरी जाणार नि शेती करणार शांतपणे.'

'काही हरकत नाही. तेही देशाचंच काम आहे.'


घायाळ रुग्णांची चौकशी करीत मी हिंडतच आहे. काही जवानांच्या भोवती त्यांच्या गरीब नातेवाइकांची कोंडाळी आहेत. कुणाचेच कपडे धड नाहीत. सगळेच गावाकडचे खेडूत वाटतात. पण बहुतेकांनी येताना केळी, मोसंबी आणली आहेत. एका पाय तुटलेल्या जवानाजवळ त्याचे म्हातारे आई-वडील बसलेले आहेत. तो

जखमी पाय दाखवून त्यांना काहीतरी समजावून देतोय. चेहऱ्यावर विषादाची अस्पष्ट छटासुद्धा नाही. आई-वडिलांचे डोळे सुकलेले आहेत. मला त्यांच्याकडे फिरकवत नाही. पण कुठेतरी मला खोलवर खात्री वाटते आहे, की हा बेटा लाकडी पाय जोडून पुन्हा कामाला लागणार !

असे सुमारे शंभरेक आहेत. कुणाकुणाशी म्हणून बोलणार ? काय बोलणार ? सर्वांच्या वेदनांची भाषा एकच आहे. एनेमीची मान मुरगळण्याची सर्वांनाच तहान लागली आहे. एक सिंधी म्हातारी बाई सर्वांच्या समाचाराला आली आहे. ती एका जवानाला सांगते आहे, 'दादाची इच्छा असेल तसं होईल. माझा मुलगा बासष्ट सालच्या लढाईत शत्रूच्या हल्ल्यातून वाचून परत आला आणि युद्ध संपल्यानंतर विमानतळावर विमानाचा पंखा लागून गेला !'

काळोखाचा खिन्न पक्षी अश्विनीच्या अंगणात उतरत आहे. जड अंतःकरणाने मी बाहेर पडत आहे. मी घराकडे निघालो आहे—मन मागे ठेवून. वर आभाळात पौर्णिमेचा प्रफुल्ल चंद्र उगवला आहे. आकाश उजळलं आहे. मात्र मला कशातच काही रस वाटेनासा झाला आहे. मी हा जो इतका सुरक्षित आहे, त्या सुरक्षिततेचा संदर्भ काय आहे, हा प्रश्न मला छळतो आहे. लष्करी छावणीतल्या शांत सडकेवर गोंधळलेला मी मुंबईच्या गोंधळात एकरूप होत आहे. हे शंभरेक घायाळ त्या तिथे दूरवर काळोखात होते म्हणून मी या चांदण्यातून हात हालवीत घरी सुखरूप परतू शकतो आहे, याचे भान मला आले आहे.

□ □ □



# मुस्लीम महिला परिषद

## दोन प्रतिक्रिया

## एक सोहळा सुंदरसा

**अब्दुल कादर मुकादम**

पुण्यात परिषदा तर नेहमीच भरत असतात. निरनिराळी अधिवेशने झडत असतात. पण मुस्लीम महिला परिषदेचे प्रयोजन या सगळ्याहून पार वे[illegible] होते म्हणूनच तिने पुणेकरांचेच नव्हे तर साऱ्या भारतीयांचे लक्ष वेधून घेतले. एकतर आपल्या देशात अजूनही महिलांच्या चळवळींनी म्हणावा तसा जोर धरलेला नाही, त्यात मुसलमान महिला तर पडदानशीन. गोषांचे पारंपारिक बंधन झुगारून त्या व्यासपीठावर येत आहेत हीच गोष्ट मुद्दलात मोठी थरारक होती. अजूनही काळ असा आहे, की मुस्लिम पुरुषही परंपरेहून वेगळा सूर लावायला फारसे धजत नाहीत. काही युवकांनी असा वेगळा सूर लावला. त्यांना समाजाकडून काय अहेर मिळत आहे हा इतिहास अद्यापि ताजाच आहे. अशा स्थितीत महिलांनी आपली व्यक्तिगत व सामाजिक गाऱ्हाणी समाजपुरुषापुढे मांडण्यासाठी एकत्रित येण्याचा विचार करावा आणि धाडसाने तो अंमलात आणावा ही गोष्ट सोनेरी अक्षरात नमूद करणे भाग आहे.

या परिषदेकरिता (दिनांक २७–२८ डिसेंबर १९७१) निरनिराळ्या प्रांतांतून अनेक महिला आल्या होत्या. एकट्या महाराष्ट्रातूनच दीडशेहून अधिक महिला जमल्या होत्या. त्यात समाजातील सर्व थरांतील महिलांचा समावेश होता. आणि या साऱ्या भगिनींचे स्वागत करण्याकरिता पुणेकर उत्साहाने उभे होते. एखादे मंगल कार्य असावे तशी मंडळी खपत होती. पूनम, श्रेयस सारख्या निवासगृहांपासून तो थेट पोपटलाल हॉलपर्यंत सगळीकडे धांदल उडाली होती. एकात्मतेच्या भावनेतून साऱ्या पाहुण्यांची सोय-गैरसोय पाहण्यात येत होती. केवळ मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे कार्यकर्तेच नव्हे तर पुण्यातील अनेक महिला-संस्था, युवक संघटना इत्यादिकांनी परिषदेच्या तयारीकरता जिवाचे रान केले. आणि हे सारे परोपकाराच्या भावनेने नव्हते, त्यात होता फक्त जिव्हाळा आणि सहकार !

सत्तावीसला सकाळी १० वाजता परिषदेचे उद्‌घाटन झाले. प्रा. अफजल फैजी

उद्घाटक होते. केवळ मुस्लीम कायद्यावरील प्रभुत्वामुळेच नव्हे तर प्रगत आणि आधुनिक विचारप्रणालीमुळे त्यांची निवड योग्य असल्याची खात्री पटली. परिषदेच्या अध्यक्ष म्हणून लाभलेल्या श्रीमती शरिफा तय्यबजी यांची निवडही तितकीच सुयोग्य होती. त्यांचे व्यक्तिमत्त्व जितके आकर्षक तितके तेजस्वी आहे. प्रगत विचार व समाजाच्या नव्या प्रेरणा जाणून घेण्याचा वारसा त्यांना त्यांच्या कुटुंबियांकडून मिळाला आहे. उद्घाटकांच्या व अध्यक्षांच्या भाषणातून या परिषदेच्या यशाची ग्वाही मिळाली. दोघांनाही परिषदेच्या हेतूची जशी जाण होती तशी त्या हेतूची पूर्तता प्रखर विरोधातूनही केली पाहिजे अशी त्यांची धारणा असल्याचे त्यांच्या भाषणावरून स्पष्टपणे जाणवत होते.

परिषद म्हटली, की ठरावही आलेच. पण या परिषदेत मंजूर झालेल्या ठरावांना खास असे महत्त्व आहे. परिषदेच्या कामकाजाचा एक अपरिहार्य भाग एवढेच या ठरावांचे स्थान नाही तर विशाल भारतीय समाजाशी एकरूप होण्यास ज्या मध्ययुगीन धर्मकल्पना या समाजाच्या आड येत होत्या त्यांतून हा समाज मुक्त होत असल्याचे हे एक सुचिन्ह होते. म्हणूनच साऱ्या देशभर या परिषदेचे मन:पूर्वक स्वागत झाले. आतापर्यंत अनेक मुस्लीम सामाजिक व राजकीय संस्थांनी कैक ठराव केले आहेत. परंतु त्यांमागील भूमिका आणि या ठरावामागील भूमिका यात एक मूलभूत फरक आहे. निधार्मिकता व आधुनिक विचार यांचे मर्म जाणून न घेतल्यामुळे अशा संस्थांनी केलेले ठराव म्हणजे लोकांची फसवणूक करण्याचा एक केविलवाणा प्रयत्न या पलीकडे त्यांना काही स्थान नाही. या परिषदेत मंजूर झालेल्या ठरावात मात्र संपूर्ण वास्तववादी भूमिका घेतलेली दिसून येते. ठरावांची भाषा स्पष्ट व नि:संदिग्ध आहे. त्यात कसल्याही तडजोडीला वाव नाही. म्हणूनच ही परिषद एका नव्या वैचारिक क्रांतीची प्रणेती ठरेल असे म्हटले तर वावग ठरू नये.

सर्वांत महत्त्वाचा ठराव समान नागरिकत्वाच्या कायद्यावरील झाला. निधर्मिकतेत समान नागरिकत्व व राजकीय हक्क गृहीत असल्यामुळे घटनेच्या ४४ व्या कलमानुसार भारतातील सर्व जनतेला लागू होणाऱ्या समान नागरी कायद्याची लौकरात लौकर उभारणी करावी असे आवाहन या ठरावात करण्यात आले आहे. अशा तऱ्हेचा सर्वव्यापी कायदा होण्यास अधिक वेळ लागणार असेल तर दरम्यान मुस्लीम नागरिकांसाठी असणाऱ्या सध्याच्या कायद्यातील काही अन्याय्य तरतुदी ताबडतोब रद्द करण्यासाठी शासनाने काही तत्पर पावले उचलावीत असेही ठरावात पुढे म्हटले आहे. समान नागरी कायदा म्हणजे महिलांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न ! साहजिकच अशा ठरावावर बोलण्यास अनेक महिला पुढे सरसावल्या. संयोजकांनीही या ठरावावर बोलण्यास भरपूर वेळ दिला होता. कु. मरियम रिफाई,

पृष्ठ ४९ वर

# शहादे भागातील सर्वोदयाचा 'एक ड्रायव्हर'



## दामोदरदास (भाऊ) मुंदडा

'माणूस' साप्ताहिकाच्या २० नोव्हेंबरच्या अंकात ॲड. तु. ज. पटेल यांचा एक लेख – (वनवासी व वर्गविग्रह) प्रसिद्ध झाला असून त्याच्याच जोडीला, त्यातील दिशाभूल करणाऱ्या वक्तव्याचे जणू निराकरण करणारा दुसराही एक लेख (सर्वोदय आणि शहादे) श्री. विजय वैद्य यांचा प्रसिद्ध झाला आहे. दोन्ही लेख एकत्र छापल्यामुळे ॲड. पटेल यांच्या लेखात एकूण परिस्थितीबाबत गैरसमज निर्माण करण्याचा जो बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला गेला आहे त्याला आपोआपच व परस्परच पायबंद पडल्यासारखे झाले असले तरी त्या लेखातील काही विधाने इतकी विपरीत आहेत, की त्यांची नोंद घेऊन आवश्यक खुलासा करणे कर्तव्य झाले आहे.

पण तसे करण्यापूर्वी श्री. विजय वैद्य यांनी तसे विशेष कारण नसताना व पहिल्या आणि अल्प परिचया नंतरच सबंध लेखात भाऊवर प्रेमाचा जो वर्षाव केला आहे त्यावद्दल काय लिहावे ते कळेनासे झाले आहे. म्हणून त्यांच्या त्या स्नेहार्द्र भावनांची कृतज्ञतापूर्वक नोंद घेऊन मौन राहणेच मी योग्य समजतो.

श्री. वैद्य यांच्या लेखनातील एका मुद्द्याबाबत थोडे स्पष्टीकरण मात्र आवश्यक आहे, विशेषत: विनोबांच्यासंबंधी जो उल्लेख आहे त्यातून विनोबा परिस्थितीतील आव्हान स्वीकारीत नाहीत असा भाव निघतो. वास्तविक पाहता त्यावेळच्या परिस्थितीतील आव्हान विनोबांनी स्वीकारले व त्यातूनच पुढे भूदानाचा जन्म झाला. जस-

जसे ते नवनवीन आव्हान स्वीकारीत गेले तसतसे आंदोलनही ग्रामदान-ग्रामस्वराज्या-पर्यंत पुढेपुढे चालत गेले. आव्हान स्वीकारणारे आम्ही लोक आहोत, त्यांचे सोबती! त्यामुळे विनोबा एकीकडे पुढेपुढे चालत आहेत पण आम्ही व आमचे आंदोलन दोघे फिकेफिके पडत आहोत. विनोबांच्या आदेशाप्रमाणे आम्ही जर भूदानात मिळालेल्या जमीनीचे एव्हाना वाटप करून दिले असते व त्यातून निर्माण होणाऱ्या आव्हानांना पाठ फिरविण्याच्या ऐवजी त्यांना सामोरे झालो असतो तर सर्वोदयाचे तेज काही आगळेच प्रगट झाले असते.

शहादे भागातील आव्हान आम्ही काही लोकांनी स्वीकारले हीच येथील जुन्या सर्वोदयी विचाराच्या मित्र मंडळीच्या मते आमची चूक ठरली. जोपर्यंत तुम्ही खादी ग्रामोद्योगाच्या गोष्टी करतां, १२ फेब्रुवारीला सर्वोदय मेळावा घेता, विनोबा हीरक जयंतीनिमित्त वर्गणी मागता, तोवर ठीक आहे. पण येथील बहुजन समाजाच्या जीवनाशी, किंवा त्यांच्या सुखदु:खाशी, त्यांच्या अडीअडचणींशी एकरूप होऊन त्यात सहभागी होण्याचा प्रयत्न करू लागला, तर आम्ही सर्वोदयाचा मुखवटा धारण केलेले लाल निशाणवालेच आहात असे आम्ही समजणार. अशी आमच्या येथील आमच्या ज्येष्ठ मित्रमंडळीची भूमिका आहे.

श्री. तु. ज. पाटील, अॅडव्होकेट यांच्या लेखातील हेच सार आहे. यांच्या मते येथील परिस्थितीमध्ये 'ऑल वेल' आहे. असंतोषाला मुळीच कारण नाही. कारण बहुसंख्य वन्य लोक गुजरांच्या जमिनीवर मोलमजुरी करून पोट भरतात. त्यांना वेतनही योग्यप्रमाणात मिळते. सालोसाल पगार वाढही होते. शिवाय धान्य माफक दरात मिळते ! आणखी काय हवे ? सालदाराचे जीवन कसे असते याचे ओझरते दर्शन श्री वैद्य यांच्या लेखात आले आहे. या देशात मजुरांचे जे हाल होतात त्या बाबत कुणाचाच मतभेद उरला नाही. अनेक शासकीय समित्यांनी व थोरामोठयांना सर्व प्रकारे चौकशी करून हा निर्वाळा दिला आहे, की शेतमजूराचे जीवन सर्वात जास्त असुरक्षित आहे. कारण तो संघटित नाही. त्याला नोकरीची किंवा कामाची शाश्वती नाही, पगाराचे काहीच स्केल ठरलेले नाही, आजारीपणाची तरतूद नाही. बोनस नाही – काही नाही. या शेत मजूराचे तसे काहीच नाही. यासाठी लढा जरी द्यावा लागला तरी तो लांब मुदतीपर्यंत कोणी देऊ शकत नाही. कारण शेतमजुराला संघर्षाची प्रेरणा देणारे त्याच्या सोबत नेहमी राहात नाहीत. त्याला शेवटी मालकाच्या दयेवरच जीवन जगावे लागते. या सर्व गैरसोयींमुळे तो लाचार आहे. तो शोषित आहे. पण त्याच्या अंत:करणातील ज्वाला आज शांत दिसत असली तरी केव्हा भडका होईल कोणी सांगू शकत नाही. ही सर्व परिस्थिती आमचे येथील जुने व स्वत:स सर्वोदयवाले समजणारे मित्र ध्यानी घेण्यास तयार नाहीत, व येथील शेतमजुराबाबत कुणी काही बोलले तर तो नक्षलवादी ठरतो, सर्वोदयाचा मुखवटा असलेला लाल निशाणवाला समजला जातो. अॅडव्होकेट

साहेबांनी याच विचाराची वकिली आपल्या लेखात केली आहे.

शहादे भागात संतोषकारक परिस्थिती आहे असे त्यांचे म्हणणे आहे. मग चला, आपण काही खेडयात एकत्र फिरूया. मजुरी काय मिळते विचारू या ? पगारवाढ होते की नाही, धान्य कोणते मिळते, काय भावाने मिळते याची चौकशी करू या !

## घरगुती (!) बाबी

तशी जी माहिती आपण मिळविली आहे व आम्हा मंडळीनाही रोज मिळत आहे ती दुःखद आहे. आठ आणे ते दोन रुपये, सामान्यपणे हाच मजुरीचा दर आहे पण मजुरी मिळेलच याची शाश्वती नाही. एक दिवस काम आठ दिवस आराम अशी स्थिती आहे. पगारवाढीची रीत नाही. त्यात परस्परांच्या गरजेप्रमाणे व्यवस्था किंवा कबुलायत होते. सालदाराचे वेतन वर्षाला अडीचशेपासून साडेसातशेपर्यंत असते. धान्य दिले जाते. त्याचे पैसे कापले जातात. धान्य स्वस्त भावाचे असते. पैसे अधिक भावाने कापले जातात. आणि दादरची बोली असते पण त्याऐवजी कधी ज्वारीही घ्यावी लागते. बाजरीही घ्यावी लागते व ती दादरच्या भावातच घ्यावी लागते. उठल्याबसल्या शिव्याशाप विनामूल्य मिळतात. आईबहिणीची इज्जत सुरक्षित नसते. त्यांच्यावर जुलुम करणाऱ्यांवर कुणीही काहीही इलाज करीत नाही, करू शकत नाही. त्यांचा गौरवदेखील होतो.

पूर्वी हेच वन्य जमातीचे लोक पीक संरक्षण करीत होते. परंतु पीक संरक्षण संस्था निघाली आणि या संरक्षण करणाऱ्या लोकांना वाटेल ते जुलूम करण्याचा जणु परवानाच मिळाला. ते वाटेल त्याची मनसोक्त पिटाई करू शकतात. इज्जत, अब्रू घेऊ शकतात.

आणि हे सर्व सर्वोदयवाल्यांनी सहन करण्यास हवे. तुम्ही जोवर या आमच्या घरगुती बाबीत दखल देत नाही तोवरच तुम्ही आम्हाला हवेत.

आणि आम्ही सर्वोदयवाल्यांनी या आमच्या जमीनदार मित्राच्या या घरगुती (?) बाबींकडे आजवर खरोखर कधीच काहीच लक्ष दिले नाही. आता तुम्ही 'माणूस'-वाले किंवा वैद्यसाहेब जे आले किंवा येता, याचेही श्रेय आम्हाला नाही, येथील परिस्थितीला आहे. आम्ही फक्त निमित्त बनलो आहोत. व तेही आम्ही नाही— फक्त आमचा अंबरसिंग !

तोच नेमका यांना नको आहे.

त्याचा काय अपराध घडला ? तो या भिल्ल लोकांच्या तक्रारी ऐकतो. त्यांची दाद शासनाकडे मागतो. लोकांची त्याच्यावर श्रद्धा आहे. तो त्यांचा महाराज आहे.

पण त्याचेवरही हे महाराजपद लादले गेले. तो या भिल्लांच्या करुण कथा ऐकायला येथे नव्हताच मुळी. ॲड. पटेल म्हणतात त्याप्रमाणे तो खरोखर सर्वोदयात ड्रायव्हरच होता आणि तो सर्वोदयात ड्रायव्हर एवढेच नव्हे तर आज तो येथील सर्वोदय कामाचाही ड्रायव्हर बनला आहे.

हा अंबरसिंग ड्रायव्हर होता की कार्यकर्ता, आधी कार्यकर्ता की आधी ड्रायव्हर, वगैरे गोष्टी क्षुल्लक असल्या तरी आजच्या प्रश्नाच्या संदर्भात या गोष्टींना महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे या अंबरसिंगाची थोडी माहिती देणे आवश्यक आहे. त्याच्यावर एवढी तलवार उपासणारे अॅडव्होकेट यांना त्याची नीट माहिती तरी नसावी, किंवा असल्यास जाणूनबुजून त्याची प्रतिमा डागळण्याचा प्रयत्न ते करीत असावेत. काही असो पण अंबरसिंग सर्वोदयात येण्यास मुळी तयारच नव्हता. त्याने आपला जीवनक्रम ठरवून टाकला होता. लहानपणीच त्याने आपल्या पाडळदे गावी आपल्या सोबत्यांची दुर्दशा बघितली होती. त्यांची व्यसनाधीनता, चोरी करण्याची त्यांची वृत्ती, शिक्षणाकडील दुर्लक्ष, शाळेतही त्यांना होणारा त्रास, त्याच्या गावातील भिल्ल बायांची होणारी बेअब्रू– हे सर्व त्याने बघितले होते. तो मॅट्रिकपर्यंत शिकला. पण त्याचे लक्ष शिक्षणाकडे नव्हते. त्याचे वडील कडक असल्यामुळे त्याच्या घरात नशाबाज व मांसाहारी लोकांना प्रवेशदेखील नव्हता.

अंबरसिंगाने आपल्याभोवती तरुण मुले गोळा केली. त्याला भजने म्हणता येत होती. तो त्यात रंगू लागला. तरुण पोरांनाही तो रंग चढला. त्यांची व्यसने सुटू लागली. भजनी मंडळयांची संमेलनेही होत. अंबरसिंगच हे मेळावे जिंकायचा. त्याच्या जोडीला भजने म्हणणारे क्वचित्. तो सर्वांचा लाडका बनला. त्याने ठरविले, नोकरी करायची नाही. भजनकीर्तन करीत करीतच जीवन व्यतित करायचे व याच मार्गाने आपल्या बांधवांची उन्नती करायची.

सर्वोदयात चल असा लकडा त्याचेमागे शंकरभाईंनी लावला. शंकरभाई त्याच्याच गावचे गुजर शेतकरी. सर्वोदयात कार्यकर्ते. आपली सर्व जमीन विनोबांना देऊन टाकल्यामुळे सर्वांच्या दृष्टीने मूर्ख ठरलेले.

अंबरसिंगाला संस्था, तिची नोकरी काही नको होते. त्याला भक्तिमार्ग हवा होता. आजही त्याच मार्गावर तो चालत आहे. पण शंकरभाई हार खाणारे नव्हते. 'अरे तू चलून बघ तर खरे तेथील काम देवाचेच आहे.' आणि अंबरसिंग आला. त्या गोष्टीला आता दहा वर्षे होतील. शंकरभाई अंबरसिंगाच्या रूपाने सर्वोदयासाठी एक अनमोल ठेवा घेऊन आले. त्यावेळी त्यांनाही या त्यांच्या मानस पुत्रात लपलेला आजचा महाराज अंबरसिंग दिसला नसेल. पण परमेश्वराचे काम करणारा त्याचा लाडका का बनणार नाही ?

आमची एक आश्रमशाळा जमान्याला आहे. तेथेच शंकरभाईची नियुक्ती होती. अंबरसिंगाला तेथेच ते घेऊन गेले. शाळेत अंबरसिंग शिकवू लागला. पण त्या निर्जीव पुस्तकातील पोपटपंचीने त्याचे समाधान कसे होणार ? मुलेही त्याच्याबरोबर नाचूगाऊ लागली. त्याच्या डफचिपळ्याने वातावरण निनादू लागले,

## ड्रायव्हर अंबरसिंग

पुढे एक जीप आम्हाला देणगी म्हणून मिळाली. रुग्णसेवेसाठी. जंगम दवाखाना!

औषधांचे वाटप करायचे. त्यासाठी गावोगावी जायचे. नुसतेच जायचे आणि औषध देऊन यायचे ? आलेल्या संधीचा पूर्ण लाभ पदरात पाडून घेणे आवश्यक होते. लोकसंपर्क साधला गेला पाहिजे. या निमित्ताने सर्वोदयाचा विचार सर्वांच्या हृदयात रुजला पाहिजे. अंबरसिंगावर सर्वांची नजर खिळली. त्यासाठी त्याला धुळ्याला राहून मोटार चालविण्याचे शिक्षण घ्यावे लागले. त्याने त्याचबरोबर नागरी व इंग्रजी टंकन कलाही हस्तगत केली. 'करुणा' गाडीची चक्रे रुग्णसेवेसाठी अक्राणीत घुमू लागली. त्यासोबत भजन, कीर्तनही होऊ लागले. सर्वोदयाचा विचारही पसरू लागला. अंबरसिंग ड्रायव्हर बनला तो या जातीचा. अर्जुनाला एक ड्रायव्हर भेटला होता ना त्या जातीचा.

विधायक कार्याचेही प्रशिक्षण हवे म्हणून अंबरसिंगाने अंबर चरखा, विणाई वगैरे सर्व शिकून घेतले. त्या वेळी ही कल्पना नव्हती की या कलेचीही गरज पुढे कधी पडेल.

३१ मार्च ७० साली जनार्दन महाराज वळवी (माजी आमदार) सातपुडा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष झाले. त्यांनी आपल्या आवडीचा चिटणीस म्हणून अंबर-सिंगाची निवड केली.

येथवर सर्व ठीक होते. अंबरसिंगचा बहुतेक वेळ अक्राणीतच जाई. शहाद्याच्या कामाशी त्याचा विशेष संपर्क आला नाही. आम्ही तर कोणीही तिकडे विशेष लक्ष देऊ शकलो नाही. पण हळूहळू तेथील गंभीर बातम्या इकडे कानावर येऊ लागल्या. एके दिवशी अंबरसिंगचे आई-वडील धडगावला (अक्राणी) येऊन धडकले. पाडळ-द्याला राहणे त्याला अशक्य झाले. आणखीही लोक येत व अंबरसिंगाला घेऊन जाण्याचा प्रयत्न करीत. पण अंबरसिंग धडगावचे काम सोडून जाऊ शकत नव्हता.

एके दिवशी धडगावच्याच कामासाठी त्याला शहाद्याला यावे लागले. तेथे त्याच्या गावच्या स्त्री-पुरुष मंडळींनी त्याला घेरावच टाकला. त्याला तिकडच्या कामात लक्ष घालावे लागले. एक एक प्रश्न हाती घेऊन तो अधिकाऱ्यांशी संपर्क साधू लागला. पत्रेही लिहू लागला. कधी कधी पत्रात परिस्थितीमुळे कडक शब्दयोजनाही होऊन गेली.

गणपती उत्सवाचे वेळी अफाट समाज उपस्थित झाला. शिस्तीने वागला. पोलीस अधिकारीही खूष झाले. त्यांनी स्वतःच सांगितले, अंबरसिंगची बदली शहाद्याला करा. त्याची मदत आम्हाला होते.

अंबरसिंगचा वेळ शहादेच्या कामात बराच जाऊ लागला. मंडळानेही त्याच्यावर या भागाची जबाबदारी सोपविली. त्यासाठी ठरावही केला.

पूर्वी लक्कडकोट गावी एक भानगड झाली असता पोलिसांनी अंबरसिंगाला धडगावहून बोलावून नेले व त्याच्या साहाय्याने तेथील भानगड मिटविली. येथून त्याचेबाबत गैरसमज सुरू झाले. त्यानेच पाटीलवाडी प्रकरण घडविले असा आरोप

त्याच्यावर करण्यात येऊ लागला.

सर्वोदयाने त्याला तत्काळ कमी करावे असे आदेश शहादे येथील थोर मित्रमंडळीं-कडून सर्वोदयाला मिळू लागले. तसे करणे सर्वोदयाला शक्य नव्हते. कारण अंबर-सिंग यांचेकडून असे काही घडू शकते या गोष्टीवर सर्वोदय मंडळाचा विश्वास बसेना! याच वेळी सर्वोदय मंडळाची वार्षिक सभा झाली. त्यात अंबरसिंग हजर राहू शकले नाही. पण मंडळाने त्यांना कमी करण्याऐवजी एकमताने त्यांनाच पुन: सरचिटणीस नेमले. त्या सभेत श्री. गोविंदराव शिंदे, श्री. जनार्दन पडळी, श्री. डॉ. छगन वगैरे मंडळी होती. अबरसिंगावरील विश्वास अशा रीतीने मंडळाने पुन्हा प्रगट केला.

अॅड. तु. ज. पाटील यांच्या लेखातही पत्रकार व साहित्यक यांनाही दोष दिला गेला आहे. येथे काहीही घडो, जोवर तुम्ही त्या बाबत काही बोलत नाही, लिहीत नाही, तोवर तुम्ही आमचे मित्र. जर तुम्ही तोंड उघडले किंवा लेखणी चालविली तर तुम्ही राजकारणी, लाल निशाणवाले, सर्वोदयाचा मुखवटा धारण करून लोकांची दिशाभूल करणारे, वन्य व गुजर समाजात (शब्द अॅडव्होकेट पटेल यांचेच) वर्गविग्रह निर्माण करणारे, म्हणून तुम्हाला जेलमध्ये टाकले पाहिजे. सर्वांना टाकणे शक्य नसले तरी निदान अंबरसिंग यास तरी जेलमध्ये टाकाहो असा जणु धावाच अडव्होकेट पाटील यांनी पोलिसांना केला आहे.

आपल्या स्वार्थाला थोडाही धक्का बसू लागला व समोरची बाजू कितीही न्यायाची असली तरी मग आपणास् आपला मित्र कोण वैरी कोण कळेनासे होते व मित्रालाही आपण वैरी समजण्याचे आत्मघातकी वर्तन करतो. वन्य जातीमध्ये अबरसिंग सारखा सर्वोदय विचाराचा कार्यकर्ता उदयाला येत आहे. त्याचे स्वागत करण्याऐवजी व त्याच्या सहकार्याने आपल्या समस्या सोडवून घेण्याऐवजी त्याला बदनाम करण्याचा हीन प्रयत्न करणे व त्याचे सोबत त्याचे सर्वोदयातील सोबती त्याचे सर्वोदय मंडळ, त्याचे हिशेब सर्वांचा उल्लेख करून जनतेत गैरसमज पसरविणे हे अॅडव्होकेट साहेबांचे चुकीचे धोरण आहे.

मंडळाबाबत मी अॅडव्होकेट साहेबांना नम्रपणे सुचवू इच्छितो, की ती एक रजिस्टर्ड संस्था आहे. तिचे हिशेब चार्टर्ड अकौंटंटकडून तपासले जातात. चॅरिटी कमिशनरकडे ते पाठविले जातात. कुणालाही कधीही ते पाहण्याची सोय आहे.

## सब भूमी गोपालकी

ज्या लोकांना पाटीलवाडी म्हसावद प्रकरणी अटक झाली आहे त्यांना कायदे-शीर सल्ला व मदत मिळवून देण्याचा प्रयत्न अंबरसिंग करीत आहे. यात काही गैर नाही. अंबरसिंग सर्वोदयाच्या नावावर मदत गोळा करीत सुटला आहे. लोकहो सावधान अशी हाकाटी स्वत: अॅडव्होकेट महोदय करीत आहेत ती अनाठायी आहे. त्यांनी तर त्यांच्या वकिली पेशाचा व शक्तीचा सर्वांना न्याय मिळवून देण्याचे

कामी विनियोग करावा.

शेवटी ॲडव्होकेट पाटील यांनी डॉ. विश्राम हरि पाटील यांच्या जमिनीचा प्रश्न उपस्थित केला आहे व वन्य नेत्यांचा डोळा डॉक्टरसाहेबांच्या जमिनीवर असून हेच कारण कोठारावर धाड घालण्याचे आहे असेही त्यांनी म्हटले आहे. कोठारावर धाड कुणी व का घातली हे ॲडव्होकेट साहेबांना माहीत झाले असेल, पण आम्हाला माहीत नाही. जमिनीवर कोणत्या वन्य नेत्यांचा डोळा आहे हे त्यांनी स्पष्ट लिहिले नाही. कारण वन्य नेते एकाहून अधिक आहेत. आमच्यापुरते म्हणावयाचे तर आमचा डोळा फक्त पाटील साहेबांच्याच जमिनीवर आहे असे नाही. पृथ्वी ही आपणा सर्वांची माताच आहे. जगातील सर्व जमीन ही परमेश्वराची असून ज्यांना तिची सेवा करावयाची आहे त्यांना ती उपलब्ध असावी असे आम्हाला वाटते. ती प्राप्त करण्याची एक नवीन व प्रेमाची पद्धत विनोबाजींनी जगापुढे प्रस्तुत केली, ती यशस्वी झाली असे आम्हाला वाटते.

पण ॲडव्होकेट साहेबांच्या मते वाटपाचा उपयोगही नाही. कारण हा आळशी व्यसनी शेतमजूर, असलेली जमीन गमावून बसला आहे. त्यानी आपल्या गावच्या माणसाचेच उदाहरण दिले आहे. त्यांच्यासारखा उत्तम सल्लागार असताना ही जमीन त्यांच्या गावच्या त्या गरीब माणसाकडून निघून कशी गेली ? वन्य जातीच्या लोकांना नव्या कराराची जमीन विकता येत नाही. ती जुन्या कराराची होते कशी व ती मग त्या शेतकऱ्याचे हातातून निघून जाते कशी ही एक या भागाची मोठी समस्या आहे. जो सर्व्हे यासंबंधी करण्यात आला आहे तो सर्वांचे डोळे उघडतील असाच आहे. तीस गावचा सर्व्हे अंबरसिंग व त्याचा सोबती मंडळीनी केला आहे. त्यात दोनशेवर अधिक लोकांच्या जमिनी निघून गेल्याचे आढळून आले आहे. पैकी काही प्रकरणे तर आश्चर्य करण्यासारखी आहेत. ७।१२ मधे नाव तुमचे, पीकपाणी तुमच्याच नावाने, पण कब्जेदार दुसराच आहे. या जमिनीचा कब्जा तावडतोब तुम्हाला का मिळू नये ?

तेव्हा जमीनही ज्याची त्याला मिळालीच पाहिजे. त्याने कधी काही कर्ज सावकाराकडून घेतले असेल तर त्या बाबत योग्य निर्णय व व्यवस्था झाली पाहिजे. येथील जिल्हा बँकेचे अध्यक्ष श्री. पी. के. पाटील यांनी बँकेमार्फत कर्ज फेडीची व्यवस्था करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यांनी स्वत: दहा गावांचा सर्व्हे करविला. व तेथील जमिनी परत मिळवून देण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. आदिवासी जमीन खंडू शकत नाही असे नाही. जमीनदाराकडे तोच राबतो. त्याला शेती कशी करावी हे कळते आमच्या सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष बाबा दौलत वडळी यांनी आपल्या गावची केलेली सुधारणा ॲडव्होकेट साहेबांनी बघावी. त्यांनी स्वत: अठरा आणे पीक काढले आहे. कारण त्यांचेजवळ व त्यांचे सोबत्याजवळ शेती सोबत आवश्यक साधनेही आहेत. म्हणून शेती सोबत साधनेही मिळायला हवीत. बैल, विहीर, बी-

बियाणे, खावटी, इ. साधने असल्यावर तो शेती का करणार नाही ? व्यसनाधीन आहे ना ? व्यसन मुक्तीचा प्रयत्न करू, आपल्या मुलाबाळांसाठी करताना, त्याच्या-साठी करू, त्याच्यापुढील पिढीला तरी व्यसन मुक्त ठेवू. आजतर त्याची मुले शाळेत जातच नाहीत. ती का जात नाहीत ? ती का जाऊ नयेत ? त्यांचे न जाणे समाजाला परवडणारे आहे का ? त्यांच्या सेवेला आपण वाहून घ्यायला तयार आहोत का ? त्यांच्या आजच्या स्थितीला जबाबदार कोण ? आपणच जबाबदार नाही का ? मग आपणाला काही प्रायश्चित करावयास नको का ?

या सर्व प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे. इतिहासापासून बोध घेतला नाही तर महाग पडेल. ज्या प्रक्रियेतून पाकिस्तानाची निर्मिती झाली व ज्या प्रक्रियेतून झालेले पाकिस्तानही दुभंगले. दोन्ही घटना फार बोधप्रद आहेत. ज्या प्रक्रियेतून पाकिस्तानाची निर्मिती झाली त्याच प्रक्रियेतून आदिवासीस्थान किंवा क्रिस्तस्थान होण्याची शक्यता होती व आहे. डॉ. आंबडेकर व पू. ठक्कर बाप्पा यांच्या प्रयत्नाने ते संकट टळळे हा इतिहास आहे. हे हरिजन बांधव व आदिवासी लोक भारतीय संस्कृतीला चिकटून राहिले नसते तर पाकिस्तान झाले त्याचवेळी असेच काही आणखी भेसूर चित्र बघायला मिळाले असते. पण बाबासाहेब आंबेडकरांनीच या देशाला वाचविले. हे कबूल करावे लागेल. हरिजन आदिवासींनी साथ दिली म्हणून देशाची प्रतिमा फार भंगली नाही. पुढे असे काही घडणारच नाही याची शाश्वती नाही. ते घडू नये असे ज्यांना ज्यांना वाटत असेल त्यांनी आता, आज या आदि-वासी बांधवांच्या आपल्या देशावरील उपकाराची फेड म्हणून तरी, त्यांच्या सेवेचे कंकण बांधायला हवे.



फळाफुलांचे जिगरी दोस्त

# डॉक्टर गंडासिंग सरदार लालसिंग चिमा

डॉ. अनंतराव पाटील

दिनांक २ जानेवारी १९७२ रोजी सरदार डॉ. चिमा यांचे वार्धक्याने पुण्यात निधन झाले. फळबागशास्त्राचा हा किमयागार संगमवाडीजवळच्या खडकमाळावरच्या आपल्या बंगल्याच्या आवारात वयाच्या ७८ व्या वर्षीदेखील मृत्यूच्या एक आठवडा आधी झाडांशी, फुलांशी हितगूज करीत असताना दिसत असे. दैवदुर्विलास असा, की अखेरच्या दिवसापर्यंत ते त्यांनी तयार केलेल्या जर्बेराच्या नवीन जातीच्या फुलाची उमलण्याची ते वाट पाहात होते. परंतु ज्या दिवशी त्यांचे निधन झाले त्याच दिवशी त्यांच्या नातीने जर्बेराचे ते गोंडस पिवळसर छटा असलेले फूल उमललेले पाहिले. कायमचे डोळे मिटलेल्या आपल्या पित्याच्या शवाच्या पायापाशी ते निष्पाप जर्बेराचे फूल प्रथमच जगाकडे डोळे उघडून बघत होते.

फाळणीपूर्व पंजाबमध्ये सियालकोटच्या सोहवाला या खेड्यात डॉ. चिमांचा एका शीख शेतकरी कुटुंबात जन्म झाला. सियालकोट व लाहोरमध्ये शिक्षण झाल्यावर, 'अल्फ्रेड पतियाळा रिसर्च स्कॉलरशिप' मिळवून ते अमेरीकेत उच्च शिक्षणासाठी गेले. १९२१ साली डॉ. चिमा मुंबई राज्यात शेतकी खात्यात उद्यानशास्त्रज्ञ

म्हणून आले. त्यांच्या आगमनाने उद्यानशास्त्राची मुहूर्तमेढ मुंबई राज्यात रोवली गेली. तोपर्यंत फळबागशास्त्र निर्जीव अवस्थेत होते. प्रथम त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या साहाय्याने राज्यातल्या फळांच्या जातीत सुधारणा करण्याचे काम हाती घेतले. ते काम सोपे नव्हते. कारण फळांच्या नवीन जाती तयार करायला दीर्घ परिश्रम, चिकाटी व अचूक शास्त्रीय ज्ञान लागते. लखनौ, अलाहबादकडचे पेरू अखिल भारतात प्रसिद्ध आहेत. तेथून जाती मागवून त्यातून निवड पद्धतीने पेरूची नवीन जात शोधून काढण्याचे काम सुरू केले. त्यांच्या दीर्घ चिकाटीचे फळ म्हणून 'लखनौ ४९'-ही पेरूची सुधारित जात त्यांनी शोधून काढली.

आज बाजारात लोकप्रिय असलेली 'सिलेक्शन ७' द्राक्षाची जात हे डॉ. चिमांच्या संशोधनाचे फळ. कमी खर्च, भरपूर व चविष्ट उत्पन्न देणारी ही जात. सिलेक्शन ७ या द्राक्षाच्या सुप्त गुणांची बागायतदारांना बरेच दिवस कल्पना नव्हती. द्राक्षाची एक नवीन जात एवढीच या जातीबद्दल जागृत बागायतदारांना कल्पना. परंतु बारामतीचे प्रसिद्ध बागायतदार शेंबेकर यांच्या मळ्यात या झाकल्या माणकाचे चीज झाले. श्री. माणीकराव जामक यांनी या जातीचे हेक्टरी ८२,६०१ किलो एवढे उत्पन्न काढले. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातल्या द्राक्ष बागायतदारांना सिलेक्शन ७ द्राक्षाची जात हे एक वरदानच ठरले.

डाळिंबाच्या जातींतदेखील सुधारणा करून त्यांनी जी. बी. जी. १ या नावाची नवीन जात तयार केली.

त्यांच्या या प्रचंड कार्याचा गौरव म्हणून महाराष्ट्र सरकार व महाराष्ट्र कृषि-विद्यापीठ यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते डॉ. चिमांचा गौरव केला. त्यावेळी त्यांना उद्देशून त्यांनी असे उद्‌गार काढले, की शास्त्रज्ञ वा संशोधक हा देवासमान असतो व निसर्गाच्या चुका दुरुस्त करण्याचे महान कार्य तो करतो. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांनी तयार केलेल्या लखनौ ४९ या पेरूच्या जातीला 'सरदार' व द्राक्षाच्या 'सिलेक्शन ७' या जातीला चिमासाहेबी हे नवीन नामकरण करण्यात आले. आज डॉ. चिमा गेले तरी हजारो शेतकरी व बागायतदारांच्या मळ्यात डुलणाऱ्या व फळांनी तरलेल्या 'सरदार' पेरूंच्या झाडांच्या रूपाने व 'चिमासाहेबी' या भरघोस द्राक्षांनी बहरलेल्या द्राक्षवेलींच्या रूपाने चिमासाहेब आणखी अनेक पिढ्या महाराष्ट्राच्या शेतीजीवनात चिरंतर वास करणार आहेत.

डॉ. चिमा यांनी पूर्वीच्या मुंबई राज्यात फळबागतज्ञ, प्रिन्सिपॉल-शेतकी कॉलेज पुणे व संचालक, शेतकीखाते मुंबई राज्य या मोठ्या हुद्यांवर कामे केली आहेत. भारत सरकारच्या फ्रूट डेव्हलपमेंट ॲडव्हायजर या जबाबदारीच्या जागेवर त्यांनी काही काळ काम केले. परंतु डॉ. चिमांइतका निगर्वी, प्रेमळ शास्त्रज्ञ व अधिकारी कधी कुणी पाहिला नसेल. सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर आपल्या कर्तबगारीचे

व पराक्रमाचे व मोठेपणाचे गोडवे लोकांना ऐकवत बसवणारे ते निवृत्त, सरंजामी अधिकारी नव्हते. वयोमानाप्रमाणे शरीर साथ देत नव्हते. तरी बंगल्याच्या आवारात माळ्यांच्या बरोबरीने हा शास्त्रज्ञ फुला-झाडांशी हितगुज करीत असे. डबडी, खोकी, कुंड्या यातून त्यांची प्रयोगाची झाडे विखुरलेली असत. आपल्या थरथरत्या हातांनी ते प्रयोगांचे निष्कर्ष लिहून काढीत. शेतकी कॉलेजवरच्या तज्ज्ञांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करीत, आपले प्रयोग दाखवत. या वयातदेखील फुल-झाडांमध्ये सुधारणा करण्याचे काम त्यांच्या हातून चालूच होते. चाफ्याच्या फुलात गुलाबी, सोनेरी पिवळसर छटा असणारी व एकप्रकारचा आगळाच सुगंध देणारी जात तयार केली व त्याला ' इंदिराचाफा ' हे नाव दिले. सुरवातीला नमूद केल्या-प्रमाणे त्यांचे जर्बेराच्या नवीन जाती तयार करण्याचे काम चालूच होते. त्या नवीन जर्बेराच्या फुलाची कळी उमलायची ते वाट पाहात होते. परंतु ती कळी उमलायच्या आंत काळाने त्यांना ओढून नेले. चार वर्षांपूर्वी बागेत काम करताना त्यांच्या पायाचे हाड मोडल. ते अंथरुणाला खिळले. वृद्धावस्थेमुळे त्यांना पुन्हा पायावर चालता येणार नाही असे डॉक्टरांचे मत पडले. परंतु त्यांच्यात एवढी जबरदस्त जिद्द, की ते म्हणाले, मी चालायला लागणार व त्याप्रमाणे झालेदेखील. आणि ते पुन्हा बागेत काम करू लागले देखील.

फळे व भाजीपाला शीतगृहात ठेवून वेगवेगळ्या उष्णतामानात फळे व भाजी-पाला टिकवण्याचा प्रयोग त्यांनी गणेशखिंड फळसंशोधन केंद्रातल्या शीतगृहात केला. अशाप्रकारचे संशोधन भारतात प्रथमच करण्यात आले होते. त्यांच्या फलो-द्यान शास्त्रातल्या संशोधनामुळे त्यांना इंडियन अॅकॅडेमी ऑफ सायन्सचे सन्माननीय सभासदत्व बहाल करण्यात आले होते. दुसऱ्या महायुद्धात लष्कराला फळभाज्यांचा पुरवठा उत्तम रीतीने केल्याबद्दल त्यांना ' Companion of Indian Empire ' ही पदवी बहाल करण्यात आली.

डॉ. चिमांनी फळबाग शास्त्रातल्या दीर्घ अनुभवानंतर इतर दोघा सहकाऱ्यांच्या साहाय्याने 'Commercial Fruits of India' हे पुस्तक लिहिले. फळबाग-शास्त्रात भारतीय फळांवर लिहिलेला हा पहिलाच शास्त्रीय ग्रंथ असावा. अगदी अखेरपर्यंत आपले शास्त्रीय लेख लिहून प्रसिद्ध करण्याची त्यांची तळमळ असायची.

पंजाबचा हा शीख वृद्ध शास्त्रज्ञ, शेतकऱ्यांचा सच्चा मित्र, संगमवाडीतल्या सामान्य शेतकऱ्यातदेखील एकरूप झाला होता. त्यांच्यात मिसळून त्यांनी तेथे शेतीसहकारी सोसायटी स्थापन करून बाबाजी (डॉ. चिमा) त्यांना मार्गदर्शन करीत होते.

– असे हे सरदार डॉ. गंडासिंग चिमा हे शेतकऱ्यांचे सच्चे मित्र, तळमळीचे संशोधक व फळाफुलांचे जिगरी दोस्त होते.

□ □ □

नलिनी अंबाडे

# आव जाव, घर तुम्हारा !

पूर्वीच्या काळी संस्थानिकांचा राजवाडा म्हणजे एक स्वतंत्र संस्थानच असे. अवाढव्य भटारखाना, असंख्य पाहुणे, अनेक नोकरचाकर आणि बेसुमार पैसा खर्चायला, कुणाचा कुणाला पत्ता नसायचा म्हणे. हैद्राबादच्या निजामांची कोठी इतनी बडी होती, की त्यावरूनच कदाचित म्हण पडली असावी 'आव जाव घर तुम्हारा, खाव प्याव बर्तन हमारा !'

गेल्या वर्षी मद्रासच्या माननीय आरोग्यमंत्री सत्यवाणीबाई एकदा अचानकपणे न सांगता सवरता, मद्रासच्या सरकारी इस्पितळात गेल्या. अधिकाऱ्यांची धावा-धाव, पळापळ, कारभाराची लपवाछपवी इ. सोपस्कार मग झालेच. तरीही चाणाक्ष बाईंच्या नजरेतून काही गोष्टी सुटल्या नाहीत. आजारी पेशंटस्‌ना मिळणारे जेवण अपुरे अन् निःकृष्ट होते. वार्डबॉईजच्या बायका-पोरांची पंगत तेथेच रंगात आलेली होती. अख्ख्या मोठ्या वॉर्डवर एकच बिचारी कुणी नर्स काम करीत होती. पेशंटस् इतके होते, की जमिनीवर आणि व्हरांड्यात गाद्या घातल्या होत्या. दुधाच्या पातेल्यातील अर्धे दूध 'गायब' होते इ. इ. ! दुसऱ्या दिवशी बाईंनी घोषणा केली, '३०० नव्या नर्सेस भरल्या जातील'– पुढे घोषणा हवेत विरून गेली आणि 'सरप्राईज व्हिजिट' हा सारा स्टंट होता हे लोकांच्याही ध्यानात आले. बाईंना जर हिंदी येत असते, तर त्या नक्कीच म्हणाल्या असत्या 'आव जाव घर तुम्हारा असे ठिकाण म्हणजे सरकारी मद्रासी इस्पितळ.'

इस्पितळातील रोग्यांच्या जीवनातील आनंदाचा क्षण म्हणजे 'घरचे' कुणीतरी भेटायला येण्याचा क्षण ! मग ते 'कुणीतरी' पत्नी असेल, प्रेयसी असेल, आई असेल वा बहीणभाऊ ! नोकरी करणारा पेशंट असेल तर सहकारी भेटायला जातात. जातांना हातात एखादी मुसंबी नाहीतर ग्लूकोजचा पुडा घेऊन जातात. बायको, लहानग्या चिमुरडीला घेऊन भेटायला येते. ती आईला विचारते, 'बाबा, घलि कदी येनाल ?' जीवनाला वैतागलेला पेशंटही मनातल्या मनात म्हणतो, 'पोरीसाठीतरी बरा होईन !' नामवंत औषधे अन् इंजक्शने कधीकधी हात टेकतात अन् असल्या काहीतरी अंतःप्रेरणेने त्याच्या क्षीण मनाला काहीतरी उभारी येते अन् प्रकृती झपाट्याने सुधारू लागते.

पण सरकारी कारभारात असल्या भावनांच्या खेळांना स्थान कसे असणार ? अर्थातच सरकारी कारभाराला सर्वसाधारणपणे 'कॉमनसेन्स 'चेदेखील वावडे असते. मद्रासला असंच झालं. पेशंटस्‌ना भेटण्यास वेळ सायंकाळी दोन तास. रोज फारशी नसली, तरी निदान सुटीच्या दिवशी चांगलीच गर्दी जमायची. बिचारे पेशंटस्, कॉटवर पडल्या पडल्या विचार करीत असतील आजतरी कुणी आपल्याला भेटायला येईल, एखादे पत्र, नवा ' माणूस ' घेऊन येईल...एक ना दोन. भेटायला येणाऱ्यांसमोर अर्थातच पेशंट बोलून जाई, ' चहा पाठव ना उद्या. इथला चहा म्हणजे गोमूत्र असतो !' अशा प्रकारे इस्पितळातील भानगडींना बाहेर पाय फुटत कधीकधी त्या एखाद्या संपादकापर्यंत पोचत, कधी कधी वरिष्ठांपर्यंत ! तेव्हा या बाहेरच्यांना बंद कसे करावे ? ऑर्डर्स निघाल्या, ' जास्तीत जास्त फक्त दोनच जणांना भेटता येईल !' तरीही गर्दी कमी होईना. सध्याचे मंत्रीमहाशय अम्बळघन् यांनी डोके खाजविले अन् पुढचा मागचा काहीही विचार न करता जाहीरही करून टाकले की, ' एक जानेवारीपासून भेटायला येणाऱ्यास दहा पैसे तिकिट. '

झाले ! मला ' अय्यय्यो ! मदरास्स 'साठी विषय तर मिळाला. आता आणखी ' मालमसाला ' हवा होता. संध्याकाळी चौपाटीवरच्या ' बुहारी 'त चहा घेताना मुद्दामच एका डॉ. मजकुरांसमोर हा विषय काढण्यास ' ह्यांना ' सांगितले ! डॉ. मजकूर तेथे कोणत्यातरी विभागाचे प्रमुख आहेत. ते म्हणाले, ' अहो, अशा काही ऑर्डर्स काढण्यापूर्वी आमच्यापैकी कुणाला एकाला तरी विचारायचं ! आमचं मत विचारायचं निदान. आता हेच पहा, ' जी. एच. ' (मद्रासचे सर्वांत मोठे सरकारी इस्पितळ) मध्ये साधारणपणे १००० पेशंट धरले आणि प्रत्येकाचे तीन भेटायला येणारे जरी धरले, तरी एका दिवसाचे सरासरी उत्पन्न फक्त दहाच रुपये !'

' ते कसे !'

' पहिले दोनजणास ' फ्री पास ' व पुढच्या प्रत्येकास दहा पैसे. समजा, दीड-हजार पेशंटस असतील तर फक्त हजारांचेच दोस्तमित्र भेटायला येतात व ते पण काही पोराबाळांचे लटांबर घेऊन येत नाहीत. म्हणजे जेमतेम १००–२०० जणांनाच तिकिटे – म्हणजे १०–१२ रुपये उत्पन्न ! इतर दिवशी तेवढेही नाही. '

' त्या बुकिंग कारकुनाचा पगार ?'–ह्यांची शंका.

' तिकिटे घेतली की नाही पाहायला इन्स्पेक्टर ?'–माझी शंका.

' तसा हिशोब सरकारी खात्यात करायचा असतो काय ?' डॉ. पुढे म्हणाले, ' मग ज्यांचे नातेवाईक येत नाहीत ते लोक आपापल्या फ्री-पासेसचा काळाबाजार करतील त्याची काय वाट ? आणि भेटायला येणारे लोक काय दहा पैसे तिकिट पाहून परत जातील काय ?'

' तुमचं काय मत आहे ?'–मी ह्यांना विचारलं !

' फार वरं झालं !'

' ते कसं काय ?' डॉ. नी विचारले...जवळ जवळ रागानेच.

' अहो, नाहीतरी इतके दिवस दारावरच्या वॉचमनच्या हातावर पावली, वीस-पैसे टाकावेच लागायचेच की ! आता तिकिट म्हणजे पैसे सरकारात तरी जमा होतील. त्या वॉचमनांची संपूर्ण कमाई तरी बंद होईल !

त्यावरून मला उमजले. मद्रासच्या कोणत्याही हॉस्पिटलात कधीही बघा – मुख्य फाटकावर वॉचमनांसमोर घोळका आहेच. कुणाला आपल्या पेशंटला चहा द्यायचा असतो, कुणाला चेकवर सही आणायची असते, तर कुणाला कपडे द्यायचे असतात. वॉचमनाच्या हातावर किमान दक्षणा दहा पैसे, तरच आत जायला मिळणार. लाचलुचपतीची सुरुवातच तेथून होते जणू !

' बरं मग डॉक्टर, यावर काय करायला हवं होतं.'–मला आणखी मालमसाला हवा होता. म्हणून चावी दिली थोडीशी. त्यावर ते म्हणाले–

' आज हॉस्पिटलात जे काही आहे – म्हणजे गोळ्या-औषधे बॅण्डेजे इंजेक्शने – ते सारे काही मोफत. त्यामुळे त्याचं महत्त्व लोकांना वाटत नाही. सरकार लाखो रुपये रोज खर्च करते, तो पर्यायाने व्यर्थ ठरतो. हॉस्पिटले भरलेली दिसतात. पण कुणी ? झोपडपट्टीवाले, भिकारी अन् भटके चोरटे यांनीच ! सरकारी दवाखान्यांचा खरा फायदा उठवितात ते हेच लोक. मध्यमवर्गीय तुम्ही-आम्ही सरळ पैसे मोजून खाजगी ट्रीटमेंट घेतो. ते लोक दोन वेळ जेवण, चहा, क्ष-किरण सारे काही मोफत घेतात. ' दो या तीन ' ठेवा तुमच्या पुरतेच. झोपडपट्ट्यांमधील बायका आठ आठ वेळा येतात ! – प्रत्येक वेळी सारे मोफत. दारुड्या नवऱ्यांची किडकी प्रजा वाढविण्यासाठी लाखो रुपये व्यर्थ जातात. त्यापेक्षा रोज आठ आणे किंवा चार आणे फी ठेवावी. लोकांना औषधाची किंमत तरी कळेल आणि या ' व्हिजिटर्सपास 'च्या दसपटीने उत्पन्न होईल. '

डॉ. मजकुरांचे म्हणणे पुष्कळच खरे होते. मद्रासला हा प्रयोग एका सरकारी



दवाखान्यात पहाणीकरिता काही दिवस मागे केलाही होता. रोजी दहा पैसे 'कागद काढतानाच' ठेवले होते. कुणालाही त्याचे फारसे वाटले नाही. का कोण जाणे, पुढे तो 'प्रयोग' दप्तरी दाखल तर झालाच पण तसे पुन्हा करणार नाही असे तोंडभरून आश्वासन दिले गेले. अर्थातच हे सारे कशासाठी ? निवडणुकीतील मतांसाठी !

मद्रासचे आरोग्य-खाते तर परवा दिल्लीच्या लोकसभेतही गाजले. पब्लिक अकौंटस् कमिटीने सरकारी आरोग्य खात्याच्या खर्चावर टीका केली आणि उदाहरण दिले ते नेमके मद्रासचेच ! सारा वर्ग दंगा करतो, पण मास्तरांची छडी खातो एखादाच ! बिचारा ! !

मद्रास राज्यातील हॉस्पिटलसना लागणारे साहित्य-औषधे इ. पुरविण्याकरिता खास एक यंत्रणा, आरोग्य खात्यातर्फे राबविली जाते. तिचे नाव आहे. 'मद्रास मेडिकल स्टोर्स डेपो !' डेपो बरेचसे साहित्य स्वतः तयार करतो, त्यापैकी 'बॅण्डेज' हे पब्लिक अकौंटस कमिटीच्या हाती लागले. रिपोर्टात कमिटी म्हणते, 'बाजारात त्यापेक्षा चांगले बॅण्डेज अन् अधिक स्वस्तात मिळतें, ते का घेत नाही ? तोटा सहन करून स्वतः कशाला तयार करता ? हा संपूर्ण डेपोच तोटयात आहे. त्याला कुलूप का लावीत नाही ?' अकौंटस् कमिटीने लोकसभेत आकडेवारीच दिली. या विभागास १९६४ मध्ये २३ लाख ४३ हजारांचा फायदा झाला. तो १९६५ मध्ये १३,११००० वरती खाली आला. अशा प्रकारे अधोगतीत प्रगती होतहोत १९६९ मध्ये शून्यावर आला व नंतर ४ लाख ७६ हजारांचा तोटा दाखवू लागला. तमीळनाडू सरकार म्हणते, 'इमर्जन्सीमध्ये हॉस्पिटलांना साहित्य कुठून मिळणार ? तेव्हा, केवळ जनतेच्या हितासाठी ही शाखा तोटयातच चालू ठेवणे आवश्यक आहे.'

वास्तविक बॅण्डेज ही काही फार मोठी दुर्मिळ वस्तू नाही. शिवाय आता देशातच औषधे तयार होताहेत. खाजगी कारखानदारी तर खूपच वाढलीय, त्यांची औषधे, बॅण्डेजे, मलमे खरेदी करून त्यांना उत्तेजन दिले तर औषधांच्या किमती खाली येण्यास मदतच होईल. पब्लिक-सेक्टरात औषधे होत आहेत. पिंपरीस पेनिसिलिन होते, उटीची 'इंदू' क्ष-किरणासाठी फिल्म्स बनविते, हृषिकेषला स्ट्रेप्टोमायसीन तर नंदनम् येथे सर्जिकल इन्स्ट्रुमेंटस् ! तेव्हा, पब्लिक अकौंटस् कमिटीने हे 'मेडिकल स्टोर्स ऑर्गनायझेशन' खातेच बंद करावे म्हटले आहे, त्यात फारसे वावगे ते काय ?

एक मात्र खरं, की तमीळनाडूतील सरकारी इस्पितळे संपूर्णपणे मोफत असल्याने त्यांचा दुरुपयोग घेतला जातो व लाखोंचा तोटा होतो. त्याऐवजी 'प्रवेश फी' 'बेड-चार्ज' ठेवल्यास तोटा तर कमी होईलच, पण दोन वेळा मस्त जेवून झोपणारे (नि)रोगीही पळून जातील. अन्यथा इस्पितळे खऱ्या अर्थाने धर्मशाळा बनतील — म्हणजेच आव जाव घर तुम्हारा !

◻ ◻ ◻

चाकावरचे विचार

श्री. मा. भावे

# विद्यार्थी आणि विद्यार्थिनेते

बांगला देशाच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या कालातील ही हकीकत आहे. भारतीय सेना डाक्क्याकडे वेगाने वाटचाल करीत होत्या. अमेरिकेचे सातवे आरमार बंगालच्या उपसागरात येणार अशी बातमी होती. वातावरणात एक उत्तेजना (excitement) भरून राहिली होती. अशाही स्थितीत सामान्य जनतेचे दैनंदिन व्यवहार व्यवस्थित चालू होते, इतकेच नव्हे, तर युद्ध लवकर संपावे आणि पुन्हा पूर्ववत् व्यवहार सुरू व्हावेत अशी तीव्र इच्छाही लोकांत होती. अशा वेळी पुण्यातील काही विद्यार्थ्यांनी एक सभा भरविली. त्यात एका जहाल विद्यार्थी नेत्याने सांगितले, की भारताला यापुढे अमेरिकन साम्राज्यवादाशी दीर्घकाल लढावे लागणार असल्याने महाविद्यालये बंद करून त्यांचे युद्धकेंद्रात रूपांतर करावे.

परंतु अमेरिकन साम्राज्यवादाशी टक्कर देण्याची महत्त्वाकांक्षा आपल्या पंतप्रधानांनी बाळगली नसावी, कारण डाक्का पडताच त्यांनी युद्ध आवरते घेतले. पंतप्रधानांची अजूनही टिकलेली, किंबहुना वाढलेली, लोकप्रियता पाहाता बहुसंख्य भारतीयांनाही अमेरिकन साम्राज्यवादाशी दीर्घकाल लढण्याची इच्छा नसावी. तेव्हा विद्यार्थी नेत्यांचे वरील उथळ विधान प्रातिनिधिक नव्हते हे स्पष्ट आहे.

तथापि त्या विधानामागील जी वृत्ती आहे, ती विद्यार्थिनेत्यांपुढे जी शृंगापत्ती सतत उभी असते तिची द्योतक आहे. विद्यार्थिनेत्याच्या वर उल्लेखिलेल्या बालिश सूचनेतून जी उत्तेजनासक्ति (excitement mongering) व्यक्त होते ती विद्यार्थिनेत्यांच्या बेजबाबदार वृत्तीचा एक भाग आहे. येथे हेतू विद्यार्थिनेत्याच्या विधानावर टीका करणे हा नसून विद्यार्थि-चळवळीच्या एका महत्त्वाच्या अंगाचे परीक्षण करणे हा आहे.

विद्यार्थ्यांची चळवळ ही गोष्ट काही नवी नाही. असहकाराच्या चळवळीत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांवर बहिष्कार घातला तेव्हांपासून विद्यार्थि-चळवळ ही गोष्ट जनतेस माहीत आहे. विद्यार्थ्यांच्या वा युवकांच्या संघटनाही महाराष्ट्रात गेली चाळीस वर्षे तरी कार्य करीत आल्या आहेत. परंतु त्या विद्यार्थि-संघटना व विद्यार्थि-चळवळी आणि हल्लीच्या विद्यार्थि-चळवळी यांत मूलभूत फरक आहे.

सध्याची विद्यार्थ्यांची आंदोलने ही वर्ग-विद्वेषांतून सुरू होतात, असा त्यांच्या नेत्यांचा दावा असतो. पूर्वी कामगारवर्ग हा सामाजिक क्रांतीचा अग्रदूत होता. परंतु

कामगारवर्गाला हे अग्रदूतत्व पेलवले नाही. प्रस्थापिताविरुद्ध (establishment) लढा देण्याची त्याची वृत्ती पगारवाढीचे पाणी पडताच विझू लागली. त्यामुळे सामाजिक क्रांतीच्या उपासकांनी क्रांतीचे नेतृत्व स्वीकारण्यासाठी नव्या वर्गाचा शोध घेण्यास सुरुवात केली. त्या शोधातून त्यांना विद्यार्थि-वर्ग सापडला. असे असल्याने विद्यार्थि-नेत्यांच्या दृष्टिकोनातून प्रत्येक आंदोलन हे सामाजिक क्रांतीच्या दिशेने टाकलेले पाऊल असते.

बिचारे विद्यार्थी, आपल्या पदरात पदवी पडली म्हणजे कोठेतरी बऱ्यापैकी नोकरी मिळेल या उद्देशाने महाविद्यालयांत येत असतात. ज्या प्रस्थापिताविरुद्ध लढावे असे त्यांना विद्यार्थिनेते सांगत असतात त्या प्रस्थापिताचे सन्माननीय घटक व्हावे यासाठी त्यांची धडपड असते. सामाजिक क्रांतीचे अग्रदूत वगैरे भानगड त्यांना साफ नामंजूर असावी.

विद्यार्थि-वर्ग म्हणून विद्यार्थ्यांच्या काही मागण्या असतात का ? तशा काही मागण्या असणे अगदी शक्य व स्वाभाविक आहे. चार माणसे ठराविक उद्देशाने एकत्र आली, की त्यांच्या काही सोयी-गैरसोयी असणारच. परंतु त्यासाठी वर्गयुद्ध करण्याची आवश्यकता विद्यार्थ्यांच्या बाबतीत क्वचितच उद्भवते. कारण विद्यार्थि-वर्गाच्या मागण्या पुरविल्याने दुसऱ्या कोणत्या वर्गाच्या हितसंबंधांना प्रत्यक्ष बाध येईल अशी स्थिती नसते.

सारांश विद्यार्थिनेत्यांच्या अपेक्षा आणि अनुयायांची वृत्ती यात ही एक कायमची दरी निर्माण झाली आहे. त्यामुळे या नेत्यांना जर नेतृत्व कायम ठेवायचे असेल तर ज्यामुळे विद्यार्थी एकत्र येऊ शकतात अशा गोष्टी त्यांना करणे भाग आहे. विद्यार्थ्यांना एकत्र आणणारी सामर्थ्यशील वृत्ती म्हणजे त्यांच्यातील उत्तेजनासक्ति. विद्यार्थ्यांना ही उत्तेजना (excitement) मिळावयाची असेल तर विद्यार्थिनेत्यांची भाषणे प्रक्षोभक व अनपेक्षित विचारांनी भरलेली असली पाहिजेत. म्हणून मग महाविद्यालये वंद करून युद्धकेंद्रे स्थापन करण्याची मागणी.

विद्यार्थी हे नेहमी भूतकाल व भविष्यकाल यांच्या अरुंद सीमारेषेवर वावरत असतात. केशवसुतांच्या फुलपाखराप्रमाणे प्रत्येक क्षण बेहोषीने जगण्याच्या प्रयत्नात ते असतात. त्यामुळे प्रत्येक क्षणाला निराळा रंग असावा अशी त्यांची अपेक्षा असते. विद्यार्थ्यांतील उत्तेजनासक्ति ही त्यांच्या प्रत्येक क्षण जगण्याच्या वृत्तीतून निर्माण झाली आहे. त्यांच्या अप्रौढत्वाचा तो एक भाग आहे. भविष्याविषयीच्या बेफिकीरीचे ते एक अंग आहे.

परंतु आपल्या भविष्याची जाणीव विद्यार्थ्यांना नसली, तरी ती त्यांना करून देणे हे जबाबदार विद्यार्थिनेत्यांचे कर्तव्य आहे. विद्यार्थ्यांच्या क्षणभंगुर वृत्तीवर आपल्या नेतृत्वाची पोळी भाजणे हा भयंकर नैतिक गुन्हा आहे. विद्यार्थ्यांच्या उत्तेजनासक्तीला खतपाणी देऊन त्यांना एक प्रकारच्या गुंगीत ठेवणे आणि त्यावर

आपले पुढारीपण कायम राखणे तिरस्करणीय आहे.

विद्यार्थिनेत्यांसमोर उभी असणारी शृंगापत्ती ती हीच. त्यांच्या इतर विद्यार्थ्यांकडून ज्या अपेक्षा आहेत, ज्या कारणांसाठी विद्यार्थ्यांचे नेतृत्व मिळवावे असे या नेत्यांना वाटते ती कारणे विद्यार्थ्यांना पटत नाहीत. त्यामुळे आपले नेतृत्व टिकविण्यासाठी विद्यार्थ्यांना सतत उत्तेजना पुरविण्याचे कार्य या नेत्यांना करावे लागते. परंतु तसे करणे बेजबाबदारपणाचे आहे. याचीही त्यांना जाणीव आहे.

## वैदिक ब्राह्मणांचा सत्कार

पाच वैदिक ब्राह्मणांचा सत्कार महाराष्ट्र सरकार दर वर्षी करीत असते. पण असा सत्कार सरकारने करणे गैर आहे, कारण त्यामुळे जातीयतेला उत्तेजन मिळते असा काही समाजवाद्यांचा दावा आहे. असा सत्कार केल्याबद्दल महाराष्ट्र सरकारचा निषेध करावा असा एक ठरावही समाजवादी नगरपित्यांनी पुणे महापालिकेत आणला होता. त्या ठरावाचे पुढे काय झाले ते कळत नाही. बहुतेक लोक तो वाद आता विसरलेही असतील.

आज त्या वादाची आठवण होण्याचे कारण असे की, श्री. वि. द. घाटे यांनी 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये एक लेख लिहून वेदपाठी ब्राह्मणांचा सत्कार करण्याऐवजी वेदपंडितांचा सत्कार करावा अशी सूचना केली आहे. त्यांचे म्हणणे असे, की रेकॉर्डिंगची आधुनिक साधने उपलब्ध असताना वेदपठण करणे आणि अशा वेदपाठकांचा सत्कार करणे अडाणीपणाचे आहे. त्या उलट वेदाभ्यासी विद्वानांचा सत्कार योग्य ठरेल.

येथे एक लक्षात ठेवणे जरूर आहे, की वेदपाठी ब्राह्मण, आमचा सत्कार करा म्हणून सरकारच्या मागे लागले नव्हते. ते निष्ठेने आपल्या परंपरागत पद्धतीने वेदांचे पठण करीत आले होते. वेदाभ्यासी विद्वानांचा सत्कार विद्यापीठे व संशोधन संस्था करीत आलेल्याच आहेत. सरकार सत्कार करीत असते तो वेदपाठी ब्राह्मणांच्या निष्ठेचा, चिकाटीचा आणि निरलसपणाचा. वेदपाठी ब्राह्मणांचा गौरव दुसऱ्या कोणत्याही संस्था करीत नव्हत्या म्हणून सरकारने सत्कार करण्यास सुरुवात केली. यात वाईट अगर निषेधार्ह काय आहे ते कळत नाही.

श्री. घाटे यांचे विचार समजू शकतात. परंतु पुणे महापालिकेत ठराव आणणाऱ्या समाजवाद्यांची वृत्ती अधिक घातुक, कर्मठ आणि अनुदार आहे. त्यांचा आक्षेप वेदांचा अभ्यास करण्यालाच आहे. कारण वेदांमध्ये चातुर्वर्ण्य व विषमता यांचा पुरस्कार आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. वेदात चातुर्वर्ण्याचे मूळ आहे. वेदाभ्यासी चातुर्वर्ण्यावर निष्ठा ठेवणारा असतो, वेदाभ्यासाचा पुरस्कार हा त्यामुळे चातुर्वर्ण्याला

उत्तेजन देणारा ठरतो, म्हणून वेदाभ्यास करणाऱ्यांचा सत्कार निषेधार्ह आहे अशी त्यांची विपरीत विचारसरणी आहे.

या दाव्याला उत्तर, वेदात चातुर्वर्ण्याचे मूळ नाही असे दाखवून मिळणार नाही. वेद-वेदांगे अखेर धर्मांचा भाग झालेली आहेत. त्यांतून प्रत्येक परिस्थितीला व विचाराला पोषक अशी विधाने काढून दाखविता येणे शक्य आहे. किंवा त्यांतील विधानांचा प्रत्येकाला आपल्या वृत्तीला अनुरूप असा अर्थ लावता येईल. मुद्दा असा आहे, की, वेदात चातुर्वर्ण्य असो अगर नसो, त्यांचा अभ्यास हा चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करणारा कसा ठरतो ?

या पुढे जाऊन असेही म्हणण्यास हरकत नाही, की आपल्याला चातुर्वर्ण्य आवडो अगर न आवडो, एखादा मनुष्य विद्वत्तापूर्ण चर्चेने चातुर्वर्ण्य चांगले असते असे जर पटवून देऊ शकला, तर केवळ वैचारिक पातळीवरून त्या मनुष्याचे म्हणणे मान्य करणे व त्याच्या विद्वत्तेचा गौरव करणे सहिष्णुतेचे आणि औदार्याचे द्योतक आहे.

तथापि समाजवाद्यांतील काही मंडळींना तरी ही सहिष्णुता दाखविणे जमणार नाही. कारण तितके औदार्य त्यांच्या ठिकाणी उरलेले नाही. पूर्वीच्या रोमन कॅथॉलिक धर्मशिक्षकांप्रमाणे त्यांनी एक कर्मठपणा निर्माण केला आहे, आणि त्या कर्मठपणाला न पचणारी प्रत्येक गोष्ट त्यांच्या दृष्टीने पाखंड आहे. आपला कर्मठपणा झाकण्यासाठी एक नवीन युक्ती त्यांनी हल्ली शोधून काढली आहे.

केवळ शास्त्रीय विचार हा वांझोटा आणि पोकळीत वावरणारा असतो. त्यामुळे तशा विचारातून निघणारे निष्कर्ष महत्त्वपूर्ण (significant) नसतात. म्हणून शास्त्रीय विचारांना सामाजिक मूल्यांचा लगाम लावला पाहिजे, अशी त्यांची नवी विचारपरंपरा आहे. अनेक विचारांप्रमाणे काही मर्यादेपर्यंत हा विचार खराही आहे.

तथापि, हा विचार अधिक ताणला तर नव्या कर्मठपणाला दुजोरा देणाराही ठरण्याचा संभव आहे. कारण एकदा शास्त्रीय विचार सामाजिक मूल्यांचा अनुसार करणारा असावा असे म्हटले, की कोणता शास्त्रीय विचार समाजाने चालू द्यावा याचा विचार करावा लागेल. अशा रीतीने विचारावर बंधने येतील. आणि विचारांवरील बंधने म्हणजे कर्मठपणाची स्थापना.

□ □ □

# कविता

## खंत

तू दिलेलं
प्राजक्ताचं फूल
वहीत अजून मिटून आहे...
डोळ्यांत पण दोन थेंब
अश्रूंचे दाटून आहे...

## डोळाभर

पाणी किती खोल ?
असेल असेल कमरेभर
ठाव घेऊ ?
नको बुडशील डोळाभर...

## शपथ श्वासाची...

नको बोलू अशी अघळपघळ
हातावर फुलायची अजून
मेंदी-हळद
नको करूस काही खाणाखुणा
दारावर पाऊल तुझ्या अडेल
ना..
नको लेवूस फुले मोगऱ्याची
शपथ आहे ना तुला माझ्या
श्वासाची...

## कविता

मी : काळ्या मातीचा ढेकूळ
मनमानेल तसा स्वतःचा
झालेलो
कुण्या गंधवेडीने
ओंजळीतल्या आभाळातून
पाणी शिंपडले...पण
त्यानंतरची कविता पहावयास
मी कधीच अस्तित्वात नव्हतो...

## रोज चांदणे फुलावे

यावे बहरुन तू जाईसम
अन लिन मजला व्हावे
गंधवेडा होऊनी तुजला
श्वासांनी चुंबावे...
प्राजक्ताची दिठी होऊनी
तुजला मिठीत घ्यावे
भाग्य माझे असे असू दे
रोज चांदणे फुलावे

—मुकुल बोरसे

मुकुल रघुनाथ बोरसे यांच्या कविता म्हणजे अगदी थोड्या अवकाशात खूपसे काही सांगून टाकणारी मुग्ध भावचित्रे आहेत. उन्हाच्या एकेका कवडशामधून रेखीव प्रकाशाची चित्रे उमटावीत तशा भावक्षणांच्या रेखीव आकृत्या या लहान लहान कवितांनी रेखाटलेल्या आहेत.

एक चिरविरही प्रियकर आपली मनोव्यथा 'खंत' या कवितेत सांगतो आहे. 'तिने' दिलेले प्राजक्ताचे फूल त्याने वहीत ठेवून दिलेले आहे. मिटलेल्या वहीतले ते प्राजक्ताचे फूल आणि डोळ्यात दाटलेले अश्रूंचे दोन थेंब यांची कहाणी एकत्रपणे (आणि भाष्याविना) सांगून त्या प्रियकराच्या मनातली आर्त व्यथा अगदी परिणामकारकपणे कवीने व्यक्त केली आहे.

तर 'शपथ श्वासाची' घालताना एक अगदी अलवार भाऊक मन:स्थिती प्रियकराने प्रेयसीला सांगितली आहे. तिचे अघळपघळ बोलणे, तिच्या खाणाखुणा, तिने माळलेली मोगऱ्याची फुले—हे सगळे तिच्या निर्भरतेचे, अल्लडपणाचे व्यापार आहेत. तिचे निरागस व्यक्तिमत्त्व त्यातून लोभसपणे प्रगट होत आहे. पण त्यातूनच प्रियकराच्या काळजाला व्याकुळ करणाऱ्या भावना उद्‌भवत आहेत.


प्रियकराचे व्यक्तिमत्त्व ओबडधोबड आहे. निराकार काळ्या मातीच्या ढेकळासारखे. गंधवेड्या प्रेयसीने त्याच्यावर पाणी शिंपडले. त्या काळ्या मातीला सुगंधाचे घुमारे फुटण्यासाठी. 'ओंजळीतल्या आभाळातून' ही प्रतिमा फार अर्थपूर्ण आहे. रंगांनी नटलेले, अमर्याद आभाळ त्याच्यापुरते तिच्या ओंजळीतच सामावले आहे. आणि त्या जलसिंचनाने विरघळलेल्या ढेकळाची कविता बनली आहे. अस्तित्व हरवलेली, स्वात्ममग्न कविता. 'कविता.'

कमरेभरच्या पाण्याचा ठाव घेताना 'डोळाभर' बुडण्याचा धाकही असाच काव्यमय. पाणी, बुडणे व डोळा या सगळ्यांनाच निराळे अर्थसंदर्भ प्राप्त करून देणारा, हाताशी भासणारा तळ गाठतागाठता डोळाभर बुडण्याची कल्पना प्रीतीची गूढता, फसवेपणा, उत्कटता, सगळ्यांचा एकदम प्रत्यय देते.

'रोज चांदणे फुलावे' ही कविता इतर चार कवितांच्या मानाने गूढतेमध्ये व काव्यमयतेत काहीशी उणी, सरळसरळ कल्पनारंजन करणारी, गंधवेडा होणे, श्वासांनी चुंबिणे, प्राजक्ताची दिठी, चांदणे फुलणे या सगळ्या कल्पना कवीच्या प्रेमातुर मनाची स्वप्ने काव्यमय भाषेत सांगण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांतून एकसंध भावाकृती आकार घेत नाही.

—रसिक

# कलही छुट्टीपर आ रहा हूँ. हम जीत गये हैं...



युसुफचं पत्र यऊन आठ दिवस होऊन गेले होते.

शमीम तशी रोजच पत्राची वाट बघत बसायची. काहीही न करता सारखी बसून राह्यची. एकटी होती म्हणून सासूला बोलावून घेतलं दिराकडून. शेजारच्या उमराबीचा नइम दारावरून हमखास चकरा टाकताना आढळायचा. घराच्या दारासमोरून निघालेली बोळ मोठ्या रस्त्याला लागलेली. बोळीच्या काठावर बोरग्यात लपलेल्या दरवाज्याची पडकी मातीची घरं. घरात बेसुमार पोरं. कशाचीच पर्वा नसलेले. बायका-सुतकी चेहऱ्यांनी सर्व उरकणाऱ्या. शमीमच्या दारालगत अगदी खेटूनच बोळीच्या विरुद्ध दिशेला तोंड असलेलं घर. त्यात वावरणारी तीनच माणसे. तेवढंच एक घर सिमेन्ट काँक्रीटचं. बाहेर व्यवस्थित पण महागाचा पडदा लावलेलं. पडद्यावरची वेलबुट्टी अनेक रंगांची, बघत राहावं असं डिझाइन. पडदा ओलांडल्यावर लागणारा 'मर्दाना'. त्यापलीकडं खेटूनच 'जनानखाना' आणि तिथं नेहमी अंथरुणावर पडून असलेली 'बडी माँ' मर्दान्यात आराम खुर्चीवर मिशांचे हिरवट झुपके ओठावर बाळगणारा 'कादरमिया' यांचा एकूलता एक पोरगा नइम. कॉलेजमध्ये शिकायला.

# हार

## सुरेश जाधव

शमीम दारातल्या एका सतरंजीच्या तुकड्यावर बसून न्याहळीत असते. नईम सारखा ये, जा करायला लागलेला असतो. आठ दिवसापूर्वीचं युसुफचं पत्र त्यानंच वाचून दाखविलं होतं. पत्र वाचून संपल्यावर शमीमकडं बराच वेळ तो भरून आलेल्या आकाशाकडं बघावं तसा बघत होता. सासूनमध्ये जायचं सांगितल्यावर तो भानावर आला.

शमीम आज भल्या पहाटेपासून युसुफचं मागचं पत्र घेऊन बसली होती. नइमच्या तोंडून ऐकलेलं पत्र तिला सारखं आतासुद्धा ऐकल्यासारख वाटत होते.

प्यारी शमीम,

आखिर जिसका इन्तजार था वह शुरू हो गया है. जंग शुरू हो गया है शमीम. अब हम लोग मोर्चेपर है. ना जाने कब हमे कहाँ जाना होगा। अब हम कल रह सकते है या नही...बता नही सकते शायद अब आगलीबार मै खत लिख सकूंगा या नही. यह भी बोल नही सकता...अब इस वक्त हम दुष्मन से काबीज किय हुए ठानेपर बैठे संट्रियो का काम कर रहे हैं। यह खत थोडी देर से हमारे खास सिपाही आकर ले जायेगे. जो तुम्हे कुछ दिन बाद मिलेगा या मिल भी नही सकता.

शमीम.. एक तमन्ना जो दिल में ना जाने कबसे थी. छुट्टीपर आया था तब कह नही सका...हमे शादी की पहली रात मनाने केलिये कही ऐसे जगहपर जाना था...

...खैर जाने दो अब ऊन बातोंको ..एक काम करना नझीर के पास माँ होगी. उसे अब तेरे पास बुलाले...शायद तेरा अकेलेपन से जी नही लगता हो.. वक्त कहेगा–माँ...को भी अच्छा लगेगा...आते वहाँ माँ से मिल न कसा...शायद... यहाँ से वापस आगया तो...अब तूम्हारी मुलाकात...वरन समझलेना...मेरा यह आखरी खुदा हाफीज...

हाँ.. एक बात याद रखना शमीम...अगर मेरे कपडे वापीस आये तो समझलेना ...मैं अब इस दुनियाँ में नही हूँ...मेने तेरे नामपर पैसे रख छोडे हैं उसे हिरासत मे लेकर कहीं और शादी कर लेना...क्या अभी दो साल तो बीते हैं...नझीर को

प्यार. तूम्हारा...युसुफ.

शमीमच्या नाकपूडया एकाएकी फूरलेल्या डोळयांच्या कडा पाणवल्या. छाती भरून आली. युसुफ-युसुफ असा आवाज आतून येऊ लागला. फक्त ओरडता येत नव्हते. ओठ आवळले जात होते. मुठी वळल्या जात होत्या. मनात मिल्ट्रीवाल्यांना शिव्यांची लाखोली वाह्यली जात होती. मनगटाकडे बघितलं. बांगडयांचा रंग फिका पडल्यासारखा वाटत होता. सुट्टीवर येताना युसुफ मुद्दाम घेऊन आला होता. एकान्तात त्याने स्वतःच्या हाताने घातल्या होत्या. केवढी धडपड चालली होती. जणू बऱ्याच दिवसानंतर अंधारात राहिलेल्या माणसाने सूर्य बघायला धडपडावं तसं. धसमुसळेपणा. राकटपणा. शमीम अंग सैल सोडायची. युसुफ क्षणभरही तिच्याजवळून हलत नव्हता. कामावर असताना खांद्यावरची संगीन सतत बाळगावी तसं शमीमला तो बाळगत होता. शमीम फक्त त्याचीच होती आणि तो फक्त शमीमचाच होता.

शमीमनंही त्याला एकदा बघितल्यावरच पसंत केलं. युसुफनं घरच्यांना न बिचारता पसंत केलं. शमीमच्या आईनं ' दामाद फौजमें है. मैं अपने बेटी की उसके हवाले नहीं करूंगी ' म्हणून आठ दिवस उपवास केला. पण बापानं ' दहेज ' द्यायला घरात काहीच नसल्यामळं श्रीमंत जावइ शोधण्याचा बेत रद्द करून त्यानं युसुफच्या हवाली केलं. युसुफ– जातीने रोहिला. लालबुन्द. नाकाडोळयांनी नीटनेटका. फारसा उंच नव्हता. भरदार बांध्याचा. शमीमनं त्याच्या डोळयाला डोळा भिडविला अगदी पहिल्यांदाच आणि युसुफ हसला. लग्ना अगोदर ' सहेलीं 'नी सांगितलं, तेरा मरद फौजमें है...तो फिर क्या पता उसको कौनसे भी वक्त लडने को भेज देंगे मिलटरीवाले. और समझ वो. वुधर के वुधरी...च...' शमीम एकाएकी अस्वस्थ झाली. तिनं समोरच्या आरशात बघितलं. रसरशीत असलेली आपली ही जवानी. याचा उपभोग घेणाराचं कुणी नसला म्हणजे मग ? आणि खरच युसुफ तिकडंच ' खलास ' झाला तर ? त्यापेक्षा कुण्या दुसऱ्याशी लग्न केलेलं काय वाइट आहे. का म्हणून उभा जन्म विधवावस्थेत काढायचा. का ' जिंदगी ' वाया घालवायची...पण परत तिला युसुफचा तो हर्षभरित चेहरा दिसला. त्याचे ते पोटभरून हसणारे डोळे. शेवटी त्याला कुणीतरी मुलगी देईलच. तिलाही असंच काही वाटणार नाही कशावरून. मग युसुफ ' कुँवारा 'च राहिल. त्यालासुद्धा जवानी आहेच की. मन आहे. माया-प्रेम घर-दार सारे-सारे काही आहे. आणि उलट ' फौजे 'मध्ये जाऊन त्यानं आपल्या देशाशी इमान राखलं आहे. त्याच्याशीसुद्धा कुणीतरी लग्न करायलाच पाहिजे. युसुफला काय वाटेल आपण नकार कळवला तर. कदाचित तो आपला चेहरा विसरूनही जाईल. दुसरी कुठली मुलगी शोधून काढील. तीही जर त्याच्याशी लग्नाला तयार नाही झाली तर...तर मग युसुफ नाराज होईल. थकून संतापून घरी येईल. आईला शिव्या देईल. भावावर–मित्रांवर

समाजावर चिडेल संतापेल......नाही......आपण त्याच्याशी लग्न करायलाच हवं......

शमीमचं धाडस बघून 'आम्मी' थंडावली. 'आव्वा' पुढं मान टाकली. शमीम युसुफची झाली.

युसुफ दरवर्षी सुटी घेऊन येत होता. अजून तीन वर्षांनंतर त्यांना तिकडेच घरं मिळणार होती. बायका-मुलांसह संसार थाटता येणार होता. सगळ्यांसारखं आयुष्य जगता येणार होतं. बायकोसोबत एकान्तात रात्री-अपरात्री गोड गप्पा करता येणार होत्या. मुला-बाळांना शाळेत स्वतः पोचवता येणार होतं. त्यांच्यावर प्रेम करता येणार होतं. सुखाचा संसार करता येणार होता.

मध्येच जंग सुरू झालं.

युसुफ सुट्टीवरून परतला आणि ठिणगी उडाली.

शमीमच्या डोळ्यांसमोरून इतिहास सरकला. गालांवर साचलेले अश्रू तिनं हळूच टिपले. केसाच्या झिज्या मागे सारल्या. पडलेला पदर सावरला. कारण त्यामुळं उघडा झालेला शरीराचा भाग नइम निरखून-निरखून येता-जाता बघू लागला होता. नइमनं लावलेल्या अत्तराची 'खुषबू' तिच्या नाकापर्यंत पोचत होती. तिला वाटलं नाक दाबून धरावं. नाही तर इथून उठून जावं. तो सुगंध नव्हता. युसुफच्या पत्रातल्या एकेका ओळीचा मनाला पिळवटून टाकणारा सुस्कारा होता. घरात जाऊन तरी करणार काय. सासू स्वैपाकघरात मश्गूल असणार. तिची एकमेव बाज. त्यावरची ती जुनी गादी. युसुफ गेला तेव्हा वर काढून ठेवलेली मच्छरदाणी अजून तशी वरच आहे. त्याच्या सपाता तेवढ्या विसरून राहिल्या आहेत. तो बाजेवर बसायचा तेव्हा हलकेच पायांनी तो त्या मागे सारायचा. तशाच एकदा त्या मागे सारून ठेवलेल्या आहेत. त्या मागं-पुढं किंचितसुद्धा हाललेल्या नाहीत. तो मुद्दाम विसरून गेलाय. एकदा तो म्हणाला होता. "शमीम बाहर-वाहर जानेको रखले ये. मुझे नहीं जुरूरत इनकी."

शमीमला म्हणावसं वाटलं होतं, 'युसुफ, तेरे बदनके हर रोमरोमकी मुझे जुरत है...तेरे अच्छे बुरे की, तेरे हाँ-ना की. तेरे बस एक नजर का भी खाली जाना मुझसे बर्दाश्त नहीं होता. तो तू इसकी क्या बात करता है.' पण शमीम त्यावेळी बोलू शकली नाही. बोलता आलं नाही. सासू-दीर, मित्रमंडळी सोबत होती.

ड्रेसवर युसुफ उमदा आधिकारी दिसत होता. स्टेशनवरच्या प्रत्येकाची नजर त्याच्याकडे होती. शमीम गोबऱ्या गालानी रडणं दाबून धरण्याचा प्रयत्न करीत होती. बळेच हसत होती. गाडीत बसल्यावर दरवाज्यात तो उभा होता. ती अगदी जवळ जाऊन उभी राहिली. बाकी सारी मंडळी लांब उभी होती. शमीमनं हलकेच त्याचा हात हातात घेतला छातीवर धरला. डोळ्यावर धरला. डोळ्यांतल्या पाण्यानं त्याचा हात भिजला होता. ती काही बोलत नव्हती. खाली मान घालून

बंद डोळ्यांनी रडत होती. फक्त आतून-बाहेरून सारखी रडत होती. वाटत होतं युसुफच्या सोबतच जावं. त्याच्याच अंथरुणा-पांघरुणात झोपावं. त्याच्याच ताटातील उष्टं खावं. त्याचं बरं-वाईट वाटून घ्यावं. पण त्याला एकटं सोडू नये. क्षणाचाही त्याचा आपला विरह होऊ नये. लग्नाची दोन वर्षं दोन दिवसांसारखी निघून गेली. धड बसून मन मोकळं करून बोलतासुद्धा आलं नाही. एखाद वेळ नोकरी सोडून दे ' म्हणावसं वाटायचं. पण विचार बदलायचा...

शमीम त्याचा हात सोडता सोडीत नव्हती. गाडीनं शिट्टी दिली. आपल्या शरीराचा एखादा भाग कुणीतरी घेऊन जात आहे असंच तिला वाटत होतं. युसुफ एक पायरी खाली उतरला हळूच तिच्या कानाजवळ तोंड नेलं आणि पुटपुटला ' मेरी...जान...फिर आऊंगा छुट्टीपर तो बस. जाते वक्त तुझे साथ लेकर जाऊंगा." आणि तिचा हात हातात घेऊन पटकन ओठाजवळ नेला. तिथल्या तिथंच अनेकदा त्यानं आपले ओठ तिच्या मनगटावर उमटविले. हळू हळू गाडी पुढं सरकत होती.

आणि महिन्याभरातच त्याचे पत्र,

शमीमनं नइमकडून आलेलं पत्र वाचून घेतलं. सासू हजर होती. सासूनं नइमलाच विचारलं होतं.

" बेटा ये लोग जंग कायके वास्ते करते रे. क्या इनकू कुछ भी काम नै रहता क्या. "

" हॉं चाचीजान...यह जंग खेलना पडता है. जब दुष्मन हमपर चाल चलता है तो उसे मूं तोड जवाब देना पडता है "

असं म्हणून नइमनं शमीमकडं बघितलं होतं. चाचीजान लगेच शमीमकडं बघून म्हणाली.

" शमीम बेटी.. पाणी उबल रहा है. अन्दर जाके जरा देख तो.

शमीम सासू बोलायच्या आतच झटसरशी निघून घेली.

त्या दिवशी रात्रभर शमीम त्या पत्राला छातीशी धरून होती. वाटत होते जणू युसुफच तिच्या साथीशी आहे. बोलतो आहे. हसतो आहे. तिच्याशी ' मजाक ' करतो आहे....शमीम आता मात्र भयंकर अस्वस्थ झाली होती.

नइम सायकल स्टँडवर लावायच्या निमित्तानं बराच वेळ तिच्याकडेच बघत उभा होता. सारखा टक लावून बघत होता. शमीमसुद्धा अपलक बघत होती. तो एकाएकी तिच्याजवळ आला. शमीमला आपल्या अंगावर कुणीतरी वाघ-सिंह आल्यासारखा वाटला. आणि आता तो खाणार आपल्याला. आपण मरणार. ओरडायला पाहिजे पण आवाजच निघत नाही. आतल्या आत दबून जात होता. छाती धक्-धक् करीत होती. पदर सावरून नीट बसली. नइमनंच विचारलं.

' क्यो भाभी, दिल नही लग रहा हैं. क्यों उदाससी बैठी हो सुभहसे. क्या बात है ? कमसेकम मुझसे तो कहो. शायद क्या बात है मेरी भी समझमें नही आता. तुम्हारे

बारे में मैं अनजानेमें अकेलें में कुछ ना कुछ सोचता रहता हू. कुछ अपनापन महसूस करता हूँ."

"ठिक हैं. मैं आपकी शुकर गुजार हूँ. भला यह हैं की आप चाचीजान के मौजुदी में न आता ही ठिक हैं. हम सोचते एक हैं. दुनियादारी अलग चीज हैं."

"भाभीजान...आपको क्या पता. युसुफ भैया होते तो आपको बता देते मेरे बारे में. हम बचपनके साथी हैं. ये बात तो आपको अच्छी तरहसे मालूम हैं. आपको पहली बार देखने के बाद चाची के पहले उसने मुझे तो दिखाया था और पुच्छा था."

"क्या..."

"आपके बारे में. हालाँकी मैंने आपको कइबार देखा था. और."

"और क्या." बताइये ना...और...क्या..."

तेवढ्यात पोस्टमनचा आवाज आला. हातात तार 'कलही छुट्टीपर आ रहा हूँ... हम जीत गये हैं..." नइमचा कातरस्वर.

स्टेशनवरची वर्दळ वाढतच चालली होती. आपसातली पाच-पन्नास माणसं हार घेऊन युसुफचं 'जंग जितकर आया हैं' म्हणून स्वागतासाठी आली होती. चाचीजान-शमीम-नझीर-युसुफचा धाकटा भाऊ, नइमची बडीमाँ, कादरमियाँ.

पुरुषमंडळी एकोप्यानं उभी होती. स्त्रिया दुसरीकडं उभ्या होत्या. शमीम सगळ्यांच्या मध्ये होती. एकेक क्षण कसा पार पडेल याची धास्ती तिला वाटत होती. गाडी कुठपर्यंत आली असेल. युसुफ सुरक्षित परतला. असेल ना! कसा दिसत असेल? युद्धात काही हानी तर झाली नसेल ना? कधी युसुफला बघायला मिळेल. या एका विचाराशिवाय तिच्या मनात काहीही नव्हतं. तिचं अंगांग फुलून आलं होतं. झाडाला मोहर फुटावा तसा तिच्या शरीरातला रोम रोम फुलत होता.

एवढ्यात गेटमधून नइम हातात हात गुंडाळून आत आला. दुसरीकडंच उभा राहिला. डोळ्यात नरमाइ होती. चेहरा सुन्न होता. नजरेत उदास छटा. त्यानं एकदा शमीमकडं बघितलं. का कोण जाणे शमीम त्याच्याकडे बराच वेळ बघत राहिली.

गाडी आल्यावर ती भानावर आली. सर्वांसमोर युसुफनं शमीमला मिठी मारली. बराच वेळ त्यांना जणू स्वर्गात असल्यासारखंच वाटत होतं. सारं सारं विसरून ते एक झाले होते.

युसुफ गेटबाहेर पडताना मध्येच नइम आडवा आला. त्यानं हार गळ्यात घालून कडाडून मिठी मारली. पुटपुटला 'तुझे जंग मुबारक. तुम्हे...' पुढचं बोलायच्या आत माणसांच्या गरदीतनं युसुफ पुढे गेला. त्याच्या मागं इतर अनेक माणसं. बाया. त्यात एक शमीम व सर्वांत शेवटी नइम. फलाटावर उभं राहून बघत होता. टांग्यात बसून शमीम व युसुफ घराकडे निघाले होते. ◻ ◻ ◻

# घरात पुन्हा पाळणा हलण्यापूर्वी
# विचार करा




त्याला शिक्षणाचे पहिले वहिले धडे गिरवायला मदत. त्याच्यासाठी योजलेल्या इतर अनेक गोष्टींची निश्चित तरतूद. पण अशातच इतक्या लवकर आणखी एक मूल म्हणजे मग हे सर्व कदाचित अवघड होईल. तेव्हा असा प्रसंग टाळणेच श्रेयस्कर नाही का !

लक्षावधि जोडपी जगात आज हेच करीत आहेत. ती परिस्थिती नीट अनुकूल होईपर्यंत दुसरे मूल होणे पुढे ढकलतात. निरोध वापरून तुम्हालाहि हे सहज करता येईल. निरोध हे जगातील फार लोकप्रिय असे पुरुषांनी वापरायचे रबरी संतति-प्रतिबंधक साधन आहे. लक्षात ठेवा, पाळणा लांबविण्याचा सर्वात सोपा व बिनधोक मार्ग म्हणजे निरोध अनेक पिढ्यांनी तो यशस्वी रीत्या अनुसरलेला आहे. मग तुम्हीहि निरोध का नाही वापरीत !

**कुठेहि मिळते. फक्त 15 पैशांला 3 (सरकारी मदतीने).**




लांबविण्यास पाळणा, उपाय साधा सोपा जाणा

# निरोध ▼

लक्षावधींच्या पसंतीचे साधे बिनधोक संतति प्रतिबंधक

davp 71/419

केमिस्ट, वाणी, जनरल स्टोअर्स, पानाची गादी वगैरे अनेक ठिकाणी सहज उपलब्ध.

म. श्री. दीक्षित

पुस्तकें

# ग्रँट डफ

## मराठ्यांचा आद्य इतिहासकार

पुणे विद्यापीठातील इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी १९७१ साली 'कै. न. चि. केळकर स्मारक व्याख्यानमाले'त 'जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ : मराठ्यांचा इतिहासकार व प्रशासक' या विषयावर सहा व्याख्याने दिली होती. ती आता 'जेम्स कनिंगहॅम ग्रँट डफ' या ग्रंथाच्या रूपाने पुणे विद्यापीठा-मार्फत प्रकाशित झाली आहेत. प्रस्तुत ग्रंथात ग्रँट डफचे जीवनचरित्र आणि त्याचे कार्य, याची विस्तारपूर्वक ओळख मराठी वाचकांना प्रथमच होत आहे. हे कार्य भरीव, मुळारंभीचे व म्हणून फार मोलाचे आहे. प्रशासक आणि मराठ्यांचा आद्य इतिहासकार अशा दुहेरी नात्याने ग्रँट डफने बजावलेल्या कार्याची ओळख करून देताना डॉ. कुलकर्णी यांनी संशोधनबुद्धीबरोबरच परिश्रम आणि समतोलवृत्ती भरपूर वापरली आहे. खोट्या राष्ट्रीय अभिनिवेषाला बळी न पडता एका परक्या, परंतु कष्टाळू, प्रामाणिक, समंजस प्रशासकाचे आणि इतिहासकाराचे विस्तृत चरित्र ज्ञानोपासकाच्या शुद्ध भूमिकेतून त्यांनी सादर केले याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

'ग्रँट डफ' या डेमी आकाराच्या ग्रंथाच्या पहिल्या ३१ पृष्ठांत 'योगायोग' हे ग्रंथनिर्मितीची पार्श्वभूमी सांगणारे कथन आणि डॉ. पु. म. जोशी यांची विषयसंबद्ध अभ्यासपूर्ण प्रस्तावना असा दोनप्रकारचा महत्त्वाचा मजकूर आहे. प्रत्यक्ष ग्रंथ अकरा प्रकरणांत विभागला असून शेवटी सूची आणि संदर्भग्रंथ व संक्षेप अशा उपयुक्त मजकुराची जोड दिलेली आहे. या शिवाय शिळाप्रेसवर छाप-लेल्या पहिल्या मराठी आवृत्तीच्या पृष्ठाचा ठसा आणि श्रीमती ग्रँट, राजे प्रतापसिंह, ग्रँटचा गुरु एल्फिन्स्टन, खुद्द ग्रँट, आणि त्याचे सातारचे निवासस्थान अशी ७ दुर्मिळ चित्रे या ग्रंथात आहेत. ग्रंथ सर्वांगपरिपूर्ण करण्याच्या दृष्टीने चरित्रनायकाच्या स्वाक्षरीचा ठसादेखील देण्यास ग्रंथकार विसरला नाही. हा ग्रंथ 'महापुरुष'

दत्तो वामनांना ' ज्यांच्यावर कधीही रागवता येत नाही ' अशा शब्दात अर्पण केला आहे. एकापरी या शब्दात पोतदारांविषयीचा सार्वत्रिक आदरभावच लेखकाने प्रकट केला आहे.

जेम्स ग्रँटचा जन्म इ. स. १७८९ साली, म्हणजे फ्रेंच राज्य-क्रांतिकाळातला आहे. वयाच्या सोळाव्या वर्षी (१८०६) तो मुंबईला आला व ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करात रुजू झाला. त्याच्या कर्तृत्वाला सुरुवात झाली ती १८१७ साली. पुण्याचा कर्तबगार रेसिडेंट माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन याच्या हाताखाली काम करण्याची संधी मिळाल्यामुळे ग्रँटला लवकरच बढती मिळाली. पेशवाईच्या समाप्तीनंतर १८१८ साली साताराचा पोलिटिकल एजंट म्हणून तो काम पाहू लागला. पेशवाई अंमल नष्ट करून सातारला छत्रपतींच्या गादीचे पुनरुज्जीवन एल्फिन्स्टनने केले, तर या गादीवर आरूढ झालेल्या अननुभवी प्रतापसिंहाला ममत्वाने राजधर्म शिकवून साताराच्या राज्याची घडी सुव्यवस्थीत बसविण्याचे कार्य ग्रँट डफने केले, आणि तेही अवघ्या चार वर्षांत. राजा प्रतापसिंहाला दिलेले स्वातंत्र्य अर्थातच मर्यादित होते. ग्रँटचे कार्यकौशल्य हे, की त्याने संक्रमणकाळाचे पूर्ण अवधान ठेवून, आणि राजा नि त्याची प्रजा यांची मर्जी सांभाळून, किंबहुना स्थानिक वातावरणाशी समरस होऊन, एल्फिन्स्टनने सोपवलेली अवघड जबाबदारी चोखपणे पार पाडली.

सातारला प्रशासनाचे चार वर्षांचे कार्य आटोपून मग हा गोरा साहेब, १८ वर्षांतील भारतातील वास्तव्य संपवून मायदेशी परत गेला आणि तिथे ३८ व्या वर्षी संसाराला लागून, उर्वरित आयुष्य प्राय: निवृत्तावस्थेत कंठून, १८५८ साली, वयाच्या ६९ व्या वर्षी मृत्यू पावला. प्रशासक या नात्याने त्याची कामगिरी कंपनी सरकारच्या लेखी सुवर्णाक्षरांनी लिहिली गेली. पण मराठी जनमानसात या पुरुषाचे नाव पुढे शतकभर दुमदुमत राहिले ते त्याच्या ' हिस्टरी ऑफ द मराठाज् ' (मराठ्यांची बखर) या ग्रंथामुळे. या ग्रंथाची पूर्वसिद्धता त्याने साताराच्या वास्तव्यातच केली होती. मायदेशी गेल्यावर पुढे हा ग्रंथ १८२६–२७ च्या सुमारास प्रकाशित झाला. अंग्रेजी वाचकांसाठी तो मुख्यत: लिहिला गेला असल्यामुळे व खुद्द लेखक अंग्रेजी सरकारचा सनदी नोकर असल्यामुळे तो काहीसा एकतर्फी लिहिला गेला व अस्सल साधनसामग्रीच्या अभावामुळे मराठ्यांच्या इतिहासाचे यथार्थ दर्शन देण्यास तो असमर्थ ठरला. १८६८ पासून कै. कीर्तने, राजवाडे, रानडे, खरे, साने, पारसनीस प्रभृती इतिहासकारांनी या ग्रंथाचा परामर्श घेण्यास आरंभ केला आणि ग्रंथाचे नाव सर्वतोमुखी झाले. इंग्रजीत आणि मराठीत या ग्रंथाच्या १९१६ पावेतो प्रत्येकी सहा आवृत्त्या निघाल्या यावरून या ग्रंथाचे महत्त्व सिद्ध झाले.

डॉ. कुलकर्णी यांच्या ग्रँटसंबंधीच्या या ग्रंथात ग्रँटचा गुरू एल्फिन्स्टन, दुय्यम सहकारी बाळाजीपंत नातू आणि प्रतापसिंह महाराज यांच्यासंबंधी बरीच माहिती आलेली आहे व ती सर्व वाचनीय आहे. एल्फिन्स्टन-ग्रँट यांच्यातील प्रेमादराचे

किंवा प्रतापसिंह व ग्रँट यांच्यामधील महत्त्वाचे संबंध इतक्या तपशीलाने वाचकांना प्रथमच या ग्रंथात वाचावयास मिळतील. प्रशासक ग्रँटची प्रतिमा, त्याच्या कार्यपद्धतीतील अनेक उदाहरणे देऊन, डॉ. कुलकर्णी यांनी चांगली उभी केली आहे. तथापि या प्रतिमेबद्दल स्वातंत्र्यप्रेमी वाचकांना मुळातच आकर्षण कमी असल्यामुळे, ती कितीही उजळून दाखविली, तरी आदराचा विषय होऊ शकत नाही. ग्रँटसारख्या राज्यकर्त्या प्रतिनिधीची छत्रपतींशी मैत्री आणि त्याच्या राज्याविषयीचे प्रेम हे निखालस खोटे म्हणता आले नाही तरी काहीसे मायावी म्हणता येईल. प्रतापसिंहाच्या पदच्युतीनंतर ग्रँटला वाईट वाटले व त्याने काही बाबतीत स्वकीय सरकारला सौम्य शब्दात दोष दिला हे खरे असले, तरी याबाबतीतील त्याचा वैताग, मुग्धता, (पृ ११०–१११) अर्थपूर्ण आहे. छत्रपतींचे गाऱ्हाणे मांडण्यासाठी रंगो वापूजी इंग्लंडला गेला असता ग्रँटसाहेबाने त्याची किती दखल घेतली या प्रश्नाचे उत्तर डॉ. कुलकर्णी यांच्या ग्रंथात आढळत नाही. सारांश, ग्रँट हा कनवाळू, पण अखेर गोरा अंमलदारच होता हे ध्यानी घेऊन, डॉ. कुलकर्णी यांची त्याच्यासंबंधीची मते विचारात घेतली पाहिजेत.

## योग्य मूल्यमापन

ग्रँटच्या इतिहासाच्या सिद्धतेची नि प्रकाशनाची हकीकत सांगणारी ९ व १० ही प्रकरणे आणि 'टीकाकार' हे ११ वे, ही तीन प्रकरणे म्हणजे या ग्रंथाचा गाभा आहे. अस्सल ऐतिहासिक साधनांचे दुर्भिक्ष्य असलेल्या त्या काळात एक परकी माणूस मराठ्यांचा इतिहास लिहिण्याची जिद्द बाळगून, साधनसामग्री गोळा करण्यासाठी प्रकृतीची पर्वा न करता किती काबाडकष्ट करतो व अखेर पदरमोड करून आपला ग्रंथ प्रकाशात आला यातच जीविताची सार्थकता मानतो ही सारी उद्बोधक नि प्रेरक कथा ९ व १० या प्रकरणात आलेली आहे. 'टीकाकार' हे सर्वांत महत्त्वाचे प्रकरण. १८६८ सालच्या कीर्तन्यांच्या पहिल्या टीकेमुळे ग्रँट डफच्या ग्रंथाकडे मराठी वाचकांचे लक्ष वेधले गेले. यानंतर महत्त्वाची टीका राजवाडे आणि खरे यांनी केली, तर पारसनिसांनी ग्रँटला जरा सांभाळून घेतले. या साऱ्या टीका योग्य होत्या. तथापि, त्या करतांना अधिक समंजसपणाची अपेक्षा होती. ग्रँट डफचा काळ कोणता, त्याला साधने कोणती मिळण्याजोगी होती, जी मिळाली त्यांवर त्याने आपली इमारत कशी डौलदार उभारली याचा फारसा विचार न करता स्वदेशाभिमानाने भारावून जाऊन त्याच्या ग्रंथाची फार चिरफाड झाली. डॉ. कुलकर्णी यांनी या सर्व टीकाकारांची टीका उधृत करून ग्रँट आणि टीकाकार या उभयतांचे गुणदोष साधार मांडले आहेत व हाच त्यांच्या ग्रंथाचा विशेष म्हणावा लागेल. शिवाजीसंबंधी ग्रँट डफने 'कोठे अनुदार उद्गार काढल्याचे दिसत नाही' असे पृ. २४६ वर ग्रंथकाराने म्हटले आहे. परंतु १८९६ च्या मराठी आवृत्तीत (की जिचा या ग्रंथात ५ वी– १८९२ ची म्हणून उल्लेख आहे) पृष्ठ ८६–८७

वर ' त्याची कितीएक कृत्ये वाईट होती, राज्यकार्य करण्यात त्याचे बुद्धीस सरळ मार्गापेक्षा कुटिल मार्ग चांगला वाटे, त्याने कितीएक वेळा आपला क्रूरपणा व घातकपणा प्रसिद्ध करून दाखविला, त्याचा स्वभाव शीघ्रकोपी असे ' हे जे उद्‌गार आढळतात ते अनुदारपणाचेच नव्हेत काय ? शिवाजीविषयी ग्रँटच्या मनात एकंदरीने सहानुभूती दिसली तरी शिवाजीचे मोठेपण वर्णन करताना साहेबाचे तोंड थोडे कडू होणे साहजिक होते. डॉ. कुलकर्णी यांच्या ग्रंथात अशा खटकणाऱ्या काही बाबी आढळत असल्या तरी त्यांनी आपला ग्रंथविषय उत्तम वकिली करून मांडला आहे व त्यामुळे जिज्ञासू, अभ्यासू, तसेच सामान्य वाचक प्रभावित झाल्याखेरीज राहणार नाहीत. ग्रँटपेक्षा अनेकपटींनी विधायक कर्तृत्व अंगी असणाऱ्या एल्फिन्स्टनचे सांगोपांग चरित्र डॉ. कुलकर्णी यांनी आता लिहावे अशी त्यांना यानिमित्ताने कळकळीची विनंती करावीशी वाटते. ◻

**जेम्स कनिंगहॅम ग्रॅन्ड डफ** : ले. डॉ. अ. रा. कुलकर्णी;
पुणे विद्यापीठ प्रकाशन; पुणे ७; मूल्य १२ रु.


लालमहाल
पन्हाळगड
राजगड
पुरंदर
आग्रा

ब. मो. पुरंदरे

राजहंस प्रकाशन
पुणे

मूल्य प्रत्येकी
तीन रुपये

 पृष्ठ १६ वरून

कु. शमीम अत्तार यासारख्या सुशिक्षित महिलांनीच नव्हे तर सौ. बँडवाले, सौ. बानुबाई यांसारख्या अर्धशिक्षित व अशिक्षित महिलांनीही मुस्लिम महिलांवर होत असलेल्या अन्यायांना वाचा फोडून ठरावाला जोरदार पाठिंबा दिला. इतकेच काय पण श्रीमती फकर बेगम (दिल्ली) श्रीमती आस्मा मस्कती (सुरत) व प्रा. जहाँआरा बेगम (कलकत्ता) इत्यादी पाहुण्या प्रतिनिधींनीही या विषयावरील आपले विचार मोकळेपणाने मांडून आपण महाराष्ट्रातील मुस्लीम महिलांइतके प्रगत असल्याचे सिद्ध केले. इतर ठरावात कुटुंब नियोजन व महिला आणि आर्थिक स्वातंत्र्य हे विशेष नमूद करण्यासारखे ठराव होते. धार्मिक नियम अथवा परंपरा यांचा मुलाहिजा न ठेवता कुटुंब नियोजनाबद्दल आपापले धोरण ठरविण्याचा प्रत्येक व्यक्तीला हक्क आहे असे ही परिषद मानते व म्हणून केंद्र सरकार व काही राज्ये यांनी कुटुंब नियोजन लोकप्रिय व जनमान्य करण्यासाठी चालविलेल्या प्रयत्नांचे स्वागत करते, असे कुटुंब नियोजनावरील ठरावात म्हटले आहे. आर्थिक स्वावलंबन व स्वातंत्र्य ही महिलांची प्राथमिक गरज आहे. मुस्लीम महिलांचेबाबत तर ती अधिकच महत्त्वाची आहे, असे मत व्यक्त करून सरकार आणि खाजगी संघटना व नागरिक यांनी मुस्लीम महिलांना व्यवसाय-उत्पादनाचे शिक्षण देण्यासाठी कार्यक्रम आखावा अशी शिफारस या परिषदेने आपल्या महिला व आर्थिक स्वावलंबनावरच्या ठरावात केली आहे. याशिवाय भारत-पाक युद्ध, बांगला देश आणि शिक्षण इ. विषयांवरील ठरावही संमत करण्यात आले.

या परिषदेच्या निमित्ताने नवीन नवीन ओळखी होतील ही अटकळ होतीच. माझी परिचयाची ओढ मला खूप काही देऊन गेली. पुष्कळ नव्या ओळखी झाल्या. त्यातील काहींनी केलेले परिणाम चिरस्थायी स्वरूपाचे होते. मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे अध्यक्ष श्री. बाबूमिया बँडवाले हे लोभस व्यक्तिमत्व विसरू म्हटले तरी न विसरण्याजोगे. पासष्टी गाठलेला हा वृद्ध तरुण......त्यांचा उत्साह तरुणांना लाजविणारा आहे. बालसुलभ निरागस आणि आर्जवी स्वभाव आणि थकत आलेल्या डोळ्यांत एक मिष्किल झाक. या माणसानं खूप काही पाहिलं आहे, अनुभवलं आहे याची साक्ष त्यांच्या प्रत्येक उद्गारातून मिळत होती. त्यांच्या सहवासाचा सुगध कुपीत जपून ठेवावा असा! १९३० पासून ते स्वातंत्र्यलढ्यात आहेत. दोनदा तुरुंगाची यात्राही घडलेली. परंतु केवळ कारावासाचे भांडवल घेऊन स्वार्थ साधण्याची वृत्ती मात्र नाही. सत्तेचा हव्यास नाही. बँडवादनाचा पिढीजात व्यवसाय करणाऱ्या या माणसाने माणुसकीच्या सुरांची साधना करावी यात फार मोठे औचित्य आहे. सर्वांशी सारख्याच मोकळेपणाने मिसळू शकणारा हा भला गृहस्थ

जीवनाच्या नव्या कक्षा दर्शवून गेला. साऱ्याच कार्यकर्त्यांना त्यांचा बुजुर्ग आधार !

याच खणखणीत नाण्याची दुसरी चमकदार बाजू म्हणजे सौ. कमल पाध्ये ! त्यांच्या पहिल्या फेरीतच मी प्रभावित झालो. महिला कार्यकर्त्याविषयींच्या माझ्या साऱ्या कल्पनांना त्यांनी फार मोठा हादरा दिला. तथाकथित सोफिस्टिकेटेड महिलांपासून त्या कैक योजने दूर आहेत. हाती घेतलेल्या कार्याची तळमळ त्यांच्या प्रत्येक हालचालीत प्रतिबिंबित झाली आहे. परिषदेच्या पूर्व तयारीपासून तो परिषद पार पडेपर्यंत त्यांनी जे कष्ट घेतले त्यांना तोड नाही आणि पुन्हा सारे करून त्या प्रसिद्धीच्या झगमगाटापासून दूर असतात.

कु. नजमा शेख व कु. मरियम रिफाई या तर परिषदेच्या निमत्रक. मुस्लीम सत्यशोधक मंडळाच्या स्थापनेपासून त्या मंडळाच्या कार्यकर्त्या आहेत. या कार्याची वाट किती काटेरी आहे याची जाणीव त्यांना नाही असे नाही. अनेक गलिच्छ व हीन आरोप त्यांच्यावर करण्यात आले आहेत. शिव्या व कुत्सित बोलणी तर त्यांना रोजच ऐकावी लागतात. परंतु तरीही या कार्याचे महत्व जाणून मंडळाचे काम त्या निष्ठेने करीत आहेत. अशा प्रतिकूल परिस्थितीतही पुण्यातील जवळजवळ साठ महिलांना प्रतिनीधी म्हणून आणण्यात त्यांनी यश मिळवले.

श्री. सय्यद मेहबुब हे मंडळाचे चिटणीस. म्हणून त्यांची जबाबदारीही मोठी व कामाचा व्यापही मोठा. परंतु त्यांनी ही जबाबदारी यथार्थाने पार पाडली. दलवाईंचा पुण्यातला हा पहिला अनुयायी ! मुस्लीम समाजाचा नव्या विचारांना व सुधारणांना असलेला कडवा विरोध पाहिल्यानंतर मंडळाला साधे कार्यकर्तेही मिळतील की नाही या विषयी मी तरी साशंक होतो. परंतु मकबूल तांबोळी, अमीर शेख महंमद युसुफ, सय्यद मुनीर फजल शेख यांसारखे अनेक सुशिक्षित व धडाडीचे कार्यकर्ते या मंडळाला लाभले आहेत. हे पाहिल्यानंतर मुस्लीम सत्यशोधक मंडळाचे भवितव्य उज्वल असल्याची खात्री पटली.

या परिषदेत आणखी एक व्यक्ती आपल्या वैशिष्ट्याने लोकांचे लक्ष वेधून घेत होती. कु. मरियम रिफाईचे पिताजी श्री. रिफाई. कु. मरियमच्या तरुण रक्तात नव्या विचारांचे वारे खेळत असावे हे समजू शकते. परंतु वयोवृद्ध पित्याचाही आपल्या लेकीला संपूर्ण पाठिंबा असावा ही गोष्ट चकित करणारी होती. उंच पांढरी टोपी, लांब डगला, पैजामा असा टिपिकल मुसलमानी पेहराव घातलेली ही व्यक्ती जुनाट विचारांच्या धर्ममार्तंडांची प्रतिनिधी असावी असे वाटणे साहजिक होते. त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलताना मात्र ही समजूत किती चुकीची होती हे कळले. एकच उदाहरण देतो. काही खवचट सनातन्यांनी यांना म्हटले 'तुम्ही मेल्यावर तुमच्या प्रेताला आम्ही हातही लावणार नाही.' तेव्हा या सद्‌गृहस्थाने तितक्याच स्पष्टपणे उत्तर दिले, की त्याची काळजी तुम्हाला करण्याची आवश्यकता नाही. ते काम मी म्युनिसिपालटीकडे सोपवीन.' लेकीला शोभण्या सारखाच पिता !

पुणेकरांनी परिषदेची व्यवस्था मात्र चोख ठेवली होती. राहण्याखाण्यापासून तो चहापाण्यापर्यंत सर्वांचाच सूर चांगला जमला होता. जेवणाची व्यवस्था 'जीवन'-कडे होती व त्यांनीही तो आपल्या कीर्तीला साजेशी पार पाडली. परिषदेत सगळ्याच वक्त्यांनी स्त्रीला समान हक्क मिळाले पाहिजेत, तिने पुरुषांच्या मागे न राहता बरोबरीने चालले पाहिजे, असे आवर्जून सांगितले. परंतु जेवणाच्या पंक्तीत मात्र याचा उलट प्रत्यय आला. स्त्रियांची पंगत प्रथम व पुरुषांची नंतर ! अर्थात पुरुषांनी तेही गोड मानून घेतले हा भाग वेगळा. परिषदेच्या पहिल्या दिवशी संध्याकाळी पुण्यातील संयुक्त स्त्री संस्थातर्फे प्रतिनीधींसाठी चहापानाचा खास कार्यक्रम आयोजीत करण्यात आला होता. शिरा, बटाटेवडा व चहा असा भरगच्च बेत होता. या चहापानामुळे एकमेकांची ओळख होण्यास व परस्पर स्नेहभाव वाढविण्यास मदत झाली एवढे मात्र निश्चित.

अठ्ठावीस डिसेंबरला दुपारी एक वाजता परिषदेचे कामकाज रीतसर आटोपले. त्याच संध्याकाळी सेवा सेवासदन सभागृहात जाहीर सभा घेण्यात येऊन परिषदेची यशस्वी सांगता करण्यात आली. या सभेत श्रीमती यमुताई किर्लोस्कर, ताराबाई शास्त्री, अनुताई लिमये, मालिनी तुळपुळे, फकरबेगम, श्री. गं. बा. सरदार इत्यादींची समयोचित भाषणे झाली. श्री हमीद दलवाई व मुस्लीम सत्यशोधक मंडळ यांनी सुरू केलेल्या कार्याचा सर्वांनीच गौरव केला. तसेच हिंदू स्त्रीला कायद्याने जरी हक्क मिळाले असले तरी ते कागदावरच राहिले आहेत. समाजाच्या खालच्या थरापर्यंत या सुधारणा अजून पोचल्या नाहीत, याचीही जाणीव त्यांनी करून दिली. त्याचबरोबर ज्या काही सुधारणा हिंदू स्त्रीला प्राप्त झाल्या त्या मिळवत असताना आम्ही आमच्या मुस्लीम भगिनींना आमच्याबरोबर घेतले नाही, याची खंत जशी व्यक्त केली गेली तशी यापुढील त्यांच्या कार्यात आम्ही त्यांच्याबरोबर राहू असा दिलासाही मिळाला.

मुस्लीम महिला परिषद अशा रीतीने थाटात पार पडली. प्रतिनिधी एका तृप्तीच्या भावनेत माघारी परतले पण आगामी जबाबदारीची भेदक जाणीवही त्यांना या परिषदेच्या निमित्ताने झाली हे विशेष. □

# योग्य दिशेने वाटचाल

## हिदायत खान

दोन वर्षांपूर्वी 'माणूस'मध्ये हिंदू-मुस्लीम प्रश्नावर लिहिताना श्री. हमीद दलवाई यांच्या कार्य पद्धतीवर मी कठोरपणे टीका केली होती. कारण तेव्हा आग सोमेश्वरी नि बंब रामेश्वरी अशीच एकूण त्यांच्या प्रयत्नांची परिस्थिती होती.

त्यांची सारी भाषणं मुस्लीमेतरांपुढ होत आणि लिखाणही बव्हंशी मराठीं वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध होत असे. प्रत्यक्ष कार्याच्या नावाने ठणठणाच होता. परंतु आत्मपरीक्षण करण्याऐवजी त्यावेळी दलवाई व त्यांचे समर्थक मला नि 'माणूस'लाच प्रतिगामी ठरवून मोकळे झाले होते. कदाचित तत्पूर्वी मराठी वृत्तपत्रांमधून दलवाईंच्याविरुद्ध अवाक्षरही प्रसिद्ध झालेले नसल्यामुळे 'माणूस'ने थोडासा विरोधी सूर काढताच ते व त्यांचे समर्थक बिथरून गेले असतील... ते काही असो. परंतु त्यांनी व्यक्तिगत प्रतिष्ठेच्या जोखडातून स्वतःची सुटका करून घेतली व प्रत्यक्ष कार्याला सुरुवात केली याचा प्रत्यय परवा पुण्यात भरलेल्या मुस्लीम महिला परिषदेच्या निमित्ताने आला आणि आनंद वाटला. अलीकडे त्यांच्या लेखन-वक्तव्याचा सूरही पूर्वीपेक्षा खूपच सौम्य झाला आहे, आणि या परिषदेच्या योगाने तर त्यांनी योग्य दिशेनेच पाऊल उचलले आहे, असे मला वाटते. भारतातील ही पहिलीच मुस्लीम महिला परिषद भरविण्याचे श्रेयाधिकारी ठरल्याबद्दल श्री. दलवाई यांचे व सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीत पुण्यातली परिषद यशस्वी करण्यास पुढे सरसावल्याबद्दल कु. मरियम रफाई, अॅड. नजमा शेख, कु. शमीम अत्तार, व कु. मुमताझ मोमीन या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन.

पहिले पाऊल म्हणून ही परिषद बव्हंशी यशस्वी ठरलेली आहे, हे निःसंशय. तथापि या बाबतीत आत्मसंतुष्ट राहून चालणार नाही. अद्याप बराच पुढचा पल्ला गाठावयाचा आहे, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. मुस्लिमेतर समाजाने या उपक्रमाचे कितीही स्वागत केलेले असले तरी खुद्द मुस्लीम समाजात याची प्रतिक्रिया काय घडते, याला फार महत्व आहे. कारण प्रत्यक्ष कार्य तेथेच करावयाचे आहे. म्हणूनच मी या समाजातल्या सुशिक्षित स्त्री-पुरुषांना भेटून त्यांच्या प्रतिक्रिया अजमावण्याचा प्रयत्न केला. एखाददुसरा अपवाद वगळता बहुतेकांनी नावे जाहीर न करण्याचा आग्रह धरला, हे लक्षणीय.

सलामीलाच एका मोठ्या शाळेचे प्राचार्य म्हणाले, की या परिषदेत भाग घेणाऱ्या बहुतेक महिला शियापंथीय होत्या. शियांच्या जीवनात इस्लामला फार गौण स्थान आहे. कुराणाला वा महंमद पैगंबरांना ते मानत नाहीत. त्यामुळे त्यांनी केलेल्या मागण्या मुसलमानांच्या प्रातिनिधिक मानता येणार नाहीत. शिया लोकांत 'मुता' नावाचा विवाहाचा जो एक प्रकार आहे तो व्यभिचारसदृशच होय. विविक्षित काळासाठी केलेले लग्न म्हणजेच Temporary marriage !

प्राचार्य महाशयांच्या या आक्षेपात कितपत तथ्य आहे, हे ताडून पाहण्यासाठी मी अगदी अस्सल (?) सुन्नी पंथाच्या धर्मभीरू मुस्लीम तरुणींना भेटलो. तुम्ही परिषदेला का आला नाही म्हणून विचारता अशी एखादी परिषद भरते आहे हे आपल्याला माहीत नव्हते किंवा घरच्यांच्या धाकामुळे आपण प्रत्यक्ष परिषदेत भाग घेऊ शकलो नाही, असे त्यांनी सांगितले. परंतु एकंदरीत परिषदेला त्यांचा पाठिंबाच

दिसला. विशेषत: कुटुंब नियोजनाच्या आड धर्म आणणाऱ्या मुस्लीमांचा त्यांनी धिक्कार केला. मुसलमानांच्या दारिद्र्याला अशा आडमुठ्या लोकांनाच त्यांनी जबाबदार धरले. मुस्लीम स्त्री जसजशी सुशिक्षित होत जाईल तसतशी ती पत्नी म्हणून अधिकाधिक जागरूक बनेल, अशी त्यांची धारणा आहे. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असलेल्या मुस्लीम स्त्रीच्या शब्दाला घरातले सनातनीही कसा मान देतात ते अनेकजणींनी आवर्जून सांगितले. या चर्चेत आणखी एका महत्त्वाच्या बाबीवर मुस्लीम तरुणींनी विशेष जोर दिला. ती बाब म्हणजे शिक्षणाचे माध्यम. उर्दू माध्यमाच्या शाळांतील कोंदट, जुनाट वातावरणात वावरल्यामुळे पुढे समाजात वावरताना आम्हाला उगाचच बुजल्यासारखे होते. नोकरी मिळवताना मराठी भाषेचे अज्ञान आणि इतर धर्मीय मुलींच्या मानाने अतिरिक्त बुजरेपणा यांमुळे आमचे गाडे अडते व अंगी उच्च दर्जाचे गुण असूनही मग अशा मुलींची कुचंबणा होते, अशी त्यांनी तक्रार केली.

मुस्लीम मुलींची शाळा चालवणाऱ्या एका खाजगी शाळेच्या संचालिकाबाईंनी आपल्या शाळेत पर्सनल लॉमुळे पोळलेल्या अनेक परित्यक्ता व घटस्फोटिता नोकरी करीत असल्याचे सांगितले. त्यांच्या उध्वस्त आयुष्यांविषयी त्या फार कळवळून बोलल्या. परंतु तरीही पर्सनल लॉ रद्द करण्याला त्यांचा विरोध दिसला. कारण पर्सनल लॉला विरोध म्हणजे प्रत्यक्ष कुराणालाच विरोध अशी त्यांची पक्की समजूत झालेली आढळली. धर्माशी त्याचा काही एक संबंध नसल्याचे तासभर पटवूनही त्यांचे मत बदलू शकले नाही, हे विशेष. तेव्हा मग मी कायद्याचा बडगा न उगारता ही समस्या कशी सुटू शकेल ते सांगा म्हणून त्यांनाच आवाहन केले असता त्यांनी शिक्षणाचा पर्याय सुचवला. शिक्षणाने मुस्लीम स्त्री-पुरुष समंजस बनू शकतील व मग लग्न-विच्छेदाचा कटू प्रसंगच उद्भवणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कॉलेजात किंवा विद्यापीठात उच्च शिक्षण घेणाऱ्या मुस्लीम तरुणीही धर्माविषयी भलत्याच हळव्या आढळल्या. स्वत:च्या हिताविरुद्ध असणारा पर्सनल लॉही त्यामुळेच त्यांना प्रिय असावा. अनेकांना तर या समस्येचे गांभिर्यच कळलेले नाही. आम्हाला काय त्याचे, अशीच त्यांची वृत्ती दिसली. मात्र मुस्लीम समाजातल्या लग्न जुळवण्याच्या पद्धतीवर या फॅशनेबल तरुणी तुटून पडल्या. तरुणतरुणींच्या मतापेक्षा वडीलधाऱ्यांच्या निवडीलाच प्राधान्य देणाऱ्या विशेषत: उपवर मुलीचे मत खिजगणतीतही न धरणाऱ्या जुनाट पद्धतीवर त्यांनी खूप ताशेरे झोडले.

परिषदेच्या पुण्यातल्या महिला कार्यकर्त्यांनी या दृष्टीनेही प्रयत्नशील असणे त्यांच्या मूळ कार्याला उपकारकच ठरणारे आहे. सुविद्य तरुणींनी एकत्र यावे यासाठी महिलामंडळे आदी स्थापन झाल्यास वैवाहिक बाबींवर अधिक सखोल चिंतन, मनन नित्यही घडू शकेल आणि सुशिक्षित मुस्लीम महिलांचा जास्तीत

जास्त पाठिंबा परिषदेला मिळवता येईल. तसेच महिला कार्यकर्त्यांनी घरोघर फिरून पडदानशीन महिलांना या कार्याची माहिती देणे नि महती पटविणे अत्यावश्यक आहे.

सुविद्य मुस्लीम महिलांप्रमाणेच प्रतिष्ठित समाजसेवकांच्या मनाचाही कानोसा घेण्याचा मी प्रयत्न केला.

अॅड. एस्. ए रेहमान यांनी यापूर्वी 'तेजस्वी' साप्ताहिकास दिलेल्या मुलाखतीचा मजकूर चुकीचा नि विपर्यस्त स्वरूपात छापल्याबद्दल सर्वप्रथम माझ्याजवळ तक्रार केली. 'मुस्लीम स्त्रियांना हक्कच नकोत' असे वाक्य माझ्या तोंडी त्या मुलाखतीत घातले आहे, ते कसे चुकीचे आहे हे समजावून सांगताना ते म्हणाले...इस्लाममध्ये लग्न हा एक करार मानला जातो. करार हा दोन समान दर्जाच्या व्यक्तींतच होऊ शकतो. म्हणजेच इस्लामने स्त्री-पुरुषांना समान हक्क मुळातच दिलेले आहेत. त्यासाठी आंदोलन-विंदोलनाची गरज नाही. शिवाय एखादा कायदा केव्हा अस्तित्वात येतो ? जेव्हा विविक्षित गोष्टीने भयंकर स्वरूप धारण केलेले असते ... समाज-स्वास्थ्यावर त्याचा अनिष्ट परिणाम होण्याचा धोका असतो, तेव्हा मुस्लीम पर्सनल लॉच्या अस्तित्वामुळे अशा काही भयानक परिस्थितीत मुस्लीम समाजात सध्या आहे, असे मला मुळीच वाटत नाही. त्यामुळे कायदेशीर कारवाईची गरज नाही. मला तर निःसंदिग्धपणे असे म्हणायचे आहे की पर्सनल लॉ रद्दबातल ठरविण्याची मागणी करणाऱ्यांचा हेतूच मुळी चांगला नाही. या कायद्यान्वये मुस्लीम समाजाला मिळणाऱ्या काही विशिष्ट सोयीसवलती या लोकांच्या डोळ्यात खुपतात असा माझा आरोप आहे. मुख्य म्हणजे ही मागणी करताना समानतेचे जे तत्त्व पुढे केले जाते त्याला पर्सनल लॉच्या अस्तित्वामुळे काही बाध येतो असे मला


# व्होल्गा जेव्हा लाल होते

**वि. स. वाळिंबे**

मूल्य : रुपये अठरा

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

वाटत नाही. राष्ट्रीय एकात्मतावगैरेलाही अशा कायद्यामुळे जर काही नुकसान पोचत नसेल तर मग तो रद्द करण्याचा काही मूठभर लोकांचा वृथा अट्टाहास का?

पर्सनल लॉचे समर्थन करताना वकिलसाहेबांनी तलाकसंबंधी विस्ताराने स्पष्टीकरण केले –

'तलाक-ए-हसना'मध्ये पतीने एखाद्या साक्षीदारासमोर तीनदा 'तलाक' म्हटल्याने घटस्फोट मिळतो असं नव्हे. घटस्फोट मिळण्यासाठी ९० दिवसांचा काळ जावा लागतो. त्याला 'इद्दत' म्हणतात. या तीन महिन्यांत पत्नीला तीनदा मासिकपाळी येते. या दरम्यान म्हणजे 'तूहर'मध्ये (मासिक पाळीचा काळ) पत्नीला गर्भ राहिला तर पितृत्व निश्चित करता येते आणि तलाक रद्दबातल ठरतो. शिवाय दरम्यानच्या काळात पतिपत्नीत समेट झाला तर त्यांना आपला निर्णय बदलण्यास वाव राहतो. त्यामुळे ही पद्धत सकृत्दर्शनी भासते तितकी सोपी नाही. तसेच 'महेर'चाही अडथळा असतोच. 'महेर' म्हणजे एक प्रकारे बायकोची मालमत्ताच. ती मागेल त्यावेळी नवऱ्याला ती द्यावी लागते. यातही दोन प्रकार असतात – १ : Prompt Dower आणि २ : Differed Dower. लग्नाच्या वेळेस वराने वधूस द्यावयाच्या रोख रकमेस Prompt Dower म्हणतात आणि Differed Dower लग्नाच्या वेळेस कागदोपत्री फक्त नोंदलेली असते, प्रत्यक्ष द्यावयाची नसते. मात्र पत्नीने मागणी करताच द्यावी लागते. तिलाच अरबीत 'इंदुल तलब' असा मूळ शब्द आहे.

याचा अर्थ असा, की मुळात कायद्यात काही दोष नाही. परिषदेच्या निमित्ताने 'तरुण भारत'मध्ये लिहिताना श्री. श्री. के. क्षीरसागर यांनी तलाकसंबंधी महंमद पैगंबराचे एक वचन उद्धृत केले आहे ते असे :

'The thing which is Lawful but disliked by Allah is divorce.'

परंतु प्रश्न असा आहे, की अल्लाला काय आवडते यापेक्षा स्वतःला काय आवडते यालाच सर्वसामान्य मुसलमान महत्त्व देताना आढळतात आणि ते मनुष्य स्वभावाला धरूनही आहे. आणि म्हणूनच या 'माणसाला' वठणीवर आणण्यासाठी अल्लाचा बागुलबोवा निरुपयोगी आहे. कायद्याचा बडगाच प्रभावी ठरण्याची शक्यता आहे.

दुसऱ्या एका कट्टर मुस्लीम कार्यकर्त्यांनी तर तावातावाने म्हटले, ज्यांना मुस्लीम धर्मच सदोष वाटत असेल त्यांनी सरळ धर्मांतर करावे. आमच्या धर्मात ढवळाढवळ करण्याचे नसते उद्योग करू नयेत.

धर्मांतराचे धाडस कितीजणात असते आणि त्यामुळे उद्भवणाऱ्या सामाजिक समस्या कोणत्या याची जाणीव त्यांना करून दिली असता थोडे शांत होऊन ते म्हणाले, त्यांच्यासाठी नोंदणी पद्धतीचा (Registered marriage) पर्याय मोकळा

आहे की ? कायदे करून जर सगळे प्रश्न सुटले असते तर दारूबंदीचा पुनर्विचार करण्याची नामुष्की ओढवती ना. खरी निकड आहे ती नवराबायकोत सामंजस्य नि समजुतदारपणा निर्माण होण्याची ! हे संस्कारांनी शक्य होऊ शकेल. शिक्षणाने माणूस सुसंस्कृत बनतो म्हणून मुस्लीम समाजात सध्या गरज आहे ती शिक्षण-प्रसाराची, मुस्लीम महिला परिषदेची नव्हे !

विविध थरांतील विभिन्न व्यक्तींच्या या संमिश्र प्रतिक्रियांवरून एक गोष्ट स्पष्ट होते, की आडवळणाने का होईना मुस्लीम स्त्रियांवरील अन्यायाचे अस्तित्व त्यांना मान्य आहे. वाद फक्त तो दूर करण्यासाठी अवलंबावयाच्या मार्गाबाबतच काय तो आहे. आणि पर्सनल लॉ रद्द केल्याने धर्मात हस्तक्षेप होतो असं म्हणणाऱ्यांजवळही हा अन्याय दूर करण्यासाठी त्याव्यतिरिक्त अन्य पर्याय दिसत नाही. आणि कुराणाचे कट्टर पुरस्कर्तेही प्रत्येकबाबतीत त्यानुसार वागत नाहीत हे उघड सत्य आहे. त्यामुळे पर्सनल लॉ बाबतच जेव्हा ते धर्मात हस्तक्षेपाची ओरड करू लागतात तेव्हा ते कुणाला पटणे शक्य नाही.

धर्माची ढाल पुढे करून आपल्या स्वार्थाचे रक्षण करू पाहणाऱ्यांविरुद्ध कायद्याचे हत्यार उभारणे व्यवहार्य ठरणार आहे.

आणि म्हणूनच पुण्यात भरलेल्या मुस्लीम महिला परिषदेने योग्य दिशेनेच पाऊल उचलले आहे, असे मला वाटते.

---

या अंकात योजलेल्या मजकुरापैकी ' रोमेल 'वरील लेख जागेअभावी प्रसिद्ध करणे शक्य झाले नाही.
त्या लेखाचा पूर्वार्ध पुढील अंकी. —संपादक

---

# उपहार । बुड्ढा मिल गया । पराया धन

उपहार, बुढ्ढा मिल गया, पराया धन, – तीन प्रकारचे तीन हिंदी चित्रपट एकाच सप्ताहामध्ये पाहण्याचा योग आला. वेगळी कथा आणि जया भादुरीच्या मनमोकळचा अभिनयाचे मनोहारी दर्शन यांमुळे उपहार निश्चितपणे अन्य दोन चित्रपटांपेक्षा वेगळा पडतो. बुढ्ढा मिल गया – या चित्रपटामध्ये रहस्य आणि हास्य यांचे मिक्स्चर करून एक करमणूक प्रधान कथानक गुंफण्यात आले आहे. हृषिकेश मुखर्जी यांचे दिग्दर्शन हे या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्टच. कला आणि व्यवसाय, या दोन्हीचे छान गणित जमवण्याचे कौशल्य कै. बिमल रॉय यांना साधले होतें. परख, मधुमती, देवदास, दो बिघा जमीन, बंदिनी अशा अनेक चित्रपटांतून त्याची प्रचिती आलीहोती. बिमल रॉय यांचे हे तंत्र हृषीदांनी आत्तापर्यंत अगदी 'अनाडी' ते 'आनंद' पर्यंत पुष्कळसे संभाळले होते. असली-नकली, सारखे अपवाद त्यांनी केले आहेत. त्यांचा ताजा 'बुढ्ढा' हाही असाच एक अपवाद आहे. पराया धन हा राजेंद्र भाटिया यांचा चित्रपट खास हिन्दी पद्धतीचा आहे.

उपहारचे मूळ गुरुदेव टागोर यांच्या 'समाप्ती'मध्ये आढळते. शैशव आणि यौवन यांच्या मधील उंबरठयावर रेंगाळणारी 'मिनू' वयाबरोबर बदलण्यास तयार नसते. छोटा गोपाळ आणि आपला मित्रपरिवार यांच्यामध्ये ती रंगून जाते. तारुण्यात येऊनही शैशव टिकवून असलेल्या मिनूशी योगायोगाने अनूपशी गाठ पडते. अनूप या मुलीच्या अनोख्या वागणुकीवर एकदम फिदा होतो. लग्नानंतर सुधारेल, या भरवशावर आईचा विरोध पत्करून आणि तिने पसंत केलेली मुलगी नाकारून अनूप मिनूशी लग्न करतो. मानसिकदृष्टचा मिनूची लग्नाची तयारी नसते. स्वाभाविकपणे लग्न ही लादलेली घटना समजून मिनू प्रत्येक बाबतीत बालीशपणे आपला हट्ट रेटत राहाते. अनूपही कंटाळून कलकत्त्यास परत जातो. अखेरीस मिनूमध्ये आवश्यक ते बदल होतात. जबाबदारीची जाणीव येते. आणि पति-पत्नींचे मीलन होते. सत्यजित रे यांच्या तीन कन्या मधील समाप्ती या छोटचा चित्रपटामध्ये त्यांनी शैशव संपवून यौवनामध्ये पदार्पण करणाऱ्या या मुलीची कथा प्रत्ययकारीरीत्या साकार केली आहे. सुधेंदु रॉय यांनी समाप्तीच्या हिंदी अवताराची जबाबदारी उचलली आहे. मूळकथा अतिशय हळूवार स्पर्शदायी असल्याने प्रामाणिकपणे ती रुपेरी पडद्यावर उतरल्यावर जेवढे किमान यश मिळू शकेल, तेवढे यश रॉय जरूर मिळवतात. परंतु दिग्दर्शक म्हणून स्वतःचा ठसा ते उमटवू शकत नाहीत. जया भादुरीच्या भोवती अन्य नवीन कलावंतांची आघाडी आहे. रत्नमाला आणि नाना पळशीकर हे दोनच जुने कलाकार. मिनूच्या आई वडिलांची भूमिका ते ठीक करतात. पण 'आपली मंडळी' म्हणून उगाच फाजील प्रशस्ती करण्याचे कारण नाही. स्वरूपदत्त हा आणखी एक नवा कलावंत. 'बंगाली घडणीचा प्रियकर' म्हणून तो ठीक असला तरी हिंदीच्या रामरगडयात ठासून उभे राहणे

त्याला जरा जडच जाईल. तर तात्पर्य काय की चित्रपट पेलण्याची मुख्य जबाबदारी जया भादूरीवर आली असून तिने ती समर्थपणे पेलली आहे. नवीन असूनही नवखेपणा जाणवत नाही, याचे श्रेय तिच्या बरोबरच, तिला अभिव्यक्ती (Expression) बाबत मार्गदर्शन करणाऱ्या फिल्म इनस्टिटयूटलाही जाते. तर असे हे नवीन कलावंत गोळा केल्याने नवीन लोकांना संधी दिल्याचे श्रेय तर मिळतेच. पण कलाकारांवरील खर्चात तीन-चार लाख रुपये सरळ सरळ वाचतात. एवढी एका आघाडीवर बचत केल्यावर निर्मिती खर्चाबाबत निर्मात्यांनी काटकसर केलेली नाही. कथच्या परिपोषास योग्य अशी पार्श्वभूमी, आणि के. एच्. कापडिया यांच्या सारखा जुना जाणता मनुष्य कॅमेऱ्यामागे उभा असल्यावर 'रिझल्टम्' चांगलेच येणार. संगिताची आघाडी लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांनी संभाळली आहे. दुक्कल अत्यंत 'कार्यमग्न' असल्याची प्रचिती चित्रपटाच्या पार्श्वसंगीताच्या दर्जावरून येते. गाण्यांपैकी 'मैं एक राजा हूँ ! –' गुणगुणावेसे वाटण्याइतपत ठीक आहे. आणखी एक वेगळे वैशिष्टय म्हणजे केवळ तडजोड म्हणून अनावश्यक गोष्टींचा स्वीकार करून त्या लादण्यात आलेल्या नाहीत, स्वाभाविकपणे नवे कलावंत, विषयाचा वेगळापणा, आणि तडजोडीसाठी येणारा फालतू विनोद, किंवा शेवटपर्यंत झगडून दिग्दर्शकाच्या आदेशाने अपयश स्वीकारणारा व्हिलन नसल्याने उपहारचा वेगळेपणा निश्चितपणे जाणवतो.

बुढ्ढा मिल गया – हे हृषीदांचे नवीन चित्र. पंधरा लाखांची जायदाद असूनही नापत्ता झालेले एक म्हातारबुवा. या सर्व प्रकाराची कल्पना असलेल्या दोन तरुणांच्या हातामध्ये सापडतात. केसाने गळा कापणाऱ्या आपल्या भागिदारांचा काटा काढण्याचा त्यांचा मानस असतो. तथापि प्रस्थापित भागिदारांपैकीच एक जण म्हातारबोवांच्या नापत्तेपणाचा फायदा घेऊन एकेकाचा काटा काढू लागतो. पैशाच्या आशेने 'चचा' म्हणून म्हातारबोवांना सभाळणाऱ्या तरुणांनाही चचा म्हणजे एक गूढ वाटू लागतो. आता दोन तरुण म्हटल्यावर दोन तरुणीही हव्याच. नवीन निश्चल आणि देवेन वर्मा यांच्या जोडीला अर्चना आणि अरुणा इराणी आहेत. तर ही चौकडी अखेर म्हातारबोवांच्या मदतीने सर्व उलगडा घडवून आणते. विनोदी घटनांना प्राधान्य असणारा पूर्वाधं फार छान जमला आहे. चांगला दिग्दर्शक बेताचे कथानक कसे छान फुलवतो याची प्रचिती या भागात येते. पाप्तभेरू वृत्तीचे दोन तरुण – सीझन्ड गुंडा म्हणून फुकाचा आव आणून साहस अंगावर घेतात,–तो भाग उत्कृष्ठ आहे. चित्रपटाचा उत्तरार्ध रहस्यमय गुंतागुंत असलेला आहे. आता हा गुंता सोडवण्याची जबाबदारी हृषिकेश मुखर्जी यांच्यासारख्यांनी घेण्याचे कारण नव्हते. परंतु ती घेतल्यावर त्यांनी आपल्या परीने चित्रपट रंजक करण्याचा प्रयत्न केला आहे. कलाकारांपैकी ओमप्रकाश, अरुणा इराणी, आणि देवेन वर्मा भाव खाऊन जातात. अर्चना नवीन असूनही प्रौढ वाटते. नवीन निश्चलचे नाविन्य संपुष्टात आल्याचे जाणवते. अभिनय शिकण्यासाठी तो किती चित्रपट खर्ची घालतो, ते पाहायचे.

पराया धन–'चालू' हिंदी चित्रपटांचे सुंदर प्रतिबिंब या चित्रपटामध्ये पहावयास मिळते. नामवंत नायिका, नामवंत चरित्र अभिनेते, नाट्यपूर्ण (तर्कशुद्ध नव्हे) परंतु काहीसे कृत्रिम कथानक, काश्मीरच्या परिसरातील छायाचित्रण, आणि उडत्या चालीची–(रेडिओवर मारा करकरून लोकप्रिय होतील अशा धाटणीची) गीते–या सर्वांचे 'मिक्श्चर' जमवले आहे. एका धनाढ्य शेटजीला दरोडेखोरांची एक टोळी शेटजी मोटारीतून आपल्या पत्नी व छोटया मुलीसह जात असताना आडवाटेमध्ये गाठून लुटते. टोळीचा प्रमुख हिरालाल पोलिसांच्या हाती लागतो (ऐन मध्यरात्री आडवाटेवर झालेल्या या लुटमारीचे वेळी पोलीस अचूक कसे येतात, बरं, त्यांना खबर होती म्हणून आले म्हणावे तर वेळेवर का येत नाहीत. शेटजीच्या बायकोचा खून होऊन–शेटजींची बेबी, आणि पाच लाखाचे दागिने व जवाहर किंवा टोळीतील एक दरोडेखोर पळवून नेईपर्यंत हे स्वस्थ कसे बसतात– अर्थात असल्या पद्धतीचे प्रश्न हिन्दी चित्रपटाच्या प्रेक्षकांनी विचारायचे नसतात) बाकीचे दरोडेखोर मारले जातात. आणि पोलिसांशी एवढी दन्नादन्नी होऊन गोविंद 'माल' आणि शेटजींची छोटी मुलगी घेऊन निसटतोच.

निसटतो तो पुन्हा न सापडण्यासाठीच, सरळ काश्मीरच्या परिसरातील छोटया गावात जातो. नवे जीवन सुरू करतो. (हे सुरू होण्यापूर्वी साध्या गोविंदाचा दरोडेखोर कसा झाला होता, हा छोटा कथाभाग पुर्वदृष्यांद्वारे दाखवून–मुळात गोविन्दा कसा सालस होता, याचे प्रेक्षकांना दर्शन घडवतात.) गोविन्दाचे नवे जीवन सुरू होते. मुलगी–चार-दोन शॉटस्‌मध्ये मोठी होते. कारण प्रेक्षकांनाही हेमा मालिनी हवीच असते. मुलगी पुरेशी मोठी होऊन योजलेल्या प्रियकराशी Introduce झाल्यावर तुरुंगात पडलेला हिरालाल जेलरचा खून करून निसटतो. गोविन्दाच्या एका विश्वासातील माणसाचा खून करतो. गोविन्दा परिस्थिती लक्षात घेऊन रज्जुच्या खऱ्या वडिलांना पत्र लिहितो. हिरालाल गोविन्दाला गाठून त्याचा बळी घेतो, परंतु मुलगी रज्जू त्या अडदान्ड दरोडेखोराचा बळी घेते. गोविन्दा आपला खरा बाप नाही ही वस्तुस्थिती कळल्यावरही हे रहस्य ती रहस्यच ठेवते.

असे हे कथानक आपल्या प्रेक्षकांना हवे असते. त्या सर्व खुब्या योजून मोठ्या रसाळपणे सांगितले आहे. " म प्यार, तु गीत "–सारख्या मधाळ गाण्यांची पेरणी राहूलदेव बर्मन यांनी केली आहे. हेमा मालिनी अथपासून इतिपर्यंत हेमामालिनी म्हणूनच वावरत असल्याने प्रेक्षक संतुष्ट होता. बलराज साहनी (गोविन्द) व अजित (हिरालाल) हे कलावंत आपल्या भूमिकेत शोभून दिसतात. फार दिवसांनी आलेला अजित चांगला लक्षात राहातो. राकेश रोशन हा अजून पुरेसा रुळलेला नाही. काही विशिष्ट अँगल्सनी (विशेषत: प्रारंभीच्या घोडयावरील गीताचे वेळी) तो अगदीच विक्षिप्त दिसतो. प्रसन्न छायाचित्रण, आणि हलकेफुकके श्रवणीय संगीत, या चित्रपटाच्या जमेच्या बाजू आहेत. धंद्यासाठी घेतलेले हे चित्र, आपल्या उद्देशामध्ये बऱ्यापैकी सफल व्हावे,

अशी ही तीन हिन्दी चित्रपटांची कहाणी साठाउत्तरी सफळ संपूर्ण. □ □ □

 पृष्ठ ४ वरून

नित्य संबंध असल्याने माहीत असेलच. कठीण व आणीबाणीच्या प्रसंगी जशी शिवाजीची किंवा भगतसिंगाची आठवण या देशाला चिरकाल होत राहणार, तशीच सावरकरांचीही. कारण ही जीवनेच तशी पौरुषसंपन्न व सूर्यासारखी स्वयं-प्रकाशी आहेत. दुसरे, मुस्लिम विरोधात दंग होते ते सावरकर काही काळानंतर विसरले जातील, जावेत, हेही निश्चित. तरीपण या देशातील मुसलमान समाज राष्ट्रीय प्रवाहाशी एकरूप होण्याचे नाकारीत राहील तोवर हे घडून येणार नाही. आणखी तिसरेही एक सावरकर मोकाशींच्या दुर्दैवाने शिल्लक उरतातच. बलशाली भारताचे उपासक सावरकर. मला वाटते, या सावरकरांना तर पुढच्या पाच-पंचवीस वर्षांत भयंकरच महत्त्व येणार आहे. कुणाला रत्नागिरीचे सुधारक सावरकर प्रभावित करतील, कुणी कवी-साहित्यिक म्हणून त्यांचेपासून स्फूर्ती घेत राहतील. मोकाशींनी वाटल्यास या सावरकरप्रभावाबद्दल हळहळ व्यक्त करावी. समाज, निदान आपला भारतीय समाज, एवढा कृतघ्न नाही. तो वैराला मरणाबरोबरच संपवून टाकतो.

आता सावरकर–विनोबा आणि त्यांचे लोकांत मिसळणे न मिसळणे हा मुद्दा. सावरकरांचे निदान तीन चतुर्थांश आयुष्य लोकांत मिसळण्यात गेले. लंडनला, अंदमानमध्ये आणि रत्नागिरीत सावरकर संघटना करीत होते, लोकसंग्रह साधीत होते. फक्त त्यांचा लोकसंग्रह मुख्यत्वेकरून हिंदु लोकसंग्रह होता. नंतरचे सावरकर लोकांत फारसे मिसळले नाहीत, हिंदु लोकसंग्रहही त्यांनी साधला नाही हे मोकाशींचे म्हणणे खरे आहे. पण विनोबा प्रथमपासूनच असंग्रही होते, लोकांत मिसळण्याची त्यांची प्रवृत्ती कधीच नव्हती व आजही नाही हे मोकाशींनी का ध्यानात घेऊ नये ? केवळ पायी हिंडणे म्हणजे लोकांत मिसळणे नव्हे हे मोकाशीही जाणतातच.

मुख्य मुद्दा असा, की प्रेषित हा बहुधा एकांतप्रिय असतो. अंतर्मुख वृत्तींचे त्याच्याठायी प्राबल्य राहते. हिंदुत्वाचे प्रेषित सावरकर आणि सर्वोदयाचे प्रेषित विनोबा यांच्यामध्ये म्हणूनच असा भेद करणे उचित नाही. दोघांनाही टिळक-गांधींसारखा लोकसंग्रह साधलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा माजगावकरांमध्ये दोष उतरला असला तर तो या दोघांचाही थोडथोडा उतरला आहे, एकट्या सावरकरांचा नाही, एवढी तरी दुरुस्ती मोकाशी करतील काय ?

भेद किंवा फरक असा होऊ शकतो. सावरकर शस्त्रशक्तीचे उपासक होते. जन-शक्ती त्यांनी गौण मानली. याउलट विनोबांनी जनशक्तीवर भर दिला, पण शस्त्र-शक्तीकडे पूर्ण दुर्लक्ष केले. मोकाशींनी असा काही फरक दाखवून दोघांच्या अर्थपूर्ण वा गतार्थ कार्याची बेरीजवजाबाकी मांडली असती तर ती अधिक विचारार्ह ठरली

असती. याऐवजी लोकांत मिसळण्या न मिसळण्याचा अगदी तकलादू मुद्दा मोकाशींनी उपस्थित केला आहे. मोकाशी हे कलावंत व साहित्यिक. त्यांच्याकडून तरी प्रेषिताच्या मनोरचनेचा अधिक सूक्ष्म वेध अपेक्षित होता.

लोकसंग्रह हाही एक मोठा गुण आहे. पण हा तरी मोकाशींनी सुसंगतपणे पत्करला आहे का ? तसेही नाही. लोकांत मिसळणे, लोकांसारखे राहणे, लोकांवर छाप टाकणे, लोकांकडून हुकमी पद्धतीने कामे करवून घेणे, व्यापक ओळखीपाळखी-संबंध असणे, हा लोकसंग्रह. नासिकपासून पदयात्रेबरोबर असलेला निफाडचा तरुण सभापती विनायक पाटील हा या लोकसंग्रही प्रवृत्तीचा एक उत्तम आदर्श. मग याचे तरी श्रेय मोकाशींनी याला मोकळेपणाने देऊन टाकावे की नाही ? पण इथेही कोणती तरी माशी शिंकलीच. मघाशी हवा होता त्यावेळी झोपलेला मोकाशींमधील साहित्यिक कलावंत नेमका याचवेळी किरकिरत जागा झाला–

'ठरल्याप्रमाणे नाशिकपासून विनायक पाटील पदयात्रेत सामील झाला आहे. तो पदयात्रेत आल्यापासून पदयात्रेतील थरारी गेली आहे. पूर्वीसारखे आता गावाबाहेर थांबणे नाही. गावात सोय कशी होते, माणसे कशी आहेत वगैरे चिंता नाही, आता सभांतून विरोध नाहीत. माजगावकरांचा अन्नधान्याचा ठराव एकमताने क्षणात पास होतो. कुणी तडकून हल्ला करीत नाही. हा विनायक आल्यापासून गमत गेली आहे.' (पृ. १५६)

म्हणजे विनायकासारखा कुशल संघटक पूर्वी नव्हता, पदयात्रेचा ठोका नीट पडत नव्हता, प्रसिद्धीची आबाळ होत होती म्हणून नाराजी. हे सगळे नीट जमते आहे, मोठमोठ्या सभा गाजत आहेत, व्यवस्थेतही कुठली उणीव राहात नाही, म्हणूनही नाराजी. म्हणजे प्रश्न असा पडतो, की मोकाशींना नेमके हवे होते तरी काय घडायला ? चुकीच्या अपेक्षा बाळगून तर ते पदयात्रेत सामील झालेले नव्हते ना ? का एखादे वैयक्तिक अपयश त्यांना सारखे डाचत होते ? स्वतःचे एक मोठे अपयश लपविण्यासाठी त्यांच्या सुप्त मनाने हुडकलेली ही एक संरक्षक क्लृप्ती तर नसावी ? नाहीतर एरव्ही नितळ असणाऱ्या त्यांच्या लिखाणात हा कडवटपणा सारखा उफाळत राहिला नसता.

या काळातले त्यांचे एक अपयश तर स्पष्टच होते. 'केसरी'ने त्यांच्या पदयात्रेचा आर्थिक भार बऱ्याच प्रमाणात उचलला तो काही त्यांनी चार वर्षांनतर 'मौजे'साठी एक पुस्तक तयार करून द्यावे म्हणून खचितच नसावा. पदयात्रेचा थोड्या ललित पद्धतीने सादर केलेला वृत्तांत दर आठवड्याला त्यांनी केसरीच्या वाचकांसाठी सादर करायला हवा होता. 'अन्नासाठी दाही दिशा' हे केसरीतून सुरू झालेल्या पदयात्रेसंबंधीच्या लेखमालेचे शीर्षक मोकाशींकडून कोणत्या स्वरूपाचे लिखाण अपेक्षित होते हे पुरेसे स्पष्ट करणारे आहे. पण मोकाशींच्या लिखाणाने अपेक्षित

स्वरूप धारण केले नाही. धड नव्हते ते ललित लेख, धड नव्हती ती वार्तापत्रे. वाचकांची निराशा झाली. पदयात्रा संगमनेर-नाशिकपर्यंत पोचली तरी मोकाशी औरंगाबाद-पैठणच्या पुढे सरकेनात. पुण्यात मध्यंतरी मोकाशी डोकावून गेले तरी सर्वत्र त्यांना सामसूम दिसली. या सामसुमीची निम्मो जबाबदारी तरी मोकाशींनी उचलावी की नाहीं ? कारण फक्त केसरीत जरी लेखरूपाने हा सर्व विषय नीट येत राहिला असता तरी पुण्यापुरता मोकाशींना अपेक्षित असलेला पदयात्रेचा ठोका पडत राहिला असता. बरे, नाही जमले तर नाही. पण याचेही खापर पुन्हा माजगावकरांच्याच गळयात अडकवून मोकळे होण्याची मोकाशींना काय निकड होती ? म्हणून वर एक मानसशास्त्रीय उपपत्ती मी सूचित केली. सतत उपरोधिक लिहिणे ही मोकाशींची या काळातली एक मानसिक गरज बनली असावी. त्याशिवाय त्यांची अस्वस्थता, आतल्याआत उडालेली गडबड, व्यक्तित्त्वाचा डळमळणारा तोल ते सावरू शकत नसावेत.

पु. ग. सहस्रबुद्धे, राजाभाऊ कुलकर्णी यांच्या संबंधीचे मोकाशींचे लिखाण किती एकांगी, किती उपरोधपूर्ण आहे ?

पु. ग. सहस्रबुद्धे यांच्याशी मोकाशींचा संबंध जेमतेम दोन चार तास आला असावा. तेवढयात मोकाशींनी जवढे म्हणून पु. ग. चे दोष टिपता येणे त्यांना शक्य होते तेवढे टिपून दाखविले आहेत. या वयात हा विद्वान माणूस तळमळीने काही सांगायला शंभर मैल दूर आला—काही गैरसोयी पत्करूनही—याबद्दल मोकाशींच्या जवळ सहानुभूतीचा एक शब्दही नाही. उलट अतिशय बालीशपद्धतीची अशी टीकाच—

'पु. ग. सहस्रबुद्धे यांनी स्वावलंबन वगैरे सांगताना अनेक पाश्चात्य हकीकतींचा आधार घेतला. एकीकडे स्वायत्तता, स्वावलंबन सांगताना ते घेत असलेले हे परकीय आधार गंमतीदार वाटत होते.' (पृ. १३४)

मोकाशी ! सर्वोदयाचा आधार एक पाश्चात्य पुस्तकच आहे, बरं का ?

शिवाय मोकाशींचे चित्त जरी शुभ्र-शुद्ध सर्वोदयात रमलेले होते, तरी हात मात्र यावेळी एका धमाल अमेरिकन रहस्यकथेचे चार दिडक्या देणारे भाषांतर करण्यात गुंतलेले होते. याचा उल्लेख मात्र कुठेच दिसत नाही. हे वेगळे.

चला मोकाशी ! एक साहित्य-स्वतंत्रता पदयात्रा काढायची का ? यावेळी मात्र तुम्ही प्रमुख, मी 'त्रयस्थ !'

असाच अन्याय मोकाशी, तुम्ही राजाभाऊ कुलकर्णी यांचेवर केलेला आहे. आपण शेवगावला असताना जनसंघाचे अध्यक्ष पं. दीनदयाल उपाध्याय यांचा मृत्यू झाल्याची बातमी आली. येथे माझ्या तोंडी तुम्ही चुकीची वाक्ये घातलेली आहेत. दीनदयालांचा खून आहे व तो राजकीय आहे, हे राजाभाऊंचे मत. माझे नव्हे. पण ते जाऊ द्या. वाक्याचा अशी अदलाबदल तर तुम्ही खूपच ठिकाणी केलेली आहे. पुढच्या दोन चार ओळी मात्र तुम्ही फार वाईट लिहिल्या आहेत. तुमचे शब्द असे—

'दीनदयालांच्या खुनाची वार्ता ऐकून राजा कुलकर्णी बोलण्यापलीकडे गेले होते त्यांच्या डोळ्यांत पाणी तरंगत होते. नंतर मी व मोरे (पदयात्रेत असलेले फोटो ग्राफर) बाहेर गेलो. तेव्हा मोरे म्हणाले, गांधींच्या खुनाच्या वेळेला यांच्या डोळ्याला पाणी आले होते का ?'

सहा हजार मैलांवरच्या, कधीही फोटोतसुद्धा न पाहिलेल्या हॉलंडच्या बालकांचा काल्पनिक अवमान होतो म्हणून हळहळ व्यक्त करणारे, मोकाशी, तुम्ही सहृदय लेखक! आपल्याबरोबर जो दोन महिने धंद्याचे सर्वप्रकारचे नुकसान सोसून राहिला, आपली सर्वांची ज्याने सोय पाहिली, पडतील ते कष्ट उचलले, त्याच्या भावनांची तुम्ही अशी कुचकट संभावना करावी! मी असाच प्रश्न मोऱ्यांना आणि त्यांच्या आड दडून बाण सोडणाऱ्या तुम्हालाही विचारू शकतो – डॉ. आंबेडकर गेले तेव्हा तुमच्या दोघांच्या डोळ्यांत किती पाणी आलेले होते ? माणसाच्या डोळ्यात पाणी केव्हा तरंगते हे एक ललित लेखक म्हणून मोकाशी, तुम्ही जास्त चांगले जाणू शकत असाल, नाही का ?

असे हे पदयात्रेचे इथूनतिथे अनुदारपणे केलेले चित्रण आहे. सगळचाच अनुदार उल्लेखांची, टीकेची दखल घ्यायचे म्हटले तर एक लांबलचक लेखमालाच लिहावी लागेल. वैयक्तिक माझ्यासंबंधीचे अनुदार उल्लेख तर खूप आहेत. पण यापैकी एकाही उल्लेखाला उत्तर देण्याची माझी इच्छा नाही. ते मी अप्रशस्त मानतो. इतरांचा जिथे संबंध आला तिथे मला मात्र गप्प राहणे शक्य नव्हते. असेही असण्याची शक्यता आहे, की वर ज्यांचा उल्लेख मी आवर्जून केला ते सर्व उल्लेख सोडून इतर ठिकाणचे माझ्यासंबंधींचे किंवा इतरांसंबंधीचे मोकाशींनी केलेले उल्लेख, एखादवेळी अनवधानानेही झाले असतील. उदाहरणार्थ पृष्ठ १२० वरील हा उल्लेख नेमका कोणत्या गटात बसतो हे मलाही अद्याप नीटसे ठरवता आलेले नाही. मोकाशी लिहितात–

'मग माजगावकरांच्या 'माणूस' साप्ताहिकाच्या कचेरीत गेलो. माजगांवकरांच्या भगिनी सौ. पुरंदरे तिथे होत्या. त्यांनी मला विचारले, 'श्रीभाऊ (श्री. माजगावकर) नवा राजकीय पक्ष काढीत आहेत हे खरे का ?'

मी म्हटलं, 'तुमच्याच तोंडून पहिल्यांदा ऐकतो आहे. अशी बातमी तुम्हालाच खरी का खोटी आधी कळायची.'

मोकाशींचे पुस्तक वाचून झाल्यावर मी भगिनींना खुलासा विचारला. त्या म्हणाल्या, 'असा शेंडाबुडखा नसलेला प्रश्न मी मोकाशींना विचारीनच कसा ? आणि ही बातमी असलीच तर ती आम्हाला येथे पुण्याला अगोदर कळेल, की पदयात्रेबरोबर चोवीस तास राहणाऱ्या मोकाशींना अगोदर समजेल.'

यावरून असे दिसते, की प्रश्नाची आणि उत्तराची मोकाशींनी उलटापालट केली असावी.

दुसरी एक अनवधानाने झालेली चूकही सांगितली पाहिजे. नेवाशाला आमची सोय उत्तम ठेवण्यात आली होती. आम्ही पोचलो तो आणि पुढचा दिवस यात्रेचा होता. तरी कार्यकर्त्यांनी आम्हाला नम्रतापूर्वक सांगितले होते, की आम्हाला सोयी-साठी जे काही लागेल ते दुपारपर्यंत आम्ही मागवून घ्यावे. सायंकाळी सगळेच यात्रेच्या धावपळीत गुंतलेले राहतील. यात त्यांची कणभरही चूक नव्हती. दुपारी भरपूर गोडाचे जेवण झाल्यामुळे रात्री आमच्यापैकी कुणालाच काही लागणार नाही असे सांगून, आम्हीच कार्यकर्त्यांना मुक्त केलेले होते. तरी मोकाशी 'त्या रात्री नेवासेकर आमच्या जेवणाचेही विसरले. खरे म्हटले तर पोटाला विसावा हवाच होता. पण कुणी चौकशीला येऊ नये याचे वाटले खरे ......' असे जेव्हा लिहून जातात तेव्हा पाहुण्यांना उपाशी ठेवण्याचा दोष विनाकारण नेवासेकर कार्यकर्त्यांच्या माथी मारला जातो असे मला वाटते.

किरकोळ नावांच्या चुका, नसलेल्या गावातील कार्यक्रमांची वर्णने, एकाच लेख-काच्या एकाच पुस्तकाला दोनदोन नावे बहाल करणे, चुकीची वाक्ये एखाद्याच्या तोंडी घालणे असल्या गंमतीजमती तर मोकाशींनी बऱ्याच केल्या आहेत. पण हे त्यांच्या एकूण कीर्तीला साजेसे असल्याने याबद्दल आपली काही एक तक्रार नाही.

तसेच पुस्तकात आलेल्या काही उत्कृष्ट निसर्ग वर्णनांबद्दलही आपण मोकाशींवर खूष आहोत. हे पुस्तकपरीक्षण असते तर यासंबंधी मी अधिक लिहिले असते.

पदयात्रेतील माणसांवर एकदा रागावल्यावर, चिडल्यावर निसर्गाकडे धाव घेण्याशिवाय लेखकांला गत्यंतर उरले नव्हते हे यामागील एक कारण असू शकते काय ?

तसेच पुस्तकाचे नाव सुंदर. साधे, खूप गोडवा असलेले.

हा गोडवा सगळा नावात आटून जावा याचेच वाईट वाटत राहाते.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH 649



“ आमचा परिचय करून देताना आम्हाला १९४२ मध्ये तुरुंगवास घडला म्हणून सांगितलंत इथपर्यंत ठीक. पण पुढं ‘ घरफोडीसाठी ’ असं स्पष्टीकरण द्यायचं काय नडलं होतं ?....”